# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती इतिवृत्तांत

**दिनांक १०-०२-२००४ ची**

**(तहकूब सभा)**

**दिनांक ११-०२-२००४**

**रजिष्टर क्र. ७**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
# स्थायी समिती सभा

| अ. क्र | स्थायी समिती सभेचा दिनांक | विषय क्र. व ठराव क्र. | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | १०-०२-२००४ | विषय क्र. १०५ ते विषय क्र. ११० | |
| ०२. | १०-०२-२००४ | विषय क्र. १११ | |
| ०३. | ११-०८-२००४ | -- | |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १०-०२-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का. व. क्र. १५) इतिवृत्त. मंगळवार दिनांक १०-०२-२००४ रोजी स्थायी समितीची सभा मा. सभापती भाऊसाहेब ताठे यांचे अध्यक्षतेखाली " मलिक अंबर स्थायी समिती सभागृहात " येथे सकाळी ११.०० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरुवात झाली. या सभेस मा. आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. चंद्रखेखर लक्ष्मीनारायण जैस्वाल | -//- |
| ३. | स. स. श्री. ठकुजी रामसिंग वाणी | -//- |
| ४. | स. स. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| ५. | स. स. सौ. जेजुरकर ताराबाई सुधाकर | -//- |
| ६. | स. स. श्रीमती मानकापे पार्वतीबाई लहानू | -//- |
| ७. | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| ८. | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ९. | स. स. श्री. कैसरखान बद्रोद्दीनखान | -//- |
| १०. | स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| ११. | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| १२. | स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| १३. | स. स. श्री. शेख इलियास किरमाणी | -//- |

**संवाद :**

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** माजी नगरसेवक श्री. दत्तात्रय थोरात यांचे वडील स्व. रामराव थोरात यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. ते निवृत्त तहसिलदार होते. त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**श्री. नंदकुमार घोडेले :** यास माझे अनुमोदन आहे. श्रध्दांजली अर्पण केल्याबद्दल त्यांचे घरी तसा संदेश पोचविण्यात यावा.

**मा. सभापती** : ठिक आहे. सर्वांनी श्रध्दांजली उभे रहावे.
( याच वेळी स्व. रामराव थोरात यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**श्रीमती पार्वती मानकापे :** गजानन महाराज मंदिर चौकाजवळ कमान टाकण्यात आलेली असून, यापुर्वी तत्कालीन आयुक्त श्री. भोगे साहेबांनी त्याच ठिकाणी कमान उभारण्यास मंजूरी दिलेली होती. जी कमान टाकण्यात आलेली आहे. त्यामुळे छ. शिवाजी महाराज यांचा पुतळा झाकुन जातो याचा विचार केला नाही. सदर कमानीस प्रशासनाकडुन परवानगी घेतलेली आहे का. चौकशी करण्यात यावी व सदरची कमान काढुन तेथे गजानन महाराज मंदिर अशा नावाची कमान लावण्यात यावी. सौंदर्यीकरण व वृक्षारोपन करावे.

**श्री. नंदकुमार घोडेले :** गजानन महाराज विश्वस्त मंडळाने कायदेशीर सर्व पुर्तता करुन सेव्हनहिल ते सुतगिरणी या रस्त्याच्या प्रवेशद्वारावर कमान लावण्याबाबत परवानगी घेतलेली आहे. आता जी कमान उभी करण्यात आलेली आहे ती

वेगळी आहे. संबंधित जो कुणी ठेकेदार असेल त्यांना समक्ष बोलावून त्या संस्थोचे पदाधिकारी यांचेशी चर्चा करुन स्वेच्छेने ती कमान गजानन महाराज मंदिर ट्रस्टला देऊ इच्छित असेल तर तशी कार्यवाही करण्यात यावी.

**श्रीमती पार्वती मानकापे :** तसेच या चौकाचे सौंदर्यीकरण करण्यात यावे.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी सविस्तर माहिती दयावी.

**उपअभियंता (बां.-२) :** शहरात एकुण २६ कमानी उभारण्याचे प्रस्तावित होते. त्यापैकी एक कमान गजानन महाराज मंदीरा समोरील चौकात उभारावे असा प्रश्न उपस्थित केलेला होता. पुर्वी गजानन महाराज विश्वस्त संस्थेने कमान लावण्याबाबत मंजुरी घेतलेली आहे. किंवा कसे माहिती होण्यात येईल. तुर्त त्याबद्दल मला माहिती देता येणार नाही.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** गजानन महाराज विश्वस्त संस्थेने गजानन महाराज मंदीर नांवाचे कमाल लावण्याबाबत तत्कालीन आयुक्त श्री. भोगे साहेब असतांना परवानगी घेतलेली आहे. ती कमान होवू शकली नाही. परंतू आता ज्यांनी तेथे कमान उभारणी केली. त्यांचेशी समन्वय साधून सविस्तर चर्चा करुन हा प्रश्न मार्गी लावण्यात यावा.

**मा. सभापती** : सदर जागेवर कमान उभारली त्याच जागेवर यापुर्वी गजानन महाराज विश्वस्त संस्थेने रितसर परवानगी घेतलेली आहे किंवा कसे ते तपासून जर परवानगी घेतलेली असेल तर, जी कमान उभारण्यात झाली त्या संस्थेचे पदाधिकारी व प्रशासन आणि गजानन महाराज ट्रस्टचे पदाधिकारी यांनी एकत्रित येवून या प्रकरणी निपटारा करुन घ्यावा. लावण्यात आलेली सदर कमान देऊ इच्छित नसेल तर, ती काढण्यात येऊन गजानन महाराज मंदीर नावाची कमान लावण्यात यावी.

**श्रीमती पार्वती मानकापे :** याप्रमाणेच क्रांतीचौक जवळच झाशीच्या राणीचा पुतळा आहे. त्यास सौंदर्यीकरण करण्यात यावे. पुतळा साफसफाई करण्यात यावी. व रस्त्यापासून खुप अंतरावर असलेला पुतळा पुढे घेण्यात यावा.

**अति. शहर अभियंता :** प्रत्यक्ष पाहणी करुन सौंदर्यीकरणात वाढ कशी करता येईल. त्यासाठी कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी स्थायी समितीच्या काही सदस्यांना बरोबर घेऊन प्रत्यक्ष त्या ठिकाणी पाहणी करुन त्या पुतळयाचे सौंदर्यीकरणात वाढ कशी करता येईल. यासाठी कार्यवाही करावी.

**श्री. नंदकुमार घोडेले :** मागील चार पाच सभेपासून मनपाच्या शाळेची व विद्यार्थ्यांची दुरावस्था यावर सविस्तर अशी चर्चा होवून चौकशी समिती नियुक्त करुन अहवाल सादर करण्याबाबत प्रशासनास आदेश देण्यात आलेले होते. मनपाच्या शाळा भटारखाना झालेल्या आहेत. अशा प्रकारची गंभीर बातमी दैनिक सामनामध्ये प्रसिध्द झालेली आहे. ५८ विद्यार्थी व पाच-सहा वर्ग असलेल्या या शाळेस फक्त दोनच शिक्षक आहेत. खिचडी शिजवून दिली जाते. बऱ्याच शाळांमध्ये वर्गात खिचडी शिजवून वाटप होते. बऱ्याच ठिकाणी विद्यार्थी आहेत तर शिक्षक कमी व शिक्षक आहेत. तर विद्यार्थी संख्या कमी काही ठिकाणी मुख्याध्यापक नाही. अशी दयनीय अवस्था असून, या संदर्भात चर्चा होवून प्रशासनास आदेश देवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही म्हणून आदेशीत केलेले होते. अशा प्रकारची परिस्थिती कायम

राहील्यास मनपाच्या शाळेतील विद्यार्थी संख्या कमी होत जाईल. खाजगी शाळेपेक्षा विद्यार्थ्यांवर मनपाचा जास्त खर्च होत असतांना ही परिस्थिती का निर्माण होते. प्रशासनाने याबाबत काय पावले उचलली आहेत. याबद्दल आजच्या आज खुलासा करावा. दैनिक वर्तमानपत्रातून अशा प्रकारच्या बातम्या येतात या सत्य आहेत. खऱ्या अर्थाने पत्रकार बंधूना धन्यवाद देणे आवश्यक वाटते. खुलासा घ्यावा व प्रशासनाने याबाबत नियोजन करावे व मागील वेळेस मी म्हटल्यानुसार किमान एका शाळेचे खाजगीकरण करण्यात यावे.

**सौ. शाहीन जफर :** सात-आठ बैंठकापासुन या संदर्भात चर्चा होत आहे. उपआयुक्त (प्र.) कोणत्याच प्रकारची कार्यवाही करीत नाही. शिक्षणाधिकारी किंवा शिक्षण समिती सभापती यांनी एक महिन्यान किमान एका वेळेस प्रत्येक शाळेवर प्रत्यक्ष भेट देणे आवश्यक आहे. सर्व प्रकारची चर्चा होते. वृत्तपत्रात येते तरी सुध्दा अधिकारी दखल घेत नाहीत. तसेच शिक्षकांना बसण्यासाठी खुर्च्या नाहीत. इतर फर्निचर नाही हा मुद्दा बऱ्याच वेळा मांउलेला आहे. दखल घेतली जात नाही. तसेच शिक्षकांना दिर्घकालीन रजा दिल्या जातात त्यामुळे अभ्यासक्रम पुर्ण होत नाही. त्यात विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते. अनेकवेळा शिक्षण विभागाचे प्रश्न मांडले कार्यवाही होत नसेल तर, यानंतर चर्चा सुध्दा करण्याची इच्छा नाही. उपआयुक्त (प्र.) यांना अनेक वेळा सुचना केलेल्या आहेत. विद्यार्थ्यांना थाळी, ग्लास आणावयास सांगतात. खिचडी तयार करणे व वाटप करणे यात वेळ जातो. विद्यार्थ्यांचे शिक्षण पुर्ण होत नाही. त्याचा परिणाम निकालावर होतो. शाळेवर कोणत्या पध्दतीने काम चालते यासाठी वेळोवेळी भेटी देणे आवश्यक आहे. पिण्याचे पाणी नाही. ग्लास नसतात. पाणी साठविण्यास साधन नाही. विद्यार्थ्यांना वडीलांचे नांव विचारल्यावर लिहीला येत नाही. विद्यार्थ्यांना येते किंवा नाही याचे शिक्षकांना देणे घेणे नाही. पगार मिळतो. यात विद्यार्थ्यांचे नुकसान होते. गरीब विद्यार्थी शिक्षण घेतात. प्रशासनाने दखल घेणे आवश्यक आहे. यामुळे शिक्षकांवर प्रशासकाचा वचक राहील. वृत्तपत्रात बातम्या येतात. त्यावर आनंद व्यक्त करणे योग्य नाही. प्रशासनाने दखल घेतली पाहीजे. शाळेचा दर्जा उंचावला गेला पाहीजे. सातवीपर्यंत वर्ग चालतात. चार शिक्षक कमी केल्यास तीन शिक्षकांना पूर्ण वर्गास शिकविणे शक्य होत नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण होण्यासाठी शिक्षक देणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना त्यांचे आई-वडील वर्ग शिक्षकांचे नांव लिहीता येत नाही. अशी परिस्थिती आहे. पुस्तकातील अभ्यासक्रम व त्यातील प्रश्न व उत्तर हे तर विद्यार्थ्यांसमोर मोठे आव्हान आहे. उत्तर देवू शकत नाही. प्रश्नच समजत नाही. पण उत्तर काय देणार त्यासाठी विनंती की, शिक्षणाधिकारी सभापती (शिक्षण समिती) यांनी महिन्यातून किमान एक-दोन वेळेस सर्व शाळांवर प्रत्यक्ष भेट दिली पाहीजे.

**उपआयुक्त (प्र.) :** मागील स्थायी समितीने निर्णय घेतल्यानुसार प्रशासनाने दोन पथके तयार केलेली आहेत. मराठी व उर्दू शाळेसाठी एक-एक पथक तयार केले. मराठीसाठी श्री. भडके यांची नियुक्ती केली. त्यांनी चार-पाच शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. तसेच उर्दु माध्यमाच्या शाळेसाठी डॉ. रझवी यांची नियुक्ती केलेली असून त्यांनी ही पाच-सहा शाळेला प्रत्यक्ष भेट दिलेली आहे. संपूर्ण शाळेवर प्रत्यक्ष पथकाने भेटी दिल्यानंतरच्या त्या शाळेत काय

काय उणिवा आहेत. त्याचा अहवाल येईल. त्यानुसार प्रशासनाकडून कार्यवाही केली जाईल. काही वेळेस शाळा सुरु होण्याच्या अगोदर पथके त्या त्या शाळेवर तपासणी करण्यासाठी गेलेले होते.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** प्रशासनाने पथके स्थापन केली त्याचा अनुभव काय आहे. त्या पथक प्रमुखांनी खुलासा करावा.

**श्रीमती पार्वती मानकापे :** यापुर्वी कमीटी स्थापन केलेली होती. या संदर्भात शिक्षणाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटली. उत्तर दिले नाही. प्रशासनाचे शाळेतील विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होते. गरीब लोकांची मुले मनपाच्या शाळेत आहेत. खाजगी शाळेत गरीब नागरीक मुलांना प्रवेश देऊ शकत नाहीत. मनपाच्या शाळेत सुविधा दिल्या जातात. परंतु शिक्षण बरोबर दिले जात नाही. अशी भावना जनतेच्या मनात झालेली आहे. शिक्षकांना शिस्त नाही. पहिली ते चौथीच्या मुलांना लिहीता वाचता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. यासाठी सदस्यांची कमीटी नियुक्त करावी. केवल अधिकाऱ्यांनी पाहणी करणे सभागृहाला मान्य नाही. सदस्यांची कमीटी नियुक्त करुन अहवाल मागवावा. एका अधिकाऱ्यांनी पाहणी केली त्यावर आजचा विश्वास नाही. दखल घ्या. भेटी द्यायच्या किंवा नाही निर्णय घ्यावा.

**श्री. नंदकुमार घोडेले :** नंदनवन कॉलनी येथील शाळा भटारखाना असे जे वृत्तपत्रात आले त्याची दखल प्रशासनाने दयावी. अश शाळा ठेवण्याची गरज काय असा प्रश्न निर्माण होतो. चौकशी करावी. जो कुणी जबाबदार असेल त्यांचेवर कार्यवाही करावी. वृत्तपत्रात जे चित्र आले ते बरोबर आहे का, उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा.

**श्री. ठकुजी वाणी :** ज्या शिक्षकांच्या बदल्या झाल्या ते बदलीच्या ठिकाणी रुजू झालेले नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

**सौ. शाहीन जफर :** सहा ते आठ महिन्यापासून शाळेवर शिक्षक संख्या कमी आहे. शिक्षक देण्यात यावे.

**मा. सभापती** : पथकाची नियुक्ती प्रशासनाने केलेली आहे. श्री. भडके यांची त्यांचे प्रत्यक्ष भेटीत काय खुल्या आढळुन आल्या त्याबद्दल खुलासा करावा.

**उदयान अधिक्षक :** मागील आठवडयात मला आदेश मिळाले. सहा शाळांना भेटी दिल्या. गिरणी, बन्सीलाल नगर ईटखेडा बनेवाडी या शाळांना मी प्रत्यक्ष भेटी दिल्या. एका शाळेतील माहिती घेण्यासाठी एक ते दीड तासाचा वेळ लागतो. मराठी माध्यमांच्या ५०-५५ शाळा आहेत. त्यात शाळेची स्थिती, फर्निचर मुलांची उपस्थिती किती प्रमाणात शिक्षकांच्या गैरसोयी याबाबत माहीतीचा तक्ता करणार आहोत. त्याचा नमूना दिला आहे. तसेच पिण्याचे पाणी, स्वच्छता, इमारत संख्या, खिचडी वाटपबाबत नियोजन आदींचा समावेश आहे. चौकीदार, शिक्षक रजेवर, अनुपास्थिती, उपस्थिती, दीर्घकालीन रजेवर किती याची तपासणी करावयाची आहे. एकुण ५५ शाळा आहेत. किमान १५ दिवस लागतील.

**श्री. नंदकुमार घोडेले :** नक्षत्रवाडी शाळेतील शिक्षक संख्या कमी आहे. इतर शाळेतील शिक्षकांच्या नक्षत्रवाडी, मिटमिटा हर्सूल, नारेंगाव, चिकलठाणा अशी ठिकाणी बदल्या झाल्यास शिक्षक रुजू होत नाही. जाण्या-येण्यास दूर पडते असे म्हणतात. जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक दहा ते वीस कि. मी. वर पाहुन शिकतात. त्यासाठी ज्या शिक्षकांची बदली केली त्यांना सक्तीने

त्या शाळेत रुजू करण्याचे आदेश दिले जावेत. दंडात्मक कार्यवाही झाली पाहीजे. तर प्रशासनाचा वचक वसेल. शहराच्या बाजूला दूरवर ज्या शाळा आहेत त्या मनपाच्या शाळांमध्ये निश्चितच शिक्षक संख्या कमी आहे. अशी परिस्थिती असेल तर, कमीटी तयार करुन अहवाल प्रशासनाकडे देवून प्रशासनास त्याबाबतीत नियोजन करण्याचे आदेश द्यावेत. तरच काही प्रमाणात शाळांचा दर्जा उंचावेल.

**सौ. शाहीन जफर :** दोन्ही माध्यमातील विद्यार्थ्यांचे शिक्षण चांगल्या पध्दतीने दिले पाहिजे. शिक्षक संख्या आवश्यकतेनुसार देणे गरजेचे आहे व शिक्षकांवर प्रशासनाचा वचक असणे आवश्यक आहे. लहानमुलांची संख्या १०० वरुन २५ वर आलेली आहे. शाळेच्या वेळेत बदल करावा. उपआयुक्त (प्र.) यांना अनेक वेळेस पत्र दिले. लहानमुलांची शाळा दुपारी व ५ वी ७ वी पर्यंतचे वर्ग सकाळी असावेत. काहीच कार्यवाही झालेली नाही. नगरसेवकांनी भेट दिल्यानंतर शिक्षकांचे नातेवाईक प्रशासनावर टाकतात. ज्या शिक्षकांना नोकरी करण्याची इच्छा नसेल त्यांना सक्तीने स्वेच्छानिवृत्ती दयावी.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** शाळेच्या विषयावर दोन महिन्यापासून चर्चा होते आहे. चर्चा झाल्यानंतर मा. आयुक्तांनी सुध्दा गंभीरपणे २१ शाळांचा दर्जाबाबत उल्लेख या सभागृहात केलेला होता. जे की, २१ शाळांच्या दर्जाबाबत उल्लेख या सभागृहात केलेला होता. जे की, २१ शाळांचा दर्जा हा शुन्य आहे. शाळेवर व्हिजीट देण्याबाबत त्यावेळेस प्रशासनास आदेश दिले असते तर अहवाल आजच्या सभेत प्राप्त झाला असता. सध्या शाळांचा अहवाल येईल. आताच खुलासा झाला. ही सर्व कार्यवाही करण्यास शिक्षणाधिकारी कमी पडतात का? नवीन शिक्षणाधिकारी येणार आहे. मागील वेळेस सुध्दा शाळांना भेटी दिल्या होत्या. एका शाळेत २४ विद्यार्थी होते. आता संख्येत वाढ झालेली दिसून येते. नंदनवन कॉलनीचे जे चित्र समोर आले त्या संदर्भात काही नगरसेवक सुध्दा सार्वजनिक कार्यक्रम करण्यासाठी वापर करतात ते टाळले पाहीजे. जेणे करुन असे प्रकार समोर येणार नाहीत. या शाळेला या समितीचे सभापती तसेच काही सदस्यांनी भेट देण्याची गरज आहे. बाजूच्या खाजगी शाळेत ४००-५०० विद्यार्थी व मनपाच्या शाळेत ५८ विद्यार्थी आहेत. आत्मपरिक्षण करणे सुध्दा गरजेचे आहे. मनपाच्या शाळेची इमारत चांगल्यापैकी आहे. विद्यार्थ्यांना गणवेश दिल्या जातात. शैक्षणिक साहीत्य दिले जाते. सर्व सुविधा असतांना शिक्षण घेण्यास विद्यार्थी तयार नाहीत. शिक्षकांवर प्रशासनाचा अंकुश नाही. एकत्रितरित्या सर्व शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्यास शाळेचा दर्जा उंचावू शकतो. शाळेवर सार्वजनिक कार्यक्रम करण्यासाठी जी शिफारस केली जाते ती होऊ नये. अनेक मंगल कार्यालये आहेत. तेथे लग्न समारंभासारखे कार्यक्रम होवू शकतात. तसे आपण आदेश दयावेत. १ आदेशाचे पालन करावे. मॉडेल मिडल शाळेत मी स्वत: भेट दिली. ५ विद्यार्थी होते. दोन गैरहजार दोन शिक्षक उपस्थित होते अशी अवस्था मनपाच्या शाळांची असेल तर, योग्य नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** शाळांच्या इमारती लग्न समारंभ व इतर सार्वजनिक कार्यक्रमासाठी द्यायच्या किंवा नाही सादर विचार केला जाईल.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** सर्वसाधारण सभेत व स्थायी समितीच्या बैठकीत गेल्या चार वर्षापासून अनेक वेळा मनपाच्या शाळांचा दर्जा खालावलेला आहे. म्हणून स.

सदस्य बोलतात. ८१ शाळा असून, २१ शाळांचा दर्जा हा शुन्य आहे. यापुर्वीच मा. आयुक्त यांनी म्हटले होते. मा. आयुक्त यांचे जळगांव शहरातील प्रशासकीय कामाचा अनुभव चांगला असे असतांना गेल्या चार वर्षापासून व मा. आयुक्त तेथे रुजू झाल्यापासून शाळेचा दर्जा सुधारण्याबाबत पोटतिडकीने चर्चा होते. आतापर्यंत प्रशासनाने का कार्यवाही केली नाही. शिक्षक आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांना सोयी सुविधा दिल्या जातात. गणवेश दिला जातो. असे असतांना शैक्षणिक दर्जा ढासळलेला असल्यामुळे दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची संख्या घट आहे. मा. आयुक्त यांनी शिक्षणाधिकारी शिक्षण मुख्याध्यापक यांची एकत्रित बैठक घेऊन शैक्षणिक आढावा होणे गरजेचे होते. (दोन महिन्यात शैक्षणिक दर्जा ढासळलेला असल्यामुळे दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची संख्या घट आहे. मा. आयुक्त यांनी शिक्षणाधिकारी शिक्षक मुख्याध्यापक यांची एकत्रित बैठक घेवून शैक्षणिक आढावा घेणे गरजेचे होते.) दोन महिन्यात शैक्षणिक दर्जात सुधारणा झाली नाही तर वेतन रोखले जातील. अशा प्रकारचा वचक निर्माण करणे आवश्यक होते. लोकप्रतिनिधी जनतेच्या आरोग्य, शिक्षण व शहरातील विकास कामे होण्याच्या दृष्टीने सभागृहात चर्चा, सूचना करतात. मा. आयुक्तांनी २१ शाळांचा दर्जा शून्य आहे असे म्हटले होते आणि तीच परिस्थिती आजही आहे. चार महिने झाले. खेदाने म्हणावे लागते. सुधारणा नाही. चांगले शिक्षक सुध्दा आहेत. त्यांनी चांगले काम केले तर सत्कार सुध्दा करावा. दुमत नाही. सुधारणा करावयाची असेल तर, उपआयुक्त (प्र.) मा. आयुक्त यांची जातीने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. ज्या २१ शाळांचा दर्जा शुन्य आहे. त्या बंद कराव्या. ज्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या आहे. तेथील शिक्षकांवर वचक राहील अशा प्रकारची कार्यवाही करावी. एक एक महिन्याचा रिपोर्ट घ्यावी. एक समिती गठीत करावी. समितीकडून अहवाल घ्यावा व कार्यवाही करावी. मनपाच्या शाळांच्या बबतीत जनता बोलते तेव्हा आम्हास वाईट वाटते. आपण नगरसेवक असून, काहीही करीत नाही असे म्हणतात. भारतीय प्रशासन सेवेचा चांगला अनुभव मा. आयुक्तांना आहे. प्रशासनाचा शाळेवर अंकुश का नाही? अशीच परिस्थिती राहील्यास शाळा ही धर्मशाळा होईल. भटारखाने होतील. नुसतेच शिक्षकांना वेतन वाटप करण्याची वेळ येईल. विद्यार्थ्यांना त्यांचे वडीलांचे नांव लिहीता वाचता येत नाही. ही खेदजनक बाब आहे. एक महिन्याचा अहवाल घ्यावा. शैक्षणिक दर्जा सुधारण्याचा प्रयत्न दिसून आला नाही तर, शिक्षणाधिकारी व शिक्षक यांचे वेतन थांबवावे. या समितीला अधिकार आहे. ज्यांनी चांगले काम केले त्यांना वेतन वाढ द्यावा. याबद्दल दुमत नाही. परंतु जे शिक्षक मुलांना व्यवस्थित शिक्षण देत नाहीत. त्यांचेवर कार्यवाही झाली पाहीजे. २१ शाळांचा दर्जा शुन्य आहे. या शाळांचा दर्जा कसा सुधारेल यासाठी प्रयत्न करावेत.

**श्री. इलियास किरमाणी :** शिक्षण विभागाच्या कामाचा व्याप वाढलेला आहे. या विभागास दोन सुपरवायझर देण्यात यावे. कर्मचारी वर्ग वाढवून देण्यात यावा. पुन्हा पुन्हा चर्चा करण्याची वेळ येऊ नये.

**श्रीमती पार्वती मानकापे :** कमीटी स्थापन करावी. शाळेवर जे शिक्षक मुख्याध्यापक नसतील त्यांना तात्काळ निलंबीत करावे. शिक्षक शाळेवर जातात नि मुलांना पाठांतर

देतात. घरगूती कामानिमित्त शिक्षक बाहेर निघून जातात. अनुपस्थित असतात. शिपाई सुध्दा गैरहजर असतात. त्यांचेवर सुघ्द कार्यवाही झाली पाहीजे.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** पालक मेळावा होण्याची आवश्यकता आहे.

**उपआयुक्त (म) :** महापालिकेच्या शाळांच्या बाबतीत अनेक त्रूटया आहेत. जे शिक्षक दीर्घकालीन रजेवर जातात त्याचा परिणाम शैक्षणिक दर्जा कमी होण्यावर व विद्यार्थ्यांवर निश्चित होतोच. परीक्षेची वेळ जवळ आलेली आहे. विद्यार्थी चांगल्या गुणवत्तेने पास होणे आवश्यक आहे. शाळेवर लाईट, पाणी, फर्निचर व इतर लहान मोठया सुविधांचा अभाव आहे. मागील स्थायी समितीने दिलेल्या सुचना नुसार पथके निर्माण केलेली आहेत. ते पथक सविस्तर प्रत्येक शाळेतील माहिती होतील. तसेच ज्या शाळेतील शिक्षक मुलांना व्यवस्थित शिकवित नाही. सतत अनुपस्थित राहतात. त्यांचेवरही कडक कार्यवाही केली जाईल. तशा सूचना सर्व शाळांना दिल्या जातील. पथके सध्या प्रत्येक शाळेवर जाऊन पाहणी करीत आहे. आठ दिवसांत अहवाल प्राप्त होईल व पुढील बेठकीत अहवाल ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**श्रीमती पार्वती मानकापे :** शाळांतील समस्या, शिक्षकांच्या समस्या विद्यार्थ्यांच्या समस्या ज्या ज्या त्रुटया असतील त्याची ताबडतोब माहिती घेऊन कार्यवाही करणे आवश्यक आहे. वेळ होऊ देवू नये. यात गरीब मुलांचे शैक्षणिक नुकसान घेत आहे. समितीचे सदस्य पाहणीसाठी दयावे. प्रशासनाच्या पथकावर आमचा विश्वास नाही.

**मा. सभापती :** उद्यापासून शाळेवर भेटी देण्यासाठी जे जे येण्यास ईच्छुक असतील त्यांची यावे. शाळांना भेट देण्यासाठी मी. स्वत: येईल. ज्या ज्या शाळेवर साहित्य नसेल तसेच ज्या साहीत्याची कमतरता आहे त्याबद्दल प्रशासन कार्यवाही करेल. शिक्षक वेळेवर येतात की नाही. शिकवितात की नाही हे सुध्दा तपासले जाईल. मुलांना शिकवत नसतील तर कार्यवाही होईल ज्या शिक्षकांच्या बदल्या होवूनही ते रुजू होत नसतील तर कार्यवाही करण्यात यावी. हर्सुल, नारेगांव, मिटमिटा नक्षत्रवाडी भागातील शाळेत महिला शिक्षका आहेत. पुरुष शिक्षक बदल्या करुनही अशा शाळेवर जाण्यास इच्छुक नसतात त्यांचेवर कार्यवाही होईल. आठ दहा दिवसांत संपूर्ण शाळांची पाहणी करण्यात येईल. वृत्तपत्रांत ज्या शाळांचा उल्लेख आहे. त्या शाळेवर उदयाच पाहणी करण्यात येईल.

**श्री. इलियास किरमाणी :** तापडीया नाट्यगृहाचे अनाधिकृतरित्या बांधकाम आले. नोटीस देऊन दीड महिना झाला. काय कार्यवाही केली. वाणिज्य वापर होतो आहे. सदर जागा शैक्षणिक झोनमध्ये आहे. आतापर्यंत प्रशासनाने संबंधित मालकाविरुध्द का कार्यवाही केलेली नाही. गरीब व्यक्तीच्या रस्त्यावरील टप४या उचलुन आणल्या जातात. तापडीया नाट्यगृहाची इमारत आहे ती अनाधिकृत उभी आहे. त्यासंबंधी दीड महिन्यापूर्वीच या सभागृहात अहवाल प्राप्त झाला. अदयाप सील केले नाही. त्याबाबतीत का मवाळ धोरण ठेवण्यात येते.

**सहा. संचालक नगररचना :** दि. ०७-११-०३ रोजी या नाट्यगृहाच्या बांधकामाबाबत संचालक नगररचना महाराष्ट्र राज्य पुणे, यांचेकडे मार्गदर्शन मागविण्यात आलेले

आहे. दि. २६-१२-०३ रोजी संबंधितास नोटीस प्राप्त झालेली आहे. त्यावर उत्तर सादर केलेले असून, सुनावणी करण्याबाबत संधीची मागणी केलेली आहे. एक महिन्याच्या मुदतीच्या आत न्यायालयात गेलेले आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** न्यायालयात प्रकरण गेले असले तरी, कोणतीही स्थगिती आदेश मा. न्यायालयाकडुन अदयाप प्राप्त नाही. कार्यवाही करता येते. त्या इमारतीला सील करु शकतो. या नाट्यगृहात जितिव वा वित्त हानी झाल्यास जबाबदार कोण असा प्रश्न येतो. न्यायालयात ५० वर्ष वाद चालेल. संबंधिताने नियमाने उल्लंघन केलेले आहे. प्रशासनाने वेळीच कार्यवाही केली नाही तर मी जनहित याचिकेद्वारे न्यायालयात जाईल व सहा. संचालक नगररचना, उपआयुक्त व आयुक्त यांना पार्टी राहतील. याची सुध्दा दखल घ्यावी. मोठे बिल्डर्स आहेत. म्हणून प्रशासनावर दबात येतो का?

**श्री. रतनकुमार पंडागळे :** अनाधिकृत बांधकाम केले असेल तर, कार्यवाही करण्यास हरकत नसावी वेळ होता कामा नये. मुख्य लेखाधिकारी तथा मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अहवाल प्राप्त आहे. त्यानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**सहा. संचालक नगररचना :** दि. ०७-११-०३ रोजी संचालक नगररचना पुणे यांना का पाठवून मार्गदर्शन घेण्यासाठी विचारणा केलेली आहे.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** पत्र पाठविण्याची आवश्यकता नव्हती. मुख्य लेखापरिक्षक यांचा अहवाल आहे. संबंधित व्यक्तीला अधिकारी पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**मा. सभापती** : यासंबंधी पाठपुरावा करावा व पुढील बैठकीत सविस्तर खुलासा सादर करण्यात यावा.

**श्रीमती पार्वती मानकापे :** काल्डावर काय कार्यवाही केली माहित नाही. मला खुलासा दिलेला नाही.

**सहा. संचालक नगररचना :** काल्डानगर येथील खुल्या जागे संदर्भात न्यायालयात प्रकरण दाखल झालेले आहे. विधी विभागाच्या संबंधित येते.

**विधी सल्लागार :** काल्डा नगर येथील ओपन स्पेसच्या संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असून, प्रकरण खालच्या न्यायालयात होते. सर्व कागदपत्र मनपाच्या वतीने सादर करण्यात आलेले आहेत. खालच्या कोर्टाने जो निकाल दिला त्यास आव्हान म्हणून संबंधीताने उच्च न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे. त्या प्रोसेडींगला स्थगिती दिलेली आहे. मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत त्या प्रकरणी कार्यवाही करता येणार नाही.

**श्रीमती पार्वती मानकापे :** उशीरा कार्यवाही होत असल्याचा कायदा होत संबंधिताने प्रकरण न्यायप्रविष्ट केले यात मनपाचे नुकसान होते यास जबाबदार कोण?

**विधी सल्लागार :** सदरील प्रकरणात अंतिम निर्णय झालेला नाही. तात्पुरता आदेश होता त्याविरुध्द न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे.

**श्री. इलियास किरमानी :** न्यायालयात जाण्याची संधी दिली जाते. वेळीच कार्यवाही होत नाही. स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करावा.

**मा. सभापती** : ताबडतोब पाठपुरावा करावा. कोणाच्या चुकीमुळे होते ते तपासावे.

**श्री. नंदकुमार घोडेले :** प्रकरण न्यायप्रविष्ट असेल हा भाग वेगळा. परंतू अगोदरची जी परिस्थिती होती की, संबंधिताने पी. आर. कार्ड स्वत:चे नांव नोंद करुन घेतले. त्यास जबाबदार कोण. त्यासंबंधी वेगळी चौकशी सुरु करावी जबाबदार अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी. जागा संपादीत

केल्यानंतर मनपाचे नावाचे पी. आर. कार्ड असावयास पाहिजे होते. न्यायालयात प्रकरण असेल म्हणून सर्वच कार्यवाही थांबवून ठेवणे योग्य नाही. दहा-दहा वर्षे न्यायालयात प्रकरणे चालतील.

**श्रीमती पार्वती मानकापे :** मनपाच्या नावांची नोंद असलेली सर्व कागदपत्रे फाडलेली आहेत. यासाठी चौकशी समिती नियुक्त करावी. संबंधित व्यक्तीने स्वत:चे नांव पी. आर. कार्डवर घेतले यात मनपाचे अधिकारी यांची मिटींगात झालेली आहे. चौकशी समिती गठीत करुन पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

**मा. सभापती** : काल्डा नगर येथील जागेच्या संदर्भात श्री. एम. पी. खैरनार, मुख्य लेखाधिकारी यांनी तात्काळ चौकशी अहवाल सादर करावा.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** आरोग्य विभागातील दोन डॉक्टरांनी (डॉ. स्नेही व डॉ. भीडे) सेवनिवृत्ती घेतलेली आहे. दोन जागा सध्या रिक्त आहेत. मनपात जे कार्यरत डॉक्टर्स आहेत. त्यांना पात्रतेनुसार घेण्यात यावे. दोन वर्ष झाले जागा रिक्त ठेवण्याची गरज काय? अस्थापना विभागांमार्फत तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात यावे. प्रशासनाकडुन खुलासा घेण्यात यावा.

**मा. सभापती** : उपआयुक्त (प्र.) सभागृहात उपस्थित नाहीत. नंतर खुलासा देण्यात येईल.

**श्रीमती पार्वती मानकापे :** १८ गाठीचा मुद्दा मी चार-पाच बैठकीपासून उपस्थित करीत आहे. योग्य तो खुलासा मला दिला जात नाही. प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. तीन गाठीचा कागदपत्रासहीत पुरावा माझ्याकडे आहे.

**सौ. शाहीन जफर :** प्रत्येक वेळेस स. सदस्या १८ गाठीचा प्रश्न उपस्थित करीत आहे. सविस्तर खुलासा होत नाही. हे योग्य नाही.

**मा. सभापती** : जकात अधिक्षक यांनी सविस्तर खुलासा द्यावा.

**जकात अधिक्षक :** व्हि. आर. एल ट्रान्सपोर्ट मार्फत जो माल आयात झाला होता त्यापैकी तीन जगाची ७२,०००/- रु. जकातीपोटी वसूल केलेले आहेत. १८ जगाचा मेनूमध्ये उल्लेख असला तरी तो माल मनपाच्या हाताला लागला नाही. व्ही. आर. एल. ट्रान्सपोर्ट यांचेकडे चौकशी केली. त्यांचे पुर्वीचे जे ऑफीस होते तेथे सुध्दा चौकशी केली. पत्र दिले. समर्पक असे उत्तर मिळालेले नाही. मनपाचे विधिज्ञ श्री. व्ही. डी. सोमन यांचेकडे संबंधित कंपनीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत संचिका दिलेली आहे. गुन्हा दाखल करण्यासाठी मुद्देमाल आवश्यक आहे. तो पर्यंत गुन्हा दाखल करता येत नाही. संचिका सादर केली असून, सध्या विधी सल्लागार यांचेकडे संचिका आहे.

**श्रीमती पार्वती मानकापे :** तीन गाठीबद्दल मी माहीती दिली. नंबर दिले. मुद्देमाल मिळत नाही. असे बोलणे योग्य नाही.

**जकात अधिक्षक :** ज्या तीन गाठीची आपण माहिती दिली त्या एल. आर. वर नांव गांव नाही. दुकान दाराकडे तो माल आढळुन आल्यास छापा घातला जाईल. यापुर्वी अनेक ठिकाणी छापे मारलेले आहेत. दिवाळी दसरा या काळात छापे घातले तर छापे घालु दिले नाही. तुम्हाला प्रॉब्लेम येईल असे बोलतात.

**श्रीमती पार्वती मानकापे :** छापे कोणी टाकु दिले नाही. खुलासा करावा.

**श्री. इलियास किरमानी :** ही बोलण्याची पध्दत नाही.

**जकात अधिक्षक :** माझ्या कार्यकक्षेत मला जेवढे अधिकार दिले त्याप्रमाणे कार्यवाही चालु आहे.

**सौ. शाहीन जफर :** एक महिला सदस्य पोटतिडकीने प्रश्न मांडतात. त्याचा खुलासा करतांना जोरजोराने खुलासा करणे अधिकाऱ्यांना न शोभणारे आहे. सविस्तर खुलासा उपआयुक्त (म) यांनी करावा.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** स. सदस्या व संबंधित अधिकारी आणि आपण एकत्रित बसून हा प्रश्न निकाली काढावा.

**उपआयुक्त (म) :** व्हि. आर. एल. कंपनीचे १८ डागाबद्दलची चर्चा होत आहे. एकुण २१ डागापैकी ३ डगावर छापे मारुन जकात अधिक्षक यांनी अचानक पकडले होते. उर्वरीत डगाचे एल. आरस होते. परंतू मूळ व्हौचर जकात अधिक्षक यांना प्राप्त झालेले नव्हते. म्हणून संबंधित ट्रान्सपोर्ट कंपनीचे मूळ ऑफिसकडे व्हॉचर्स व इतर माहितीची मागणी केलेली होती. जर व्हॉचर दिले नाही तर कलम ३९८ खाली पोलीसात गुन्हा दाखल होईल असेही कळण्यिात आलेले आहे. त्यानुसार मुदत संपल्यानंतर सर्व रेकॉर्ड विधिज्ञ श्री. सोमन यांचेकडे दिलेले आहेत. त्यानुसार जकात अधिक्षक यांना पोलीस गुन्हा दाखल करण्याची सूचना केलेली आहे. गुन्हा दाखल करण्यासाठी सूचना केलेली आहे गुन्हा दाखल करण्यासाठी एल. आर. वगळता इतर पुरावे मनपाकडे काहीही नाही. नुसते एल. आर. या कागदपत्रातवर न्यायालयात प्रकरण चालविणे अडचणीचे होईल असे. ॲड सोमन ह्यांचे म्हणणे होते. ड्राफ्टींगचे काम पूर्ण झालेले आहे. दोन तीन दिवसात जे उपलब्ध कागदपत्रे आहेत. त्या आधारे गुन्हा दाखल करण्यात येईल.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** ज्या कंपनीने जकात चुकवून माल आपला त्याच कंपनीचा माल गुन्हा शहरात येतो का? येत असेल तर बंद करावा.

**जकात अधिक्षक :** त्या कंपनीचा माल शहरात आयात होतो. परंतु जकात पावती दिली जाते. जकात वसूल करण्यात येते.

**उपआयुक्त (म) :** सदर कंपनीचा येणाऱ्या मालाची ओपन डिलेव्हरी घेण्यात येवून जकात वसूल केला जातो.

**मा. सभापती :** या संदर्भात जे कागदपत्र मनपाकडे उपलब्ध आहेत. त्या आधारे पोलीस गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. आताच जकात अधिक्षक यांनी ज्या पध्दतीने खुलासा केला त्यात सुधारणा करावी. इतर व्यवस्थित द्यावे. याची दखल दयावी स. सदस्या पोटतिडकीने प्रश्न मांडतात. सदस्यांच्या प्रश्नाची उत्तरे दिले पाहीजेत.

**सौ. शाहीन जफर :** चिकलठाणा येथे एक कंपनी आहे. पुर्वीही मी प्रश्न उपस्थित केलेला होता. सदर कंपनीवर मनपाने दि. १६-१२-२००३ रोजी २० लक्ष दंड आकारणी केली. सदर कंपनीने ९ लक्ष रुपये मनपाकडे भरणा केले. ११ लाखाचा प्रश्न आहे. संबंधितास न्यायालयात जाण्याची संधी देण्यात आली. कंपनीला सील केले. संबंधित व्यक्ती न्यायालयात गेले. जे ९ लक्ष जमा झाले ते न्यायालयात दयावे लागते. वेतन टेक्सटाईल कंपनीला सील केले तेव्हा विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेतला. त्याप्रमाणे या कंपनीला दंड आकारणी केली. त्यानंतर सील करण्यापुर्वी विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेण्याची आवश्यकता का भासली नाही. यात मनपाचे नुकसान आलेले आहे. यापुर्वी मी सुध्दा उपस्थित केलेला होता. या बैठकीत खुलासा करणार होते खुलासा देण्यात यावा. २० लक्ष रुपये कोण भरणा करणार आहे यास जबाबदार असणारे अधिकारी/कर्मचारी यांना निलंबीत करावे. २०

लक्षचे नुकसान झाले. भविष्यात ४०-६० लक्ष होवू शकते. असे प्रकार होत राहील्यास मनपातील विकास कामे करण्यास आर्थिक अडचण भासेल. महापालिकेचा भविष्यात विकास होणार नाही.

**जकात अधिक्षक :** सदर कंपनीचा ११ तारखेला १९ किलो माल विना जकात शहरात येत असतांना, पकडण्यत आलेला होता. सदर कंपनीने मागील चार-पाच वर्षात किती जकात चोरी केली ते तपासून मा. आयुक्त उपआयुक्त, यांचे निर्दशनास ही बाब आणुन दिलेली होती. रविवारचा दिवस होता. तारीख ११-१२-१३ यात दोन दिवस सुटी होती. १३ तारखेला संबंधित व्यक्ती न्यायालयात गेले. ३९८ प्रमाणे जी जबाबदारी मनपाने दिवस केलेली होती ती योग्य नाही. असे न्यायालयाचा निर्णय होता.

**सो. शाहीन जफर :** मनपाने संबंधितावर २० लक्ष दंड आकारणी केले व ९ लक्ष मनपात जमा झालेले होते. कंपनीला सील लावण्यात आले. विधी सल्लागार यांचा सल्ला घेतला नाही. वतन टेक्सटाईल मिल सिल करते वेळी विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेतला होता. न्यायालयात जाण्याची संधी देण्यात आलेली आहे.

**जकात अधिक्षक :** वतन टेक्सटाईल कपंनी सुध्दा न्यायालयात गेलेले आहे. न्यायालयाचे डायरेक्शन होते. त्यानुसार कार्यवाही गेलेली होती. कोर्टाच्या आदेशानुसारच सील काढण्यात आलेले होते. नॅशनल लॉस होऊ नये म्हणून कोर्टाने सील काढण्याचे आदेशीत केलेले होते. मा. उच्च न्यायालयाचे निणैय आहेत त्यानुसार कार्यवाही झालेली आहे.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** आरोग्य विभागातील दोन वैदयकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. ती कार्यवाही अंतर्गत आहेत.

**उपआयुक्त (प्र.) :** आठ पदे भरण्यात आलेली आहेत. ती कार्यवाही अंतर्गत आहेत.

**श्री. नंदकुमार घोडेले :** या आधीपासून अनाधिकृत वस्त्यांमध्ये पाणी पुरवठा केला जात होता. प्रत्येक कुटुंबाकडुन वार्षिक रु. ६००/- होऊन टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत सर्वसाधारण ठराव सुध्दा पारीत केलेला आहे. टँकर चालु ठेवावे ते बंद करु नये. नागरिकांकडुन वसूली करण्यात येईल. ऐन उन्हाळयाच्या दिवसात पाणी पुरवठा खंडीत करणे योग्य नाही.

**श्रीमती पार्वती मानकापे :** उन्हाळ्याचे दिवस सुरु झाले. परिस्थिती बिकट आहे. नागरीकांना पाणी देणे गरजेचे आहे. प्रत्येक कुटुंबाकडुन ६००/- रुपये घेण्यात यावे.

**श्री. ठकुजी वाणी :** माझ्या वॉर्डात सुध्दा टॅकरद्वारे पाणी येते. एका घरासाठी किमान दोन ड्रम पाणी मिळावी. अशी नागरिकांची मागणी आहे. ६००/- रुपये देण्यास लोक तयार आहेत.

**श्री. नंदकुमार घोडेले :** पुर्वी ज्याप्रमाणे पाणीपुरवठा सुरु होता. त्याप्रमाणे चालु दयावा. शासनाचे सुध्दा निर्देश आहेत. ६००/- रुपये भरणा करण्यास जनता तयार आहे. त्यांना सवलत दयावी. प्रत्येक व्यक्तीच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** पुंडलीकनगर व इतर काही अनाधिकृत भागात ९ टँकरद्वारे पाणी पुरवठा होत होता. पाणी पुरवठा होत होता. उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे पाण्याची पातळी खाली गेलेली असून, ज्यांच्याकडे हातपंप होते. त्यांना पाणी नाही म्हणून मनपाकडे जास्त प्रमाणात पाणी पुरवठा करण्याची मागणी होत आहे. मागील वर्षी असा निर्णय घेण्यात आलेला होता की, गुंठेवारी कायदा अंतर्गत ज्या काही वसाहती अधिकृत होतील. या वसाहतीत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात यावा. या वसाहतीत पाण्याच्या पाईपलाईन

टाकलेल्या नाहीत व तरतुद सुध्दा केलेली नाही. त्यासाठी अशा वस्त्यांमध्ये प्रत्येक कुटुंबाकडुन वर्षाला ६००/- रुपये पाण्यापोटी घेण्यात यावे. असा ठराव पारीत केलेला होता. त्यानुसार दोन-तीन महिन्यांपासून अंमलबजावणी होत आहे. २.७५ लक्ष रुपये जमा झालेले आहेत. जनतेकडुन अपेक्षीत प्रतिसाद मिळत नाही. आपण थांबविले तर जे भरणा करणारे तेही भरणा करणार नाही. आपण सवलतीच्या दराने देत आहोत. पाणी देण्याचे बंद केलेले नाही. दोन दिवस बंद होते. आता चालु केले. आपण लोकांना आवाहन केले आहे.

**श्रीमती पार्वती मानकापे :** पाणी वाटप करण्यासाठी कचऱ्याच्या गाडया घेतल्या जातात. तसे होवू नये. साफसफाई सुध्दा झाली पाहीजे. कचरा वेळेवर उचलला पाहीजे याची सुध्दा काळजी घेतली जावी. पाण्यासाठी टँकर भाडयाने घेण्यात यावेत.

**मा. आयुक्त** : पाण्याला जीवन म्हटले. आपण आपल्या भावना व्यक्त केल्या त्या बरोबर आहेत. कालच वृत्तपत्रात बातमी वाचल्यानंतर कार्यकारी अभियंता (पा.पु) यांना अशा सुचना केल्या कुठल्याही परिस्थीतीत पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये व खंड पडता कामा नये. यावर वेगळया सूचना करण्याची गरज नाही. पाणी फुकट येत नाही. संबंधित भागातील काही नागरीक माझ्याकडे आलेले होते. त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्या भावना आयुक्त म्हणून मला मान्य आहेत. १० मिनिटे मी त्यांच्याशी चर्चा केलेली आहे. त्या भागांमध्ये काम करीत असतांना जसे रस्त्यांचे काम आहे ते करणे आवश्यक रुंदीचे नसतील काम करण्याचे बाकी आहे. अनाधिकृत वसाहत असल्यामुळे दोन्ही अधिकाऱ्यांना तशा सूचना दिलेल्या आहेत. त्या भागात एकीकडे टँकरद्वारे पाणी देत असतांना भविष्यात त्या भागात पाईप लाईन टाकण्याच्यादृष्टीने अंदाजपत्रके बनवावी व गुंठेवारी कायदयाअंतर्गत त्या त्या भागासाठी नवीन पाईप लाईन टाकण्याची गरज पडल्यास जनतेकडुन निधी जमा करावा लागेल. ही कार्यवाही याबरोबरच करावी लागेल. हा उन्हाळा गेला तरी पुढील उन्हाळयामध्ये पाण्याची अडचण भासणार नाही. पुर्वी राज्य शासनाचे २२-१५ असे लेखाशिर्ष टंचाईग्रस्त भागात ग्रामीण/शहरी असे यासाइी शासन अनुदान देते. राज्य सरकारने नगर विकास विभागाकडुन टंचाईच्या काळात पिण्याच्या पाण्यासाठी जे अनुदान आहे ते अदयाप या मनपास मिळालेले नाही. मनपाने विभागीय आयुक्तांमार्फत केलेली कार्यवाही व त्यावर होकार किंवा आजपर्यंत निधी प्राप्त झालेला नाही. म्हणून त्या निमित्याने संबंधित अधिकारी यांना अशा सूचना दिलेल्या आहेत की, कोणत्या भागात टँकरच्या दररोज किती खेपा होतात. मनपास किती खर्च येतो याचा तपशील होऊन मुंबईला शासनाकडे जावे लागेल व जसे इतर शहराला टंचाईच्या काळात पिण्याच्या पाण्यासाठी निधी प्राप्त होतो तसा या शहरासाठी प्राप्त करुन घ्यावा. असा या प्रशासनाचा आग्रह राहील.

**मा. सभापती** : पिण्याच्या पाण्याची नागरिकांना अडचण येऊ नये. टँकर चालु ठेवावे. टँकर नसतील तर भाडयाने घ्यावे. कचरा वाहुन नेणाऱ्या गाडया (वाहने) पाण्याच्या टँकरसाठी घेऊ नयेत.

**विषय क्र. १०५ :**

दिनांक १४-०१-२००४ व दि. ३०-०१-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. रतनकुमार पंडागळे :** मागील बैठकीत मयुरनगर भागातील विकास कामे होण्याबाबत प्रश्न उपस्थित केलेला होता. उत्तर मिळाले नाही. तेथील नागरिकांनी १०० टक्के विकास खर्च भरलेला आहे. ड्रेनेज लाईन नाही, पाण्याची व्यवस्था नाही. रस्ते नाहीत.

**सहा. संचालक नगररचना :** मयुरपार्क येथील ड्रेनेज लाईन बाबतचा खुलासा असा की, ३६ मीटरचा डी. पी. प्लॅनमधील रस्ता आहे. ती तालुका निरिक्षक भुमी अभिलेख यांनी निश्चित करावयाची आहे. रस्त्याची आखणी झाल्याशिवाय जागेवर पाईप लाईन टाकता येणार नाही. मनपा हद्दीमध्ये अशा अडचणी आहेत की, गट नंबर सर्व्हे नंबरची हद्द डेव्हलपमेंट प्लॅन वरील हद्द यात फरक जाणवतो. हद्द निश्चित करुन होणे आवश्यक आहे.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** मा. आयुक्तांनी सुचना करुन कार्यवाही झालेली नाही. प्रत्यक्ष जागेवर पाहणी करण्यास सांगितलेले होते. तेथील लोकांनी ३.४७ कोटी रुपये बेटरमेंट चार्जेस भरलेले आहे. पाईप लाईन टाकु शकत नाही. दहा हजार लोकांचा प्रश्न आहे. कुणी न्यायालयात गेले तर मनपाची बदनामी होईल.

**मा. सभापती** : जनतेचे आरोग्य धोक्यात येवू शकते बेटरमेंट चार्जेस भरणा केल्यानंतर सुविधा देणे गरजेचे आहे.

**सहा. संचालक न. र. :** समन्वय साधण्याचे काम दुय्यम आवेक्षक करतात. पाहणी केलेली आहे. गट नंबर व सर्व्हे नंबर जे आहेत ते डेव्हलपमेंट प्लॅननुसार दिसून येत नाही.

**श्री. नंदकुमार घोडेले :** मनपाकडे जो नकाशा आहे. त्यावर हद्द निश्चित केलेली असेलच. त्यानुसार कार्यवाही करावी ०२ मार्चपासून निवडणूक आचारसहीत लागण्याची शक्यता आहे. लवकरात लवकर काम करण्यात यावे.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** एकुण ३२ रेंखाकन आहेत. दहा हजार वस्तीचा प्रश्न आहे.

**मा. सभापती** : नागरीकांना वेठीस धरण्याचा प्रयत्न होत आहे. असा अर्थ निघतो.

**सहा. संचालक नगररचना :** दोन दिवसांत कार्यवाही करण्यात येईल.

**कार्य. अभियंता (ड्रे/वि) :** जमिनीबद्दल आखणी करुन एन ओ. सी. घ्यावयाची आहे. पाच लोकांचे एन. ओ. सी. मिळाले.

**मा. आयुक्त** : टेंडर काढण्याची कार्यवाही करावी. जेव्हा प्रत्यक्ष काम करावयाचे आहे. त्यावेळी कार्यवाही करता येईल.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** १८-०१-२००८ च्या बैठकीत मी गट क्र. १२ कांचनवाडी येथील जागेच्या संदर्भात प्रश्न केलेला होता. जो अहवाल मला प्रशासनाने दिलेला होता. त्यावर चर्चा केली होती. अहवालातील त्रुटया राहीलेल्या होत्या. त्यासाठी मा. आयुक्त यांनी १५ दिवसांचा कालावधी दिलेला होता. सदरच्या बांधकामाबद्दल प्रशासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे. खुलासा करण्यात यावा.

**सहा. संचालक न. र. :** गट क्र. १२ कांचनवाढी संदर्भात संबंधितास कलम ५२, ५३, ५४ खाली १४-०१-२००८ रोजी नोटीस देण्यात आलेली आहे. नोटीसची मुदत ३० दिवसाची असून, १३-०२-२००४ रोजी मुदत संपेल. त्यानंतर पूढील कार्यवाही केली जाईल. संबंधिताचा खुलासा आलेला आहे. परंतू एक त्रुटी बाबत जो खुलासा केला तो बरोबर वाटत नाही. त्यानुसार कार्यवाही करावी लागेल. २ त्रुटयांमध्ये दयेय आहे. पण परवानगी घेतली नाही. एका त्रुटीवर १३ तारखेनंतर कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : १३ तारखेनंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. इलियास किरमानी :** जालना रोड ते गुलशन महल व्हाया दगडी महल हा डी. पी. प्लॅनचा रस्ता आहे. चार वर्षापासून रस्त्याचे काम प्रलंबित आहे या कामात रस होवून व अग्रक्रम देवून करण्यात यावे. कमीटी स्थापन करावी व काम चालु करावे.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** तो अत्यंत महत्वाचा डी. पी. रोड आहे. या काळात १७२ झोपडया घरे काढुन तो रस्ता केलेला होता. मागील वेळेस उपसंचालक नगररचना, मा. आयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी केलेली होती. सदर विभागाचा कोणताही भाग रस्त्यामध्ये येत नाही. पाण्याच्या हौदाचा थोडासा भाग येतो. त्यामुळे काम थांबलेले असेल, म्हणून त्यासाठी मा. आयुक्त यांनी स्वतः उपसंचालक नगररचना यांची प्रत्यक्ष भेट घेवून हा प्रश्न निकाली काढावा. शहरातील अत्यंत महत्वाचा रस्ता आहे.

**मा. आयुक्त** : रस्त्यात थोडासा भाग येतो. म्हणून मी व स. सदस्य कैसरखान आम्ही प्रत्यक्ष भेट दिली. दोन वेळेस पाहणी केली. जो नकाशा तयार केलेला आहे. त्यात दगडीमहल हा रस्त्याच्या मध्यभागी दर्शविलेले आहे. थोडासा भाग येतो. मध्यभागात येते. सहा. संचालक न. र. यांनी खुलासा करावा.

**सहा. संचालक न. र. :** दगडी महल हे रस्त्याच्या मधोमध येते.

**श्री. कैसरखान :** दगडी महल पर्यंत ३० फूट रस्त्याचे काम झालेले आहे. पूर्ण तोडावे. मा. उच्च न्यायालयाचा निर्णय आहे. ९ ते ४५ मीटर मधील सर्व क्लीअर करावे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**सहा. संचालक न. र. :** स्ट्रक्चर पुर्वीचे आहे. रस्ता नंतर केलेला आहे. न्यायालयाचे अतिक्रमणाच्या संदर्भात निर्देश आहेत.

**मा. आयुक्त** : उच्च न्यायालयाचे निर्देश स्ट्रक्चर काढल्या बद्दलचे नसावेत. दोन्ही बाजूने जागा निघू शकत असेल तर, मार्ग काढावा असे निर्देश मी सहा. संचालक यांना दिलेले होते. काहीच कार्यवाही होवू शकत नसेल तर, आखणी बदलुन दयावी. रस्ता तर झालाच पाहीजे. काही ठिकाणी लहान असणे बरोबर असणार नाही. केंद्र सरकारच्या विभागाकडे या संदर्भात चौकशी केली. राज्य शासनाच्या अखत्यारीत असून, त्या विभागात श्री. जोशी नावाचे अधिकारी आहेत. त्यांचेशी चर्चा करुन हा प्रश्न मार्गी लावता येईल.

**श्री. नंदकुमार घोडेले :** बायोमेडीकल वेस्ट संदर्भात एजन्सीला ३१ जानेवारी क्र. २९१ नुसार नोटीस दिलेली आहे. त्यानुसार त्यांनी अहवाल दिला. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मनपाचा प्रकल्प सुरु होणे गरजेचे होते. मनपाचे बायोमेडीकल वेस्टचे जे सदस्य झालेले आहेत. त्यांचे मनात सभ्रम निर्माण झालेला आहे. जो प्रकल्प चालु होता तो बंद केला. पुन्हा सुरु केलेले नाही. सुरु झालेला असेल तर जाहीर प्रगटन करावे. तसेच जो सभ्रम डॉक्टर

मंडळी मध्ये झालेला आहे. तो दूर करावा. वाढत्या कचऱ्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

**मा. आयुक्त** : बायो मेडीकल वेस्ट प्रकल्प कार्यान्वीत झालेला आहे. औपचारीक उद्‌घाटन करण्यासाठी आपणाकडे वेळेची मागणी केलेली होती. पदाधिकाऱ्यांनी वेळ निश्चित केलेली नाही. मा. महापौरांचा राजीनामा वैगेर यामुळे ही वेळ पुढे गेलेली आहे. जी सूचना केली ती बरोबर असून, मा. उच्च न्यायालयात मनपाने जे प्रतिापत्र दिले त्यात मनपाने बाजू योग्य पध्दतीने मांडलेली आहे. अधिक माहीती विधी सल्लागार देतील. अपेक्षीत आहे की, मनपाच्या बाजूने निर्णय लागेल.

**विधी सल्लागार** : नेचर नीड या कंपनीच्या बायो मेडीकल वेस्टच्या संदर्भाने मनपा आरोग्य वैदयकिय अधिकारी यांनी नोटीस दिलेली आहे. शहरातील बायोमेडीकल वेस्ट कलेक्ट करण्यासाठी मनपाने वॉटरग्रेस प्रॉडक्ट यांना वेळा दिलेला आहे. असे असतांना नेचरनीड यांना मनपाने कोणताही अधिकार दिलेले नसतांना मनपाची ना हरकत प्रमाणपत्र नसतांना शहरातील कचरा जमा करुन बाहेर ठिकाणी त्याची खतनिर्मिती करण्यात येते. या दृष्टीने अधिकार प्राप्त नसल्याने हा प्रकल्प थांबवावा म्हणुन नोटीस दिलेली आहे. या नोटीसच्या आधारे संबंधिताने मा. उच्च न्यायालयात प्रकरणत दाखल केलेले आहे. मनपाच्या वतीने सर्व कागदपत्र सादर केलेले असून, अधिकार प्राप्त नसतांना जमा करुन फायदा करुन घेत आहे. म्हणून दिलेल्या नोटीस ही वैध असून, कायदेशीर आहे असे मत मांडलेले आहे. नाशिक मनपा हद्दीत सुध्दा अशीच कार्यवाही या कंपनीने केली होती. तेथील प्रकरणही न्यायालयात होते. तेथेही त्यांना रिलिफ मिळाले नाही. त्याचाही संदर्भ सादर केलेला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असून, मनपा मार्फत होत असलेली कार्यवाही वैध आहे.

**मा. सभापती** : बायोमेडीकल वेस्ट प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्यात यावा. इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक १४-०१-२००४ व दि. ३०-०१-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणीपुरवठा योजनेच्या नक्षत्रवाडी ब्रुस्टर पंपगृह येथे ३०० अश्वशक्ती व्ही. टी. पंपाचा पुरवठा करणे, उभारणी करणे व त्याची समाधानकारक चाचणी देणे या कामासाठीची मे. रेणुका इलेक्ट्रीक कंपनी यांची ज्योती बनावटीच्या ३ स्टेज पंपासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९% कमी दराची निविदा स्थायी समितीने मंजुर केल्यानंतर मे. रेणुका इलेक्ट्रीक कंपनी, औरंगाबद यांचेशी करारनामा करुन कार्यादेश देण्यात आला आहे.

मे.रेणुका इलेक्ट्रीक कंपनी, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. दि. २३-१२-२००३ अन्वये कळविले आहे की, ज्योती बनावटीच्या पंपाचा पुरवठा कालावधी कमीत कमी ६ ते ८ महिन्याचा आहे असे ज्योती कंपनीने त्यांना कळविले आहे त्यामुळे सदरील काम निविदेतील मुळ कालावधीत (सहा महीने) पुर्ण करता येणार नाही. त्यामुळे त्यांनी मे. मॅथर ॲन्ड प्लॅंट

कंपनीकडे पंपाच्या पुरवठयाबाबत चौकशी केली असता सदरील कंपनी पंपाचा पुरवठा तीन महिन्यात करु शकतो. ॲथर अॅन्ड प्लॅट बनावटीच्या पंपाचा समावेश मुळ निविदेमध्ये करण्यात आलेला आहे व निविदा सादर करते वेळेस सदरील बनावटीचा CNE-२४/२, stage पंपासाठी खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. ॲक्वापंप, पुणे | ५% जास्त |
| २. | मे. पी. एम. एस. मुंबई | २% जास्त |
| ३. | मे. बडगुजर नाशिक | ४.२६% जास्त |

तथापी मे. रेणुका इलेक्ट्रीक कंपनी हे त्यांच्या ज्योती बनावटीच्या ३ स्टेज पंपाच्या मंजूर दराप्रमाणे म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९% कमी दराने पुरवठा करण्यात तयार आहेत. ज्योती बनावटीच्या पंपाचा डिसचार्ज व मॅथर अँड प्लँट पंपाचा डिसचार्ज तसेच पंपावरील हेड यामध्ये काहीही फरक नाही. परंतू मँथर अँड प्लँटचा पंप घेतल्यास पंपाची कार्यक्षमता ज्योती पंपापेक्षा २% जास्त आहे. त्यामुळे जास्त पाणी उपसा करता येईल. व स्टेजेस तीन ऐवजी दोनच असल्यामुळे कमीत कमी पाणी पातळी (एक-मीटर) असतांना पंप चालविणे शक्य होईल. त्याच प्रमाणे मँथर अँड प्लॅट पंप बसविल्यास वीज बीलाचा खर्चही कमी होईल.

तरी मँथर अँड प्लँट बनावटीचा पंप CNE-२४/२, stage हा ज्योती बनावटीच्या पंपापेक्षा तांत्रिकदृष्ट्या सक्षम आहे व तीन महिन्यात मिळणार असल्याने काम लवकरात लवकर पुर्ण करता येईल. तसेच शहरातील पाणी पुरवठाही येत्या उन्हाळयात सुरळीत ठेवण्यास मदत होईल.

तरी ज्योती बनावटीच्या पंपाऐवजी अँथर अँड प्लँट बनावटीचा पंप खरेदी मान्यता मिळावी. ही विनंती सदर बदलामूळे महानगरपालिकेचे कोणत्याही प्रकारे आर्थिक नुकसान होत नाही. तरी याबदलास मान्यता व्हावी. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**मा. सभापती :** सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणीपुरवठा योजनेच्या नक्षत्रवाडी ब्रुस्टर पंपगृह येथे ३०० अश्वशक्ती व्ही. टी. पंपाचा पुरवठा करणे, उभारणी करणे व त्याची समाधानकारक चाचणी देणे या कामासाठीची मे. रेणुका इलेक्ट्रीक कंपनी यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९% कमी दराची निविदेस स्थायी समितीने मंजुरी दिली असल्याने परंतू ज्योती बनावटीचा पंप पुरविण्यास जास्त कालावधी लागणार असल्यामुळे शहराचा पाणी पुरवठा सुरळीत चालु राहावा यासाठी ज्योती बनावटीच्या पंपाऐवजी मॅथर अँड प्लॅट बनावटीचा CNE-२४/२, stage हा पंप खरेदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वित्तीय वर्ष सन २००४-२००५ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ कलम ९८ अन्वये महानगरपालिकेने दिनांक २०-०२-२००८ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजूर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे

सन २००४-२००५ या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे दर प्रस्तावित आहेत. खालील दर हे दर योग्य मूल्यावर आकारले जातील.

महानगरपालिकेचे दर :

सन २००३-२००४ चे प्रचलित दर सन २००४-२००५ साठी प्रस्तावित सामान्य कर व इतर कराचे दर दर्शविणार तक्ता.

| **अ. क्र.** | **कराचे नाव** | **सन २००३-२००४ चे प्रचलित दर** | | **सन २००४-२००५ साठी प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सामान्य कर | करयोग्य मूल्य रुपये | दर | करयोग्य मूल्य रुपये | दर |
| | | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००० ते १०,००० | २४% | १००० ते १०,००० | २४% |
| | | १०००१ ते २०,००० | २५% | १०००१ ते २०,००० | २५% |
| | | २०००१ ते ५०,००० | ३०% | २०००१ ते ५०,००० | ३०% |
| | | ५०००१ ते १,००,००० | ३४% | ५०००१ ते १,००,००० | ३४% |
| | | १,००,००० च्या पुढे | ३६% | १,००,००० च्या पुढे | ३६% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | |
| | | अ) निवासी वापर | ३% | अ) निवासी वापर | ३% |
| | | ब) निवासेत्तर वापर | | ब) निवासेत्तर वापर | |
| | | १ ते ५०००० | ८% | १ ते ५०००० | ८% |
| | | ५०००१ ते पूढे | १०% | ५०००१ ते पूढे | १०% |
| ३. | वृक्ष कर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% |
| ४. | अग्निशमन कर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% |
| ५. | मनपा शिक्षण कर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | २% | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | २% |
| ६. | पथ कर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | २% | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | २% |
| ७. | जल लाभ कर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% |
| ८. | जलनिःसारण लाभकर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% |
| ९. | मोकळया जागेचा कर सामान्य कराच्या दराने आकरण्यात येईल. | | | | |

तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मूल्यावर आकारण्यात येईल.

**संवाद :**

**श्री. नंदकुमार घोडेले :** सविस्तर खुलासा करण्यात यावा.

**करमुल्य निर्धा. अधिकारी :** दुरुस्ती आहे. वृक्षकर १.५% असे चुकून झालेले आहे ते २% असे करण्यात यावे. यावर्षी मालमत्ता करामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ केलेली नाही.

**मा. आयुक्त** : स्विकृतीसह मंजूरी दयावी. २० फेब्रुवारीच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवावे लागेल.

**मा. सभापती** : प्रस्तावातील अ. क्र. ३ वृक्षकर २% ऐवजी नगरचुकीने १.५% टंकलिखित झालेले आहे. ते २% असे वाचावे. यादुरुस्तीसह सन २००४-२००५ या वित्तीय वर्षा करीता मालमत्ता करावे दर प्रस्तावित केल्याप्रमाणे कुठलाही बदल न करता निश्चित करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वित्तीय वर्ष सन २००४-२००५ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर खालील दर्शविल्याप्रमाणे कुठलाही बदल न करता निश्चित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येवून सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

| **अ. क्र.** | **कराचे नाव** | **सन २००३-२००४ चे प्रचलित दर** | | **सन २००४-२००५ साठी प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सामान्य कर | करयोग्य मूल्य रुपये | दर | करयोग्य मूल्य रुपये | दर |
| | | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००० ते १०,००० | २४% | १००० ते १०,००० | २४% |
| | | १०००१ ते २०,००० | २५% | १०००१ ते २०,००० | २५% |
| | | २०००१ ते ५०,००० | ३०% | २०००१ ते ५०,००० | ३०% |
| | | ५०००१ ते १,००,००० | ३४% | ५०००१ ते १,००,००० | ३४% |
| | | १,००,००० च्या पुढे | ३६% | १,००,००० च्या पुढे | ३६% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | |
| | | अ) निवासी वापर | ३% | अ) निवासी वापर | ३% |
| | | ब) निवासेत्तर वापर | | ब) निवासेत्तर वापर | |
| | | १ ते ५०००० | ८% | १ ते ५०००० | ८% |
| | | ५०००१ ते पूढे | १०% | ५०००१ ते पूढे | १०% |
| ३. | वृक्ष कर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | २% | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | २% |
| ४. | अग्निशमन कर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% |
| ५. | मनपा शिक्षण कर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | २% | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | २% |
| ६. | पथ कर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | २% | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | २% |
| ७. | जल लाभ कर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% |
| ८. | जलनि:सारण लाभकर | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% | कोणत्याही करयोग्य मूल्यावर | १.५% |
| ९. | मोकळया जागेचा कर सामान्य कराच्या दराने आकरण्यात येईल. | | | | |

तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मूल्यावर आकारण्यात येईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, तिरुपती विहार ते सुतगिरणी चौक गटार बांधून सांडपाण्याची विल्हेवाट लावणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १७,०२,११९/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता एकुण पाच निविदापत्रके प्राप्त झाली प्राप्त निविदापत्रकांचा तुलनात्मक दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | अमन कन्स्ट्रक्शन | १% कमी दराने |
| २. | मे. एस. एच. असोसिएटस | २% जास्त दराने |
| ३. | एलोरा कन्स्ट्रक्शन | ५% जास्त दराने |
| ४. | युनायटेड कन्स्ट्रक्शन | ६.९९% जास्त दराने |
| ५. | मो. सोहेल सिध्दीकी | १२% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी अमन कन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी आहेत. करीता सदरील काम अमन कन्स्ट्रक्शन यांचेकडुन अं. प. दरापेक्षा १% कमी दराने करुन घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तिरुपती विहार ते सुतगिरणी चौक गटार बांधून सांडपाण्याची विल्हेवाट लावणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १% कमी दराची मे. अमन कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. १०९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, देशमुखनगर, गारखेडा येथील रेखांकनातील अंतर्गत खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १४,९९,९९९/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण २८ कोटी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेस यापैकी फक्त चार निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ०.१०% कमी दराने |
| २. | मे. एस. एच. असोसिएटस | १.८६% जास्त दराने |
| ३. | श्री. कुलवंसिंग | ४.५०% जास्त दराने |
| ४. | संधु कन्स्ट्रक्शन | ५.००% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ०.१०% कमी दराची मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडुन सदरील काम अं. प. दरापेक्षा २% कमी दराने करुन होण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, देशमुखनगर, गारखेडा येथील रेखांकनातील अंतर्गत खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडुन सदरील काम अं. प. दरापेक्षा २% कमी दराने करुन घेण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११० :**

कार्यकारी अभियंता (पापु) प्रस्ताव सादर करीत आहे की, अविष्कार चौक ते ओम प्रकाश प्राथमिक शाळा ते माता मंदीर पर्यंत ३५० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी र. रु. १५,१२,८३२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते त्यास दि. १२-०९-०३ अन्वये मा. आयुक्तांनी स्थायी समितीपुढे ठेवण्याची शिफारस केली. त्यानंतर सदर अंदाजपत्रकास स्थायी समितीने विषय क्र. ३४ दि. ०३-१०-२००३ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कार्यालयाची निविदा सूचना क्र. ५९/०३ जी की, दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून " बी-१ " निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण ०५ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकुण ०२ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अमरीस जेठा राठोड | ४.५८% कमी दराने |
| २. | श्री. मन्नानखान | ८.००% जास्त दराने |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री. अमरसी जेठा राठोड यांचा आहे. म्हणजेच अं. प. दरापेक्षा ४.५८% जास्त असा दर दिलेला आहे. परंतू त्यांनी दिलेल्या दराबाबत दि. ०५-०२-२००८ रोजी मा. आयुक्तांचे समक्ष वाटाघाटी केल्या. वाटाघाटी अंती कामासाठी लागणारे सी. आय. पाईप कार्यालयाकडुन पुरविले जाणार असल्याने उर्वरीत कामासाठी अंदाजपत्रकीय दराने मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी श्री. अमरसी जेठा राठोड यांची वाटाघाटी अंतीचा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने निविदा स्विकृतीचा प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा. आयुक्त** : या प्रस्तावात चौथ्या ओळीत मा. आयुक्तांची मान्यता प्राप्त झाले असे दिले. त्याऐवजी शिफारस झाली. अशी दुरुस्ती करावी. १५ लक्षच्या वरील अंदाजपत्रक मंजूरीचे अधिकार स्थायी समितीला आहेत.

**मा. सभापती** : दुरुस्तीसह प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. अर्थसंकल्पावर दुपारी ३.०० वाजता सभा घेतली जाईल. कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अविष्कार चौक ते ओम प्रकाश प्राथमिक शाळा ते माता मंदीर पर्यंत ३५० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा

धारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम श्री. अमरसिंग जेठा राठोड यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १०-०२-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का. व. क्र. १५) इतिवृत्त. मंगळवार दिनांक १०-०२-२००४ रोजी स्थायी समितीची सभा मा. सभापती भाऊसाहेब ताठे यांचे अध्यक्षतेखाली " मलिक अंबर स्थायी समिती सभागृहात " येथे दुपारी २.०० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. या सभेस मा. आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. चंद्रखेखर लक्ष्मीनारायण जैस्वाल | -//- |
| ३. | स. स. श्री. ठकुजी रामसिंग वाणी | -//- |
| ४. | स. स. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| ५. | स. स. सौ. जेजुरकर ताराबाई सुधाकर | -//- |
| ६. | स. स. श्रीमती मानकापे पार्वतीबाई लहानू | -//- |
| ७. | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| ८. | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ९. | स. स. श्री. कैसरखान बद्रोद्दीनखान | -//- |
| १०. | स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| ११. | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| १२. | स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| १३. | स. स. श्री. शेख इलियास किरमाणी | -//- |

**विषय क्र. १११ :**

सन २००३-२००४ चे सुधारीत व सन २००४-२००५ चे मुळ अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

**मा. सभापती** : सन २००३-२००४ चे सुधारीत व सन २००४-२००५ चे मूळ अंदाजपत्रक संबंधी मुख्य लेखाधिकारी थोडक्यात माहीती विशद करतील.

**मुख्यलेखाधिकारी :** मा. आयुक्त यांनी कलम ९५ नुसार सन २००३-२००४ चे सुधारीत व सन २००४-२००५ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीकडे दिनांक २७ जानेवारी २००४ रोजीच सादर केलेले होते. त्यावर आज बैठक होवून चर्चा होणार आहे. चर्चेपुर्वी मा. आयुक्त यांना विनंती की, त्यांनी मा. सभापती त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करावे. तसेच लेखाधिकारी श्री. संजयपवार यांनी स्थायी समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करावे. तसेच लेखाधिकारी श्री. संजय पवार यांनी स्थायी समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करावे. (याच वेळी मा. आयुक्त मा. सभापती यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतात. तर लेखाधिकारी स्थायी समिती सदस्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतात.) मा. आयुक्तांचे मार्गदर्शनाखाली हे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. अभ्यासपुव्रक असे मार्गदर्शन लाभलेले होते. म्हणून मा. आयुक्त यांचे मी. स्वतः लेखा

विभागातर्फे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतो. त्याच वेळी मुख्यलेखाधिकारी मा. आयुक्त यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात.) याप्वर चर्चा होण्यापुर्वी मा. आयुक्त त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करावे अशी विनंती आहे.

**मा. आयुक्त** : १९८३ पासून महापालिकेचा २२ वा अर्थसंकल्प सादर होत आहे. सन २००४-०५ चा नवीन कामाचा व सन २००३-०४ या आर्थिक वर्षात संपत असलेला हा अर्थसंकल्प असे दोन्ही अर्थसंकलप एकत्र सादर होत आहे. चालु वर्षात उत्पन्न वाढविण्यातच नितांत गरज आहे. त्यासाठी जकातीचे यावर्षीचे उत्पन्न जवळपास ६४-६५ कोटी पर्यंत होईल. त्यामुळे याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. जकातीचे संगणकीकरणे नाक्यावर स्वयंचलीत कॅमेरे बसविणे. नवीन वाहने खरेदी करणे अथवा भाडयाने घेऊन जकात कर चुकविण्याच्या वृत्तीस आळा घालणे करीत स्वतंत्र भरारी पथके नेमुन जकातीचे उत्पन्न वाढविण्यास निश्चित मदत होईल. मालमत्ता व पाणी पट्टीची थकबाकी दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु २-३ वर्षाचा आढावा घेतला तर ०८-१०-९९ कोटी वसुली झालेली दिसुन येईल. या दोन्हीसाठी सर्वसाधारण सभेने ४९ कोटीचा इष्टांक दिलेला होता. तो जास्त असला तरी देणे आवश्यक वाटते. मे-जूनपासून कार्यवाही सुरु झाली. सप्टेंबर मध्ये वसुलीसाठी सकाळच्या वेळात काही कर्मचारी द्यावे लागेल हे सर्व करुनही आढावा घेतला असता दोन्ही मिळुन १२ कोटी वसुल झाले आहे. उर्वरीत काळात २० कोटीपर्यंत जाईल. थकबाकी व चालु डिमांड लक्षात घेत ५० ते ६०% वसुली होते असे म्हणणे वावगे होणार नाही. जकात खाजगीकरणाचा जसा प्रयोग केला त्याच प्रमाणेच मालमत्तांचा सर्वेक्षणाचा जो प्रस्तव होता त्यास मान्यता झालेली आहे. प्रशासनाने मान्यता देऊन संबंधित एजन्सीला वर्क ऑर्डरही दिलेली आहे. येत्या ५-९ महिन्यात सर्वेक्षण होईल. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सक्त सुचना दिलेल्या आहेत. यामुळे पुढील वर्षात नक्कीच मालमत्तेच्या संख्येत वाढ होईल. तसेच कमी जास्त कर लागणे. काहींना कर न लागणे व इतर बाबी निर्दशनास येतील व काही कोटीची उत्पन्नात वाढ होईल व सभागृहाने साथ दिली त्याबद्दल आभार व्यक्त करतो. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशनुसार औरंगाबाद शहरात नागरी घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २००० नुसार अंमलबजावणी करणे आवश्यक होते. कृती आराखडा तयार झाला. काम सुरु झाले असले तरी, काही मशीनरी होणे व लहान मोठया समस्या दुर करणे अपेक्षीत होते. म्हणून त्यासाठी ८.५० कोटी तरतुद आवश्यक आहे. त्यावर साधक बाधक चर्चा होणे अपेक्षीत आहे ही रक्कम वित्तीय संस्थेकडुन उभी केली जावी असा प्रस्ताव आहे. एकंदरीत या अर्थसंकल्पाकडे लक्ष वेधले तर महापालिकेकडे जे कर्ज आहे त्यावरील व्याज व दंडनीय व्याज हे परतफेड करण्याचा नेहमीपेक्षा जास्त प्रयत्न केलेला आहे. म्हणुन कर्ज कशी झाल्यास बाजारात या संस्थेची पत वाढवु शकेल. भविष्यात कर्ज काढण्याची गरज पडल्यास मदत होवू शकते. सन २००४-०५ साठीचे मुळ अंदाजपत्रक तयार केले. जो इष्टांक निश्चित केला. प्रशासनाच्या पातळी वर त्यामध्ये उपलब्ध कर्मचारी झोनमधील कर्मचारी त्यांची कार्यक्षमता ही प्रत्येक विभाग कार्यालयास १ एप्रिल पासुन आणखी कोणकोणत्या तांत्रिक कर्मचारी देता येईल हे नियोजन विचारात घेऊन ही दोन्ही उद्दीष्ट बरोबर ठेवलेली आहे. हे

दोन्ही उद्दीष्ट पुर्ण घेतील अशी आशा आहे. परंतु हे करीत असतांना विकास कामाची मागणी वाढेल हे स्वाभाविक आहे. म्हणुन अशा विकास कामांना भरीव अशी तरतुद करता आली नाही. जमा आणि खर्चाचा ताळमेळ पाहता काही कामांना कात्री लावणे आवश्यक होते. काही बांधीव खर्च २००४-०५ मध्ये महापालिकेस करणे आवश्यक ठरते. त्यातील ठळक बाबी ११२४ कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केले. त्यासाठी पुर्ण वर्षभरात ०३ कोटीचा खर्च अपेक्षीत आहे. जी मशिनरी खरेदी करणार आहोत. त्याचे व्याजाचा बोजा थोडयाफार प्रमाणात येईल. वीजबील अदा करण्यासाठी ०५ कोटी रक्कम मिळालेली होती. पुढील वर्षात ०५ कोटी मिळेल. कमी प्रमाणे होत जाईल. या पुढील कालावधीत वीजबील देयक अदा करणे सुध्दा आवश्यक राहील. थोडक्यात म्हणजे उत्पन्न व खर्च याचा मेळ ठेवण्यासाठी सन २००३-०४ चे सुधारीत ११८.५१ कोटी व प्रारंभीची शिल्लक १८.२२ कोटी असे मिळुन १३६.८० कोटी हा जमेचा घेण्यात आलेला आहे. सन २००३-०४ मध्ये १३६.५२ कोटी खर्च विचारात घेऊन पर्यायाने र. रु. २८.२१ लक्ष शिल्लक राहतात. तसेच मुळ अंदाजपत्रक १६१.०७ कोटी जमा व १६०.८१ खर्च विचारात घेतल्यास रु. २६.१६ लक्ष शिल्लक राहतात. १२ एप्रिल २००३ रोजी मी आयुक्त म्हणुन पदभार स्विकारला. त्यानंतर एकंदर महापालिकेची आर्थिक स्थिती पाहात जे करणे शक्य आहे. त्याचा सातत्याने विचार केलेला आहे या सर्व कामामध्ये सर्व पदाधिकारी तसेच तत्कालीन महापौर, उपमहापौर व सर्व स. सदस्य व जे. जे. या महापालिकेच्या संबंधित येतात. त्यांचे सहकार्य मिळाले. त्याबद्दल आभार व्यक्त करतो. हे अंदाजपत्रक कमी कालावधीमध्ये सादर करतांना लेखा विभागाचे प्रमुख मुख्यलेखाधिकारी श्री. खैरनार, श्री. पवार व त्या विभागातील त्यांचे सहकी यांनी दिवस-रात्र मेहनत घेतलेली आहे. हे विचारात घेता त्यांचे पण व्यक्त करणे आवश्यक आहे. धन्यवाद!

**मुख्यलेखाधिकारी :** चर्चा करण्यापुर्वी महापालिकाचे सुधारीत अंदाजपत्रक हे ११८.५१ कोटीचे असून, यामध्ये प्रारंभीची शिल्लक १८.२९ कोटी विचारात घेता १३६.८० कोटी जमा बाजु गृहीत धरुन खर्च बाजुला १३६.५२ खर्च विचारात घेवून अखेरची शिल्लक रु. २८.२१ लक्ष असे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. यात वैधानिक खर्च हा ७५.९४ कोटी पगार व भत्ते यावर ३१ मार्च पर्यंत ४० कोटी म. रा. वि. म. २३-९५ लक्ष म. जि. प्रा. २५० कोटी गो. वि. मं. मं. ७५ लक्ष सरकारी कर्ज परत फेउ २.६० कोटी पोलीस दर १० लक्ष छावणी हिस्सा ७० लक्ष रस्ते विकास महामंडळ १.०० कोटी, वेतन पेन्शन वृक्ष घसारा १.१० कोटी शासन शिक्षण व इतर कर १.६५ कोटी ठेकेदार व अनामत रक्कम १.५८ कोटी अशा प्रकारे ७५.९४ कोटी हा वैधानिक खर्च आहे. ३४ कोटी रु. विकास कामावर खर्च होणार आहे. यामध्ये देखभाल दुरुस्ती व नवीन कामाचा समावेश राहील. २.४० कोटी स्वेच्छानिधी राहील. एकुण विकास कामासाठी ३७.०३ कोटी रु. राहतील. भुसंपादनासाठी ७.२५ कोटी रकम ठेवलेली आहे. जकात विभागात संगणकीकरण करण्याचे काम हाती घेण्यात येईल. त्यासाठी १.०० कोटी तसेच महसुली इतर खर्च आहे तो १५.३१ कोटीचा आहे. अशा प्रकारे १३६.८० कोटीचा हा सुधारीत

अर्थसंकल्प आहे. व १३६.५२ कोटी खर्च आहे. यावर सविस्तर अशी चर्चा होवून मान्यता द्यावी.

**श्री. नंदकुमार घोडेले :** सन २००३-०४ चा अर्थसंकल्प कोलॅप्स झाला असे म्हटले तरी वावगे होणार नाही. जकातीचे उद्दीष्ट ६९ कोटी दिले होते. ६४ कोटी दाखविण्यात आले. ०५ कोटीची तुट दर्शविण्यात येते. मालमत्ता इष्टांक २० कोटीचा होता. अपेक्षीत वसुली १३ कोटी तर पाणी पट्टी २७ कोटी नमूद केलेले होते. फक्त १० कोटीच वसुली अपेक्षीत दाखविण्यात आलेली आहे. १४९ कोटीचे बजेट ११८ कोटीवर आले. एकुण ९३२ कामांचा समावेश होता. ६३० कामे मंजुर झाली. काही तांत्रिक व इतर अडचणीमुळे होऊ शकली नाही. ३०० कोटी बाकी असून, त्यात १० कोटी खर्च होणार होते ते झाले नाही. त्या कामांना या वर्षीच्या अंदाजपत्रकात होउुन ती कामे प्राधान्याने करण्याबाबत विचार करावा. आताच खुलासा झाला जकातीचे संगणकीकरण करणार पथके स्थापन करणार, स्वयंचलीत कॅमेरे बसविणार हे होत राहील. परंतू जकातीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सर्वसाधारण सभेने ठराव पास करुन दोन जकात अधिक्षक देण्यात यावे. मंजूरी दिली. एक जकात अधिक्षक जकात नाक्याचे काम बहातील. एक अधिक्षक भरारी पथकासोबत काम करतील अशी संकल्पना सुध्दा मांडलेली आहे. खाजगी करणारचा निर्णय रद्द केल्यानंतर जकात विभागात उत्पन्नात भरीव वाढ होण्याच्या दृष्टीने सोयी सुविधा कर्मचारी वर्ग देण्याचा निर्णय घेतला व ६९ कोटीचे उद्दीष्ट पुर्ण करावे म्हणून आदेशीत केले व मा. आयुक्तांनी सुध्दा उद्दीष्ट कमी न करण्याची भावना व्यक्त केलेली होती. हा पायंडा कायम राहील व त्यादृष्टीने वसुली होत राहील अशी भावना व्यक्त केलेली होती. ६४ कोटीपेक्षा जास्तीत जास्त वसुली कशी होईल याकडे लख द्यावे मालमत्तेचे बारीच प्रकरणे प्रलंबीत आहेत. न्यायालय स्थापक करावे अशी संकल्पना होती. त्यास चालना मिळाली नाही. न्यायालय स्थापन झाले नाही. ५० कोटीची मालमत्ता थकबाकी आहे. त्याकडे लक्ष देवून ती त्यास वेळ लागेल. तत्पुर्वी प्रशासनामार्फत सर्वेक्षण व्हावे. प्रभावीपणे वसुली कशी होईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे. टारगेट कमी करुन देऊ नये. त्यामुळे यावर्षीचे उद्दीष्ट पुर्ण होणार नाही. उद्दीष्ट कमी करुन देण्याची प्रथा बंद करावी.

**श्रीमती किवळेकर जयश्री :** मागील वर्षीच्या उद्दीष्टानुसार ३१ कोटीची तुट निर्माण होत आहे. नुसते उद्दीष्ट वाढवून देऊन उपयोग नाही. उद्दीष्ट प्रशासन पुर्णच करीत नसेल तर त्यास अर्थ नाही. ३१ कोटीची तुट का निर्माण झाली. जकात वसुलीसाठी आणखी १.५ महिना शिल्लक आहे. जास्तीत जास्त तुट भरुन काढावी व झालेली तुट कमी कशी करता येईल यासाठी प्रशासन काय पावले उचलणार आहे. खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** सुधारीत अर्थसंकल्प तयार करतांना डिसेंबर अखेर जी वसुली झालेली आहे. त्यानुसार पुढील ३ महिन्यांची वसुली याचा अंदाज घेऊनच सुधारीत अंदाजपत्रक तयार केले जाते. ९ महिन्याचा आढावा घेतल्यानंतर आहे. त्या स्थितीतच पुढे गेलो तर खर्चाच्या बाबी असतात. मार्च अखेर पेमेन्ट देण्यास अडचण निर्माण होऊ शकते. त्यानुसार ९ महिन्याचा असता मार्च अखेर होणारी वसुली विचारात होता जकातीचे ६९ ऐवजी ९४ कोटीचे असून, मालमत्ता कराचे २३ कोटी ऐवजी १३ कोटी तर पाणीपट्टीचे २७ कोटी ऐवजी

१० कोटी केलेले असून, यामध्येच एकुण ३२ कोटी उद्दीष्ट कमी झालेले आहे. त्यामुळे ११८ कोटीचे सुधारीत अंदाजपत्रक तयार झालेले असून, तुट निर्दशनास येते. ही तुट का निर्माण झाली त्याचा आढावा मा. आयुक्त यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करतानांच दिलेला आहे. या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता व्हावी.

**श्री. नंदकुमार घोडेले :** जकात विभागाचे दररोजचे उद्दीष्ट ठरवून दिले त्याप्रमाणे मालमत्ता कराचे दररोजचे वसुलीचे टारगेट देण्यात यावे व झोन अधिकारी यांना नियमीत आढावा घेतला तर वसुलीत वाढ होवू शकते. तसेच नगररचना विभागाकडुन संबंधिताने एन. ए. कर भरणा केलेला आहे का हे तपासण्यात येते तर बांधकाम परवानगी दिली जाते. एन. ए. कर भरणा करुन घेण्याची जबाबदारी महापालिकेची नाही. मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाची आहे. त्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांना एकपत्र देवून विनंती करावी की, ज्या प्लॉटचा जागेचा मालमत्ता कर भरणा केला असेल, तरच रजिष्ट्री (खरेदी खत) केले पाहीजे. यासाठी मा. आयुक्त यांनी पावले उचलावी त्या विभागाचे उत्पन्न वाढविण्यासाठी आपले प्रयत्न करतात. महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत.

**मा. आयुक्त** : उपआयुक्त दर्जाचे फड म्हणुन अधिकारी नुकतेच रुजू झाले त्यांना खुलासा करावयास लावणे योग्य नाही. गेल्या ५-६ महिन्यापासून श्री. उपआयुक्त (म) आम्ही झोन अधिकारी यांचेकडुन त्यांचे कामाचा आढावा घेत आहोत. आताच स. सदस्य यांनी सुचना केल्यानुसार झोन निहाय उद्दीष्ट दिलेले आहेत. परंतू प्रत्येक झोनला आठवडयाने व दैनिक वसुलीचे सुध्दा उद्दीष्ट दिलेले आहे. उद्दीष्ट पुर्ण न होण्याचा दृष्टीकोन बघून झोन आयुक्त यांना कारणे दाखवा नोटीस देण्याची कार्यवाही केलेली आहे. वसुली न होण्याची कारणे जी नमुद केलेली आहे. त्याबाबतीत उपआयुक्त (म) खुलासा करतील.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** ६२ कोटीवरुन ६४ कोटीचे टारगेट आणले. ६९ कोटी वसुल करु असे आश्वासन उपआयुक्त यांनी दिलेले होते. ६९ कोटी वसुल होईल का? खुलासा करावा.

**उपआयुक्त (म) :** महसुली उत्पन्नाचा विचार करुन मागील वर्षाच्या अर्थसंकलपात मालमत्ता कराचे २३ कोटी उद्दीष्ट ठेवण्यात आलेले होते. थकबाकी सह एकूण ४० केटी मालमत्ता कर कमी आहे. ८.८६ कोटी न्याय प्रविष्ट प्रकरणांचे असून, ३१.६० कोटी वसुली अपेक्षीत आहे. कर्मचारी वर्ग कमी असल्याने मागील वर्षी २३ कोटी ऐवजी ११ कोटी पर्यंत वसुली झालेली होती. पाणीपट्टीची सुध्दा त्याच कर्मचाऱ्यांकडुन मागील वर्षी ९ कोटी वसुल झालेले होते. मागील वर्षी जेवढे कर्मचारी होते तेवढेच कर्मचारी सध्या झोनमध्ये आहे. आढावा घेतला असता १५ कर निरिक्षक २४२५ कर्मचारी वसुलीसाठी कायमस्वरुपी आहे. त्यांचेकडे नोटीसा देणे. डिमांड रजिस्टर तयार करणे ही सर्व कामे यांनाच करावी लागतात. त्यामुळे या कर्मचाऱ्यांकडुन मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली पूर्णतः होवू शकणार नाही. वेळोवेळी स्टाफची मागणी केली. ३१ मार्च २००३ पर्यंत मालमत्ताची थकबाकी रकम २५.७६ कोटी होती. सन २००३-०४ ची अपेक्षीत मागणी १४.६४ कोटी असून, चालू अपेक्षीत १२.९९ गृहीत धरलेली असून, दिनांक ०१-०४-२००४ पर्यंतची

अपेक्षीत २७.४२ कोटी होते. सन २००४-०५ ची अपेक्षीत मागणी १४.८३ गृहीत धरल्यास एकुण मागणी ४२.२५ कोटीपर्यंत येते. त्याचप्रमाणे पाणीपट्टी सुध्दा ४०.३९ कोटी येते. परंतू १५ कर निरिक्षक व २४.०५ वसुली कर्मचारी बघता त्यांच्या कडुन एवढी मोठी वसुली होणे शक्य नाही. मागील वर्षी सुध्दा झालेली नाही. यावर्षी सुध्दा १३ कोटी मालमत्ता रु. १० कोटी पाणीपट्टीची वसुली होवू शकते. त्यामुळे सुधारीत बजेट सादर करण्यात आलेले आहे. प्रभावीपणे वसुलीसाठी साधारण ३००० मालमत्तेस एक कर निरिक्षक व ३ क. लिपीक दर्जाचे कर्मचारी असा स्टाफ आवश्यक आहे. जेणे करुन ते वर्षभर ३००० मालमत्तेची कर वसूली व पाणीपट्टी वसुली करु शकतील रेकॉर्ड अदयावत करतील. जवळ पास ५० कोटीची थकबाकी आहे. ती नगण्य राहील. दरवर्षी उद्दीष्ट कमी करुन दिल्या जाते. त्यापेक्षा जास्त वसुली होऊ शकेल. कर्मचारी वर्ग आवश्यक आहे.

**मा. सभापती** : कर्मचारी उपलब्ध नाही. म्हणुन ५० कोटीची वसुली ठेवणे योग्य वाटत नाही. कर्मचारी देण्यास प्रशासनास काय अडचणी निर्माण होत आहे.

**उपआयुक्त (म)** : मागील वर्षी जेवढे कर्मचारी होते तेवढेच स्टाफ आहे. कार्यालयातील अतिरिक्त कर्मचारी देता येतात. परंतु त्यांना जास्त वेळ काम देऊ शकत नाही. कारण त्या कर्मचाऱ्यांस त्यांचे विभागातील दैनंदिन काम सांभाळून जास्त वेळा काम करता येत नाही ही बाब झोन अधिकारी यांनी निर्दशनास आणून दिलेली आहे. सन २००४-०५ या वर्षासाठी नियोजन असे की, करमूल्य निर्धारण व संकलन पद यावर्षी भरण्यात आलेले आहे. तीन क्षेत्रीय अधिकारी तीन झोन अधिकाऱ्याचे पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठीनायबा तहसीलदार दर्जाचे अधिकारी देण्याबाबत मा. विभागीय आयुक्त यांचेकडे मागणी केलेली आहे. दोन नावची यादी शासनाकडे मान्यतेसाठी पाठविलेली असून, साधारणतः दोन अधिकारी या महिन्यात महापालिकेमध्ये कार्यरत होतील. पुर्णवेळ झोन अधिकारी हे वसुलीसाठी झ ोनमध्ये असणे आवश्यक आहे. पुर्ण वेळ झोन अधिकारी असणे आवश्यक आहे. अन्यथा दिलेला इष्टांक पुर्ण होणार नाही. या वर्षात जे मालमत्ता कर व पाणीपट्टीचे उद्दीष्ट दिले ती वसुली होण्यासाठी एप्रिल महिन्यापासून नियोजन करणार आहोत. एका कर्मचाऱ्यांस १००० मालमत्तेची वसुलीचा इष्टांक देणार आहोत. त्यांनी पुर्ण वर्षभरामध्ये तेवढी वसुली करावयाची आहे. नसता तो कर्मचारी जबाबदार राहील. त्यामुळे जे उद्दीष्ट दिले ते वसुली होण्यास अडचण येणार नाही. जकातीच्या संदर्भत ६९ कोटीचा इष्टांक होता ६४ कोटी सुधारीत मध्ये देण्यत आले. आजची वसुली पाहता ६९ कोटी उद्दीष्ट पुर्ण होणार नाही. मार्च अखेर ६४ कोटी अपेक्षीत आहे. या वर्षासाठी नियोजन केलेले आहे. त्यात संगणकीकरण करणे. भरारी पथके वाहने उपलब्ध झाली नाही. त्यामूळे उद्दीष्ट पुर्ण करता आले नाही. संगणकीकरणाचा प्रस्ताव देणार त्याच वेळेस खाजगी करणाची प्रक्रिया चालु होती. खाजगीकरणाशी संगणकीकरण करणे हा मुद्दा निगडीत म्हणून ती प्रक्रिया थांबवुन ठेवलेली होती तसेच ओपन डिलेवरी यासाठी गोडऊन नाही जागा अपुरी पडते. यावर्षी गोडाऊन भाडयाने घेणे, नगरनाका मुंबई नाक्यावर जागा होऊन गोडाऊन तयार करण्याची कार्यवाही करणार

आहोत. तसेच नाक्यावर स्वयंचलीत कॅमेरे बसविणार आहोत. तसेच भरारी पथके तयार करणार आहोत. यासाठी प्रस्ताव ठेवणार आहोत.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** पुढील वर्षात अमुक नियोजन करणार माहीती दिली. मागील वर्षाचे इष्टांक का पुर्ण झालेला नाही याचा सत्य खुलासा दयावा. मा. आयुक्त रुजू झाल्यानंतर जवळपास प्रभावीपणे वसुली होण्यासाठी मा. आयुक्त यांचेकडेच सभागृहाने सुचना केली की, मा. आयुक्तांनी त्यांचे पध्दतीने जास्तीत जास्त वसुली करावी. आताच खुलासा केला. कर्मचारी वर्ग नाही. कर्मचारी वर्ग देवू नये असे कोणाचे म्हणणे आहे का देण्यात आलेली नाही? वसुली होत नसेल तर विकास कामे होणार नाही.

**श्रीमती पार्वती मानकापे :** खाजगीकरण होते तेव्हा इष्टांक वाढवून होतो. तेवढी वसुली महापालिका करु शकत नाही का? अधिकारी यांचेवर प्रशासनाचा वचक नाही का? अधिकारी वसुली करण्यास सक्षम नाही का? प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

**उपआयुक्त (म) :** प्रशासनाकडे उपलब्ध कर्मचारी आहे. त्यातीलच काही स्टाफ वसुलीसाठी दिलेला होता. तो हा अपुर्ण होता. चार झोनमध्ये झोन अधिकाऱ्यांची पदे रिक्त होती. झोन क्र. ३, ५, ६, ७ या चार झोनमध्ये वर्ग-२ चे अधिकारी आवश्यक होते. ५ वर्षापासुन झोन अधिकारी झोनमध्ये नाही. ही पदे भरती करण्यासाठी नायब तहसीलदार दर्जाचे अधिकाऱ्यांची मागणी केलेली आहे. आपण केलेली मागणीनुसार अदयाप प्रतिनियुक्तीवर अधिकारी महापालिकेकडे उपलब्ध झालेले नाही. महापालिकेकडे झोन अधिकारी पदावर वर्ग-२ चे प्रशासकीय विभागाकडे कुणीही कर्मचारी उपलब्ध नाही. कर निरिक्षक व लिपिकांच्या बाबतीत अडचण आहे. १५ कर निरिक्षक पेक्षा जास्त कर्मचारी झोनला देवू शकत नाही. याबाबत उपआयुक्त (प्र.) माहिती देतील. मागील वर्षात स्टाफ नव्हता. या वर्षातही नाही. पुढील वर्षातही कमी कर्मचारी असू शकतील.

**मा. आयुक्त** : यावर जास्त चर्चा न करता कर निरिक्षकांची किती पदे कमी आहेत. ती पदे भरल्यानंतर वसुली पुर्णतः होऊ शकते अशी खात्री उपआयुक्त (महसूल) (प्रशासन) यांची आहे. तर तसा पद निर्मितीचा ठोस प्रस्ताव सभेत सादर करावा. त्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल. परंतु पुन्हा पुन्हा एकच समस्या सांगणे बरोबर नाही. मालमत्तेचे सर्वेक्षण झाल्यानंतर कार्यरत कर्मचारी वर्ग लागणार आहे का. याचा सुध्दा आढावा घेण्यात यावा. १०-१५ कोटीचे वसुलीचे उद्दीष्ट होते तेव्हा हा स्टाफ पुरेसा होता. परंतु ५० कोटीची वसुली एवढया कमी कर्मचा-यांकडुन महराष्ट्रातच काय देशात सुध्दा कोणती संस्था करुन होत नसेल. मालमत्तेचे सर्वेक्षण झाल्या नंतर आणखी स्टाफ लागणार असून, पदनिर्मिती करण्यास हरकत नाही. ५० कोटीची वसुली गृहीत धरलेली आहे. सर्वेक्षण केलयानंतर ६० कोटी पर्यंत वसुली जावु शकते. याबाबत आज सांगता येत नाही. त्यासाठी एप्रिल पुर्वी कर निरिक्षक व कनिष्ठ लिपीकांचे पदनिर्मितीचा ठराव मंजूर करुन होणे योग्य राहिल. जेणे करुन पुन्हा पुन्हा तो विषय समोर येणार नाही. आताच खुलासा झाला एक हजार मालमत्तेमागे एक लिपिकास वसुलीचे काम दिल्यास निश्चित वसुलीत भर पडेल यात शंका नाही. परंतू वसुलीत भर पडणे आणि इष्टांग पूर्ण होणे या दोन्ही बाबी वेगवेगळया आहेत. इष्टांक ५० कोटीचा आहे.

यादृष्टीने कर निरिक्षक क. लिपिक आणखी इतर वर्गाचे किती कर्मचारी लागतील याचा प्रस्ताव समोर आणावा. त्यानंतर खर्च किती लागेत. त्याबाबत मुख्य लेखाधिकरी निर्णय घेतील. ५० कोटींची वसुली ५० कर्मचाऱ्यांकडुन केव्हाच पुर्ण होणार नाही. जेवढी घाई केली तेवढया चुकाही होतात. एन-७ येथील झोन क्र. ७ मध्ये नुसती पाणीपट्टीची वसुली होती. त्यात मोठया प्रमाणात घोटाळा झाला. ही प्रकरणे निपटण्यासाठी प्रशासनाचा एक महिना गेला किती वसुली चुकीने झाली किंवा गैरमार्गाने केली कार्यवाही होईलच. अशा प्रकारचे नियोजन करतांना उपआयुक्त (म) यांना माझी सूचना आहे की, १ एप्रिल २००४ पासून कोणत्या संवर्गातील किती कर्मचारी लागतील त्याचा ठोस प्रस्ताव सभागृहासमोर ठेवावा. मनपा त्यावर निर्णय होऊ शकेल. १०० कोटीवरुन १५० कोटींचे उद्दीष्ट जाते तेव्हा त्याच कर्मचाऱ्यांकडुन वसुली करुन घेणे शक्य होणार नाही. नुसत्या सभा घेऊन उपयोग नाही.

**सो. सुवर्णा चंद्रात्रे :** हेच आदेश सहा महिन्यापुर्वी दिले नसते तर वसुलीत वाढ होऊन इष्टांक पुर्ण करता आला असता.

**मा. आयुक्त** : मागील वर्षी १४९ कोटीचे बजेट देतांना मालमत्ता कर व पाणीपट्टी इष्टांक वास्तव नव्हता. जास्तीचा इष्टांक होता. या वर्षी विनंती राहल की, वास्तववादी इष्टांक दिला पाहिजे. एक कर निरिक्षक एक लिपीक किती कर वसुली करु शकतो हे सुध्दा विचारात होणे आवश्यक आहे. आताच खुलासा झाला. ३००० मालमत्तेसाठी एक कर निरिक्षक आज सद्यःस्थितीत ९००० मालमत्ता आहेत. सहा महिन्यापुर्वीच नव्हे तर आठ महिन्यापुर्वी पासूनच मी यामागे आहे. ९८ कोटीच्या वर कधीच वसुली झालेली नव्हती. ११९ कोटी होते आहे. १५.२० कोटी या वर्षात वाढत आहे. आमचे कौतुक करण्याची गरज नाही. इष्टांक आहे. तोच कायम ठेवा. सर्वसाधारण सभेत सुध्दा मी बोललो होतो. उपलब्ध कर्मचारी इतकी मोठी वसुली करण्याचा भार पेलणार नाही. ७०-८०% वसुली होईल. परंतु याच कर्मचाऱ्यांकडुन १००% वसुली होणे शक्य नाही. इतर विभागातील जे कर्मचारी दिले जातात ते किती तास काम करतात, यावर सुध्दा वसुलीचा ओठा अवलंबून आहे. करमुल्य निर्धारण अधिकारी म्हणून श्री. फड रुजू झालेले आहेत. त्यांनी त्यांचे नियोजन करावे. तसेच उपआयुक्त (प्र.) यांना काही सूचना दयायच्या असतील तर, त्यांची दयाव्यात जेणे करुन या पदाचे कर्मचारी कमी आहे. अशी चर्चा पुन्हा सभागृहात होऊ नये. यासाठी आर्थिक बोजा वाढला तरी चालेल परंतु उत्पन्न होण्यासाठी प्रयत्न करणे योग्य होईल.

**श्रीमती पार्वती मानकापे :** आपण बोलतात. सर्वातर्फे आपले धन्यवाद. कर्मचारी वर्ग वसुलीसाठी देण्यात यावा. उत्पन्न वाढवावे हीच सभागृहाची मागणी आहे.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** पाणीपट्टी मालमत्ता कर तसेच जकातीचे दिलेले उद्दीष्ट पूर्ण होत नाही. खाजगीत माझी स. सदस्य श्री. कैसर खान यांचेशी चर्चा झाली तेव्हा त्यानी म्हटले माझे मित्र जकात विभागात होते. काही कारणास्तव निलंबीत झाले. त्यामित्राने सांगितले १०० कोटी पर्यंत जकातीचे उद्दीष्ट वसूल होवू शकते. हा माझा अनुभव आहे. प्रशासनास विनंती राहिल की, त्यांना मानपान देवून चहापान करुन त्यांचे बुध्दीचा वापर केल्यास मनपास फायदा होईल.

**श्री. संजय शिरसाठ :** सुधारीत अर्थसंकल्प सादर करतांना प्रशासनाने त्यांचे बाबी मांडलेल्या आहेत. या सर्व बाबीला जबाबदार कोण शोध होवून सापडणार नाही. झोन अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. काही झोनला अधिकारी नव्हते. म्हणून अतिरिक्त कार्यभार दिला. म्हणून वसुलीवर परिणाम झाला. उद्दीष्ट पूर्ण होईल की नाही याची जाणीव मा. आयुक्त व उपआयुक्त यांना नव्हती का? कामचुकार झोन अधिकारी आहे असे म्हणता येणार नाही. यास जबाबदार उपआयुक्त तसेच आयुक्त सुध्दा आहेत. असे माझे स्पष्ट मत आहे. आकडेवारी दिली जाते. अमुक कर्मचारी नाही म्हणून वसुली झालेली नाही. हा पहिल्यापासून पायंडा चालू आहे. व चालूच राहील एकीकडे १२०० ऐवजी १८०० पाणीपट्टीची वाढ करुनही उद्दीष्ट पूर्ण होत नाही. आम्ही पाणीपट्टी भरतो म्हणून १८०० रुपये केले का? पाणीपट्टीची एक कोटीची वाढ झाली. नवीन नळ दिल्याचा उल्लेख नाही. कर्मचारी कमी आहेत. हे कारण योग्य वाटत नाही. टारगेट वाढवून दिल्यामुळे वसुली कमी होते व पुन्हा सुधारीत अर्थसंकल्प समोर आणावा लागतो. मा. आयुक्तांनी स्पष्ट केले. त्यासाठी उद्दीष्ट वाढवूनच देवू नये असे त्यांचे संवदातून स्पष्ट होते. हे उद्दीष्ट स्तववाढी नसेल तर चुक म्हणून कबूल करा. मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूलच करायीच नाही असे काहीही केलेले नाही. कबूल करावे. अभय योजना राबवितो आहोत. पुढील वर्षात कर वसुल केला जाईल ही भूमिका तरी प्रशासनाने स्पष्ट करावी. मालमत्ता कराची वसूली सुध्दा याप्रमाणेच आहे. यास जे कोणी जबाबदार आहेत. त्यांचेवर कार्यवाही झाली पाहीजे असे माझे मत आहे. चार-पाच झोन अधिकारीच यास जबाबदार आहे. हे ग्राह्य धरणे योग्य होणार नाही. त्यांना नोटीस वगैरे देवून वसूलीत वाढत होईल हा प्रशासनाचा गैरसमज आहे. झोन अधिकारी काय काम करतात. त्यांना सुविधा काय दिल्या जातात याची कधी चौकशी केली का? अनेक कर्मचारी या मनपा आवारात फिरतांना दिसतात काही कर्मचारी टेबलवर काम करीत नाही. याची जाणवी प्रशासनाला नसेल तर योग्य नाही. अस्थापना विभागास विचारणा करावी. कोणत्या ठिकाणी किती कर्मचारी वर्ग आहे अधिकाऱ्यांच्या घरी जास्तीचे कर्मचारी दिले जातात. आवश्यक स्टाफ देण्यात यावा. तीन-तीन स्वीय सहाय्यक ते कमी करा. गरज नाही. एक स्वीय सहाय्यक काम करु शकतो. हे नियोजन केव्हा करणार आहात. सुरक्षा रक्षक किती पाहिजे. अधिकारी स्वत: पुरते पाहतात. महापलिका आस्थापनेवर सर्वात जास्त खर्च होत आहे. अधिकाऱ्यांनी त्यांचा फायदा त्यांचे स्टेटस बघितले, इथपर्यंत मर्यादीत झाले. जो अर्थसंकल्प सादर केला तो अत्यंत चुकीचा सादर केलेला आहे. याकडे गंभीरतेने घ्यावे. रिवाईज बजेट सादर करुन मंजूरी घेतली जाते. मान्यता दिली नाही तर, ठेकेदाराची बीले देता अधिकारी जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे.

**मुख्यलेखाधिकारी :** तांत्रिक मुद्दे ठेवतो. गतवर्षी सुध्दा प्रशासनाने १२८.६१ कोटीचे अंदाजपत्रक सादर केलेले होते. पाणीपट्टीत वाढ केली त्यामुहे ७-८ कोटीची वाढ झाली. परंतु टारगेट देतांना स्थायी समितीने १४६ कोटीचे उद्दीष्ट ठेवले. सर्वसाधारण सभेने त्यात आणखी वाढ करुन १४९ कोटीचे करण्यात आले. प्रशासनाने दिलेले अंदाजपत्रक व सभागृहाने करुन दिलेली वाढ यात

२१ कोटीचा फरक येतो. जो कर्मचारी कार्यरत होता. त्या कर्मचाऱ्यांकडुनच ही वसूली होणार होती. ते गृहीत धरुन हे वास्तववादी अंदाजपत्रक मांडलेले होते. कर्मचाऱ्यांच्या सुध्दा काही अडचणी प्रशासनासमोर येतात. जसे शासनाने मागासवर्गीयां व्यक्तीरिक्त इतर नोकर भरती बंद केलेली होती. जागा रिक्त असूनही भरती करता येत नाही. बरेच प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी सादर केलेले असून, अदयाप शासनाने त्यास मान्यता दिलेली नाही. ३१ जानेवारी २००४ रोजी शासनाने नोकर भरतीवरील बंदी उठविली आहे. कर्मचारी कमी असण्याचे हे एक महत्वाचे कारण आहे. १२८ कोटीचे उद्दीष्ट होते. थकबाकी मोठया प्रमाणात असून, त्याच मनुष्यबळावर एकाच वर्षात वसूल करणे शक्य होणार नाही. गेल्या वर्षात जकात ५७ कोटी वसूल झाली. संगणकीकरण करण्याचा प्रस्ताव होता. ते झाल्यास जकातीत वाढ होईल. यादृष्टीने २०% वाढ गृहीत धरुन ६७ कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले होते. त्यात स्थायी समितीने १ कोटी व सर्वसाधारण सभेने १ कोटी अशी दोन कोटींची वाढ करुन ६९ कोटी इष्टांक दिला दरवर्षी १०% नैसर्गिक वाढ गृहीत धरुनच इष्टांक दिला जातो. परंतु मागील वर्षात तत्कालीन मा. आयुक्त गजभिये यांनी संगणकीकरण करणार, गोडावून नवीन नाका उभारणार त्यामुळे वाढीव बजेट ठेवण्यात आलेले होते. अंदाजपत्रक मंजूर करीत असतांना जकातीचे खाजगी करण व्हावे म्हणून सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली होती. त्या अनुषंगाने खाजगीकरण करायचे असेल तर, संगणकीकरण करण्याची अंमलबजावणी थांबविलेली होती व नाका उभारणीचे काम झाले नाही. गतवर्षी ५७ कोटीची वसुलीच्या १० नैर्सर्गिक वाढ गृहीत धरल्यास ६४ कोटीचाच इष्टांक होतो. मालमत्ता पाणीपट्टीत जकात यात वसुलीचा विचार केला तर जवळपास २१ कोटीची वाढ करुन या सभागृहाने दिलेली होती. जी वाढ करुन दिलेली ती जास्त प्रमाणात होती. मनपाकडे मनुष्यबल कमी आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा केला इष्टांक वाढवून दिला म्हणून टारगेट पूर्ण झाले नाही. सभागृहाने केलेली वाढ प्रशासनास चुकीची वाटते का? प्रशासन वसुली करु शकत नसेल तर, सभागृहाला दोषी ठरवू नये. दिशाभूल करतात. या ठिकाणी सभागृहाचा अपमान होता कामा नये. याची दखल घ्यावी. इष्टांक वाढवून दिला. सभागृहाने चुकीचा निर्णय घेतला का? असे प्रशासनास वाटत असेल तर, योग्य नाही.

**मुख्यलेखाधिकारी :** सभागृहाचा अपमान होईल अशी भावना प्रशासनाची नाही. नैर्सेगिक वाढ विचारात घेवूनच अंदाजपत्रक सादर केलेले असते. वाढ करावयाची असेल तर, त्यास काही तरी बेस असतो.

**श्री. संजय शिरसाठ :** १०% त्रैमासिक वाढ धरण्यात येते. ४०% चोरी होते. हे गृहीत धरणार की, नाही. एक खाजगी व्यक्ती ७२ कोटीची निविदा भरतो. ७२ कोटीचा जोडा खाजगी करणातून लगावण्यात येतो. तुमचे पाप जनतेला ताप हे मान्य करावे. ही रक्कम का गृहीत धरली जात नाही. वास्तविकता गृहीत धरुन प्रशासनाने खुलासा केला पाहीजे. प्रशासनाची चोरी लपविण्यासाठी चुकीची माहीती देतात. त्यामूळे वसूलीवर परिणाम होतो. उत्पन्न येत नाही. जनतेची कामे होत नाहीत. जनतेला व नगरसेवकांना याचा त्रास सहन करावा लागतो.

**मुख्यलेखाधिकारी** : गतवर्षी ५७ कोटी जकातीची वसुली झालेली होती. १०% गृहीत धरल्यास ६४ कोटी पर्यंत येतात.

**श्री. संजय शिरसाठ :** गेल्या वर्षभरात जकात अधिक्षक यांनी ४०० ते ४५० जकात चोरीची प्रकरणे पकडण्यात आले हे सुध्दा नैर्सेगिक वाढीत येते का?

**मुख्यलेखाधिकारी** : जेवढेही जकात चोरीची प्रकरणे होती त्यातून ४० लक्षच्या वर उत्पन्न मिळालेले नाही. मालमत्तावर व पाणीपट्टीची थकबाकी ही एका वर्षातील नसून ८-१० वर्षापासूनची आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** अहवाल पुन्हा प्रशासनाचे वाचन करावे. २५% सुध्दा थकबाकी वसुली झालेली नाही. किमान ४०% वसूली होणे गरजेचे आहे. पाणीपट्टीत ६००/- वाढ करुन सुध्दा ९ कोटीच वसूल झाले. १० कोटीचे टारगेट सुधारीत अर्थसंकल्पात दिले.

**मुख्यलेखाधिकारी** : मालमत्ता कराचे चालु वर्षाचे डिमांड फक्त १३.५० कोटीचे असून, उद्दीष्ट २३ कोटीचे ठेवण्यात आलेले आहे. एकाच आर्थिक वर्षात त्याच मनुष्यबळाकडून एवढी मोठी वसूली होणे शक्य नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकी एक तर माफ करावी नसता वसूल का झालेली नाही. त्याचा सविस्तर आढावा देण्यात यावा गेल्यावर्षी २३ कोटीचे उद्दीष्ट ठेवले. १३ कोटी रेग्युलर डिमांड आहे. कोणत्याही प्रकारची वाढीव वसूली झालेली नाही. मालमत्ता करामध्ये नाही. पाणीपट्टीत सुध्दा नाही. जनतेला हा संपूर्ण कर माफ करावा. आपल्या कार्यकाळात चांगले काम होईल. जनता आपले नाव घेईल. थकबाकी वसूल करण्याची प्रशासनाची इच्छा नाही. येणाऱ्या आर्थिक वर्षात एम. एस. ई. बी. ला पूर्ण बील अदा करणे भाग असून ३० कोटीची स्पील ओव्हरची कामे येणार आहेत. कोणतेही विकासाचे नवीन काम होणार नाही. अर्थसंकल्प ठेवला तो चुकीचा आहे. वसूली नगण्य आहे. जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

**श्री. माणीक साळवे :** नागरिकांकडे असलेली थकबाकी नागरीक ३१ मार्च पर्यंत भरणा करण्याची तयारी दर्शवित असतील तर अशा नागरीकांना २०.२५% रक्कमेची सवलत दयावी. जेणे करुन मनपाचे उत्पन्न वाढेल.

**मुख्यलेखाधिकारी** : कोणत्याही प्रकारची सूट देता येणार नाही. जे नागरीक कर भरणा करणार नाहीत. त्या रक्केवर व्याज आकारणीचा प्रस्ताव मंजूर केलेला होता. तो ही नाकारण्यात आलेला आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** मा. मुख्यलेखाधिकारी सभागृहाचा अपमान करीत आहोत. नसता आम्हाला सभात्याग करावा लागेल. तीच थकबाकी वसूल होत नाही. केव्हा वसूल करणार याचा खुलासा करावा.

**श्रीमती पार्वती मानकापे :** मोठया रक्कमेची तूट निर्माण झालेली आहे ती का निर्माण झाली, बरोबर खुलासा देण्यात यावा.

**मुख्यलेखाधिकारी** : प्रशासनाच्या तीनही अधिकाऱ्यांनी भूमिका मांडलेली आहे. कारणे दिली. वाढ कशा पध्दतीने केली जाईल याचा सविस्तर खुलासा उपआयुक्त (म) यांनी केलेला आहे.

**श्री. नंदकुमार घोडेले :** सन २००३-२००४ च्या सुधारीत अर्थसंकल्पावर चर्चा होत आहे. वीज मंडळाचे पाण्याचे विदयुत बीलापोटी १.६५ कोटी रुपये दरमहा बील येते. ते कमी कसे करता येईल यासंबंधी वारंवार सभागृहात चर्चा होवून वेगवेगळया

सूचना प्रशासनाने केलेल्या आहेत. त्यात प्रशासनाला व लोकप्रतिनिधींना सुध्दा यश झालेले नाही. व्यापारी संकुल उभारणे, पाण्याचे ऑडीट करणे. याबाबत सुध्दा काहीच अंमलबजावणी झालेली नाही. नागरिकांनी बांधकाम परवानगी देतांना काही अटी शिथील केल्यास उत्पन्नात वाढ होईल. अनाधिकृत बांधकाम होणार नाही व सन २००३-२००४ च्या सुधारीत अर्थसंकल्पात मान्यता दयावी.

**श्री. माणीक साळवे :** मनपाने उस्मानपुरा पदमपूरा व इतर काही भागात लाखो रुपये खर्च करुन व्यापारी संकुल तयार केले परंतु भाडयाने दिले नाही माझ्या वार्डात सुध्दा ३० गाळयांचे बांधकाम आहे. अदयाप भाडयाने दिले नाही. यात मनपाचे उत्पन्न बुडत आहे. भाडयाचे दर कमी करुन त्वरीत हे गाळे भाडयाने देण्यात यावे. तसे प्रशासनास आजच आदेश द्यावेत.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** हर्षनगर भागात व्यापारी संकुल उभारले आहे. अनेक वॉर्डात गाळे बांधून पडलेले आहेत. भाडयाने देण्याबाबत निर्णय घेतला पाहिजे. जो खर्च झाला तो वसूल व्हावा. बांधकाम करतांना विचार केला पाहिजे. कमी दर निश्चित करुन कुणी घेण्यास तयार असेल तर देण्यात यावे.

**श्रीमती पार्वती मानकापे :** किती ठिकाणी किती गाळे बांधून आहे. त्याची माहीती घ्यावी व भाडेतत्वावर देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**मालमत्ता अधिकारी :** एकुण २२ ठिकाणी गाळे बांधण्यात आलेले आहेत. किती गाळे भाडेतत्वावर दिले किती रिकामे आहेत. याची माहिती तूर्त माझ्याकडे नाही.

**श्री. माणीक साळवे :** सहा महिन्यापूर्वी गाळयांचे सर्वेक्षण करण्यासाठी समिती स्थापन केली होती. काहीही कार्यवाही झालेली नाही.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** व्यापारी संकुल म्हणजे मालमत्ता विभागाचा विषय असून, या संदर्भात अनेकदा चर्चाही झालेली असून, ३-४ वेळेस वृत्तपत्रात जाहीरात देऊनही कोणी होण्यास तयार नाही. दर वाढीव वाटत असतील तर मा. आयुक्तांना अधिकार दयावेत. वाटाघाटी करुन निर्णय घेतील.

**मा. सभापती** : प्रशासनाने तपासणी करुन प्रस्ताव सादर करावा.

**मा. आयुक्त** : आपल्या भावना योग्य आहेत. दोन महिन्यापासून यावर अभ्यास करीत आहे. मी स्वत: गाळे बघितलेले आहेत. उपआयुक्त (म.) यांना आदेशित केले की, जेथे व्यापारी संकुल आहे. त्याच भागात खाजगी व्यक्तीने मनपापेक्षा ५०% किंवा ७०% कमी दराने दिलेले असेल तर मनपालाही विचार करावाच लागेल. काही ठिकाणी मनपाचे गाळे भाडे दर १८०० तर खाजगी व्यक्ती त्याच पध्दतीचा गाळा ४०० रुपये प्रमाणे भाडयाने देतो. अशी सुध्दा परिस्थिती आहे. जसे एखादया जमिनीचे मूल्यांकन काढले जाते तर मनपाचे प्रत्यक्षात गाळे विकले जात नाहीत. या संबंधीचा एक प्रस्ताव तयार करुन सादर करावयाच्या सूचना मी दिलेल्या आहेत. आताच चर्चा केली मा. आयुक्तांना अधिकार दयावेत वैगेरे परंतु भाडे निश्चिती करणे हे अधिकार स्थायी समितीला आहेत. ते अधिकार मी घेणे योग्य होणार नाही. सुरुवातीस सभागृहाला कळेल यासाठी एक-दोन प्रस्ताव उपआयुक्त (म) यांनी सादर करावेत. या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासनाची भूमिका त्या जनतेला आवडली तर प्रतिसाद मिळेल. उर्वरीत ज्या काही जागेवर गाळे रिकामे आहेत. त्यांचा एकच प्रस्ताव सादर करावा. दुसरी सूचना अशी की, शहर अभियंता यांनी त्याची दखल दयावी. बऱ्याच दिवसांपासून गाळे बांधून

आहेत. २००४ पर्यंत भाडे तत्वार घेतलेच नाही. त्याचे नुसते लाईफ कमी होते असे नाही. नुकसान सुध्दा होते त्याची भरपाई करावी लागते आणि हा बोजा वाढत जातो. ऑडीट हा पॉईन्ट सोडणार नाही. म्हणून अशा मालमत्तेचा भाडयाने देण्यासंबंधी पुढील बैठकीत तसा प्रस्ताव सादर करावा. त्या बाबतीत वैधानिक बाब सुध्दा बघीतली जाईल.

**मा. सभापती** : प्रशासनास सूचना देण्यात येतात.

१. मार्च अखेर पर्यंत जास्तीत जास्त वसूली करावी.

२. झोन निहाय वसूलीसाठी आवश्यक तो कर्मचारी देण्यात यावा.

३. वसूली न करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांचेवर प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. उत्पन्न कसे वाढेल याची काळजी प्रशासनाने घ्यावी. तसेच एक दोन बदल करण्याबाबत चालले होते, त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. सुधारीत अर्थसंकल्प सर्वांच्या संमतीने मंजूर करण्यात येत आहे.

**मा. आयुक्त** : चांगले काम होत असेल तर, त्याची सुध्दा नोंद असावी. उदयान विभागाने जानेवारी अखेर अपेक्षेपेक्षा २ लक्ष जास्त वसूल केले.

**श्री. संजय शिरसाठ** : प्रवेश कर वाढविलेला होता म्हणून दोन लक्ष वाढ झालेली आहे. कोणतेही जास्तीचे उत्पन्न वाढलेले नाही.

**मा. आयुक्त** : पाणीपट्टी जायकवाडी यामध्ये जानेवारी अखेर ३८ लक्ष वसूली जास्तीची झालेली आहे. इतर वसूली जी झाली ती ९३ लक्षने जास्त झालेली आहे.

**मा. सभापती** : आजची सभा तहकुब करण्यात येते. उदया बुधवार रोजी दुपारी ०३.०० वाजता सन २००४-२००५ च्या मुळ अंदाजपत्रकावर चर्चा करण्यासाठी सभा घेण्यात येईल सर्वांनी उपस्थित राहावे.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ११-०२-२००४ रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभेचे (दि. १०-०२-२००४ ची तहकुब सभा) (का. व. क्र. १६) इतिवृत्त. बुधवार दिनांक ११-०२-२००४ रोजी स्थायी समितीची सभा (दि. १०-०२-२००४ ची तहकुब सभा)मा. सभापती भाऊसाहेब ताठे यांचे अध्यक्षतेखाली " मलिक अंबर स्थायी समिती सभागृहात " येथे दुपारी ४.०० वाजता सुरु झाली. या सभेस मा. आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. चंद्रखेखर लक्ष्मीनारायण जैस्वाल | -//- |
| ३. | स. स. श्री. ठकुजी रामसिंग वाणी | -//- |
| ४. | स. स. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| ५. | स. स. सौ. जेजुरकर ताराबाई सुधाकर | -//- |
| ६. | स. स. श्रीमती मानकापे पार्वतीबाई लहानू | -//- |
| ७. | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| ८. | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ९. | स. स. श्री. कैसरखान बद्रोद्यीनखान | -//- |
| १०. | स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| ११. | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| १२. | स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| १३. | स. स. श्री. शेख इलियास किरमाणी | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती** : या वर्षीच्या मुळ अंदाजपत्रकावर चर्चा करावी. मुख्यलेखाधिकारी यांनी सभागृहाला थोडक्यात माहिती दयावी.

**मुख्यलेखाधिकारी** : सन २००४-०५ च्या मुळ अंदाजपत्रकाची चर्चा होण्यापुर्वी प्रशासनातर्फे थोडक्यात माहीती स्पष्ट करण्यात येते. मूळ अंदाजपत्रक हे १६०.८१ कोटीचे असून, यात प्रामुख्याने जकात विभागावर ७२ कोटी मालमत्ता कर २४ कोटी नगररचना विभागाची ४.७७ कोटी आरोग्य विभाग २५ लक्ष प्राणी संग्राहालय ३४ लक्ष उदयान ३४ लक्ष मालमत्ता विभाग २.४४ कोटी पाणीपट्टी शहर २८ कोटी पाणीपट्टी जायकवाडी ३.२० कोटी, अनुदान ४ कोटी ठेकेदारांची अनामत रक्कम जमा ९३ लक्ष अग्निशमन विभाग ५९ लक्ष ठेवीवरील व्याज ६० लक्ष कर्ज उभारणी ४.५० कोटी गुंठेवारी अंतर्गत ५ लक्ष अग्रीम रक्कम १.६१ कोटी तर प्रशासकीय विभाग १.१४ कोटी इतर किरकोळ वसूली १.५६ कोटी असे एकूण १६०.८१ कोटीचे उत्पन्न म्हणून मिळेल असा अंदाज वर्तविण्यात आलेला आहे. यातून वर्षाचा जो वैधानिक खर्च जो की, ९५.९५ कोटीचा भरणे आवश्यक आह. त्यात पगार व भत्ते यावर ४३.६५ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. ११२४ कामगारांना सेवेत कायम केले त्यापोटी ३ कोटीचा जास्तीचा आर्थिक बोजा वाढलेला आहे. महाराष्ट्र राज्य विदयुत मंडाळास ३० कोटी रुपये

देणे आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेसाठी ३ कोटीची तरतूद केलेली आहे. गोदावरी खोरे विकास महामंडळावर १.२५ कोटीची तरतूद सरकारी कर्ज परतफेड यावर १० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. छावणी बोर्डाचा हिस्सा ७० लक्ष रस्ते विकास महामंडळास रस्ते विकास अंतर्गत १.५० कोटी द्यावयाचे आहेत. वेतन निधी, पेन्शन निधी, वृक्ष घसारा निधी हे कायदयाने देणे आवश्यक असते. त्यावर १.६५ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. शासनाकडे शिक्षण कर व इतर ज्या रकमा जमा कराव्या लागतात. त्यासाठी २ कोटीची तरतूद केलेली आहे. ठेकेदारांचे परताव्या पोटी १.५८ कोटीची तरतूद आहे. अशा प्रकारे ९५.९५ कोटी इतकी रक्कम वैधानिक खर्च म्हणून गृहीत धरणे आवश्यक आहे विकास कामासाठी ३० कोटी स्वेच्छा निधी ३ कोटी, सिडको एक्सप्रेस जलवाहिनी १ कोटी भूसंपादनासाठी ७ कोटी संगणकीकरणासाठी १.५० कोटी व मनपाचे इतर प्रशासकीय व महसूली खर्च आहेत. यावर २२ कोटीची अशा एकूण १६०.८१ कोटीचा खर्च होणार आहे. वैधानिक खर्च जाता ३० कोटी व ३ कोटी स्वेच्छानिधी व सिडको एक्सप्रेस जलवाहिनीसाठी १ कोटी असे ३४ कोटीची विकास कामे या वर्षात करत येतील. स्पील ओहरच्या रक्कमा कमी राहतील याची काळजी प्रशासनाने घेतलेली आहे. फक्त ६.४७ कोटीच्या कामाचाच स्पील ओव्हर राहील असे नमूद केले असून, मा. आयुक्त यांनी सर्व कार्यकारी अभियंता यांना सूचना दिल्या व स्पील ओव्हरच्या रक्कमा वाढणार नाहीत याची दक्षता घेतली जाणार आहे. आता सविस्तर माहिती प्रशासनाच्या वतीने दिलेली असून, उत्पन्न बाजूवर प्रथम चर्चा करावी. खर्च बाजू नंतर घेण्यात येईल.

**०१. जकात कर वसुली :**

**श्री. रतनकुमार पंडागळे :** जकात खाजगी करणाची कार्यवाही चालु होती. तेव्हा ७५ कोटीचे उत्पन्न येणे आवश्यक आहे. असे प्रशासनाचे नमूद केलेले होते. ७२ कोटीचे उद्दीष्ट जकातवर ठेवण्याचा हेतु काय? प्रशासनाने खुलासा करावा. ७२ कोटीचे वाटाघाटीनंतर संबंधित खाजगी व्यक्ती त्याचा अस्थापनेचा खर्च वगळता ७२.११ कोटी देण्यास तयार होता. यात ७२ कोटीच्या उद्दीष्टात मनपाचा अस्थापनेचा खर्च सुध्दा समाविष्ट आहे. सविस्तर खुलसा देण्यात यावा. उद्दीष्ट कमी का ठेवण्यात आले?

**मुख्यलेखाधिकारी :** जकात खाजगीकरणाची निविदा काढलेली होती तेव्हा ७५ कोटी उद्दीष्ट दिलेले होते ही बाब सत्य आहे. जुलै महिन्यातच खाजगीकरणाबाबत कार्यवाही सुरु झालेली होती. निविदेचा कालावधी १ जानेवारी व ३१ डिसेंबर २००४ असा होता. उद्दीष्ट निश्चित करतांना जे चालू वर्षाचे उत्पन्न प्राप्त झालेले आहे. त्यावर उद्दीष्ट निश्चित करावे लागते. मागील वर्षी ५९ कोटी रुपये प्राप्त झालेले होते. त्यात २०% नैर्सेगिक वाढ धरल्यास ७१.७० कोटी पर्यंत उद्दीष्ट येत होते. डिसेंबर अखेरच ६२ कोटी पर्यंतच प्राप्त होईल. त्यावर साधारणत: २०% वाढ गृहीत धरुन ७५ कोटीचे उद्दीष्ट गृहीत धरलेले होते. मागील वर्षाचे उत्पन्न बघितले तर १ जानेवारी ते तसेच अस्थापना खर्च ॲड केला तर ७२.७५ कोटीचेच उद्दीष्ट होते. जी निविदा प्राप्त झाली ती ७२.११ कोटीची होती. चालु आर्थिक

वर्षात ६९ कोटीवर १०% नैर्सेगिक वाढ गृहीत धरुन ७५ कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले होते.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** ७२ कोटीची निविदा एका खाजगी व्यक्तीने दिली त्यांनी त्याचा अस्थापना खर्च वगळुन ती निविदा भरलेली आहे. त्यातून त्यात मिळणारा नफा हा वेगळा असे असतांना ७२ कोटीचे उद्दीष्ट का ठेवण्यात आले.

**मुख्यलेखाधिकारी** : वार्षीक उद्दीष्ट ठरवित असतांना मागील चार वर्षाचा विचार केला तर १०% च्या वर कुठेही वाढ झालेली दिसून येणार नाही. गतवर्षात ६९ कोटीचे उत्पन्न अपेक्षीत धरले. कालच ६४ कोटी उद्दीष्टास मान्यता दिली. त्याचे १० नैर्सेगिक वाढ गृहीत धरल्यास ७० कोटीच होतात. परंतू संगणकीकरण होणार यामुळे आणखी १५० कोटीची वाढ गृहीत धरुन ७२ कोटी उद्दीष्ट देण्यात आलेले आहे.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** ६४ कोटीला मान्यता दिली. कर्मचारी नाही. सोयी सुविधांचा अभाव दाखविला म्हणून, मान्यता दिलेली आहे. उद्दीष्ट ६९ कोटीचेच आहे.

**मुख्यलेखाधिकारी** : कालच ६४ कोटीच्या उद्दीष्टास स्थायी समितीने मान्यता दिली. त्याचे १०% नैर्सेगिक वाढ गृहीत धरल्यास ७०.४० कोटीच होतात.

**श्री. संजय शिरसाठ :** निविदा प्राप्त झाली. सभेत प्रस्ताव आला तेव्हा त्यात या वर्षात ७५ कोटीचे उद्दीष्ट राहणार असे नमूद केलेले होते. ७२ कोटीच का ठेवण्यात आले ३ महिन्यात असा बदल झाला की, ३ कोटी कमी वसूली होवू शकते. बजेट बनवितांना वर्षाला अनूसरुन तयार होते महिन्याला नाही.

**मुख्यलेखाधिकारी** : रिवाईज बजेट जे होते त्यात ९ महिन्याचा आढावा घेतलेला होता. त्यानुसार नैर्सेगिक वाढ गृहीत धरु ७२ कोटीपर्यंत उद्दीष्ट होईल. अपेक्षीत उत्पन्न गृहीत धरलेले होते. लिखित स्वरुपात याचिकेवर सुध्दा आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : ६९ कोटींचा इष्टांक जकातीचा दिलेला होता. यात १०% नैर्सेगिक वाढ गृहीत धरल्यास उद्दीष्ट ७५ कोटीपर्यंत दिले जाऊ शकते. मुख्यलेखाधिकाऱ्यांनी जी भूमिका मांडली ती वास्तववादी आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** होऊ शकते. होईलच असा शब्द कोणत्याही अर्थसंकल्पात कधीच नसतो. पुस्तकात दिले २४ कोटी पाणीपट्टी वसूली करु शकतो. असे किती वेळा प्रशासन नमूद करणार यापुढे सभागृहाची दिशाभूल होता कामा नये.

**मुख्यलेखाधिकारी** : अंदाजपत्रक तयार करतांना अंदाज बांधलेले असतात. शेवटी ते अंदाजच आहेत.

**श्री. नंदकुमार घोडेले :** संबंधित ठेकेदार ७२ कोटी हे त्याचा अस्थापना खर्च वगळता देण्यास कबुल होतो. मनपाने सुध्दा निविदेत ७५ कोटी वसूल होतील असे दाखविलेले होते. ७२ कोटीत वाढ करुन ८० कोटी उद्दीष्ट ठेवण्यात यावे. आणखी प्रयत्न झाले असते तर खाजगी व्यक्ती ७५ कोटी उद्दीष्ट देण्यास तयार असेल.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** खाजगी करणाचा प्रश्न उपस्थित झाला तेव्हा ७५ कोटीचे उद्दीष्ट या वर्षात वसूल होवू शकते. असे दिले होते. सर्व यंत्रणा मनपाकडे आहे. कॅमेरा बसविणार आहोत. संगणकीकरण करणार आहोत. खाजगी व्यक्ती ७२ कोटीचे उद्दीष्ट देण्यास तयार होते. ७५ कोटीची तयारी प्रशासनाने

सुध्दा दाखविलेली होती. या शहरात मोठया प्रमाणात माल येतो. ८० कोटीचे उद्दीष्ट गाठण्यास प्रशासनास फारसा त्रास होणार नाही. ८० कोटी वसूल झाले नाही तरी, ७५-७६ कोटीपर्यंत उद्दीष्ट होवू शकते. वाढलेले उत्पन्न हे नक्कीच शहराच्या विकासाच्या कामासाठी उपयोगी पडेल. यंत्रणा राबवावी. सभागृहाची त्या खर्चास मान्यता राहील. ८० कोटीचे उद्दीष्ट देण्यात यावे. प्रशासनाने ८० कोटी वसूल करण्याचे प्रयत्न करावेत.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे** : अंथरुण बघून पाय पसरावे, अशी म्हण आहे. परंतू त्या उलट असे आहे की, पास पसरावे अंथरुण आपोआप मोठे होते. जे उद्दीष्ट प्रशासनाने ठेवलेले आहे. त्यात १०% वाढ करुन उद्दीष्ट निश्चित करावे. प्रशासनाचे काम चांगले आहे मा. आल्यापासून सकारात्मक कार्यवाही होत आहे.

**मुख्यलेखाधिकारी** : जकात खाजगीकरणाची निविदा काढतांना संचिकेवर सुध्दा नमूद केलेले आहे की, मागील ९ महिन्याचे रिवाईज टारगेट किती काढलेले होते. सुधारीत टारगेट ७२.५५ कोटीच येऊ शकते. ७५ कोटी हे अपेक्षीत उत्पन्न होते. निविदा धारकाने सुध्दा ७५ कोटी ऐवजी ७२.११ कोटीपर्यंत वाटाघाटी केलेल्या आहेत. यात वाढ सुचवून पुन्हा वसूल न झाल्यास प्रशासनावर ठपका ठेवला जातो. चालु आर्थिक वर्षात १०.७० कोटीची कामे झालेली नाही. उत्पन्न बाजू वाढविली म्हणजे खर्च बाजूत वाढ होते. उत्पन न मिळाल्यास बऱ्याच कामांना खिळ बसते. ती कामे होत नाहीत. ७२ कोटीचा इष्टांक दिला आहे तो मान्य करावा.

**श्री. माणिक साळवे :** खाजगीकरण करतांना ७५ कोटी वसूल होवू शकते. असे प्रशासनानेच प्रस्तावात नमूद केलेले आहे. खाजगी अभिकर्त्यांमार्फत ७२.११ कोटी रुपये देण्यास तयार होते. ७२ कोटी ऐवजी यात एक कोटीची वाढ करुन ७३ कोटी उद्दीष्ट ठेवण्यात यावे व सभागृहानेही ते मान्य करावे.

**श्री. इलियास किरमाणी :** ७२.११ कोटी खाजगी व्यक्ती देण्यास तयार होते. त्याचा अस्थापना खर्च वगळता ७२ कोटी देण्यास तयार होते. तर यात २-३ कोटीची वाढ करण्यात यावी.

**श्री. नंदकुमार घोडेले :** कालच सुधारीत अर्थसंकलप मंजूर केला. वास्तवादी बजेट आपण फुगवून १४९ कोटी केले. जवळपास ३१ कोटीची तूट निर्माण झालेली आहे. सभागृहाच्या माथी खापर फोडले. पुहा संभ्रम निर्माण येवू नये. १०.१० कोटीची कामे थांबू नये. यासाठी वसुलीवर प्रशासनाने भर दयावा. ७२ कोटीचे उद्दीष्ट दिले. त्यात १ कोटीने वाढ करुन प्रशासनाने सन २००४-०५ या वर्षात जकातीचे ७३ कोटी रुपये वसूल करावे.

**श्री रतनकुमार पंडागळे :** १ कोटीने वाढ करुन ७३ कोटीचा इष्टांक देण्यात यावा.

**मा. सभापती** : जकातीचे ७२ कोटीचे उद्दीष्ट दिलेले आहे. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन १ कोटीची वाढ करण्यात येते. व ७३ कोटीची जकात प्रशासनाने वसूल करावी. दिलेले उद्दीष्ट पूर्ण न झाल्यास मा. आयुक्तांनी कार्यवाही करावी.

**०२. मालमत्ता कर वसूली :**

**मा. आयुक्त** : श्री. कमलाकर कड हे महसूल विभागातील अधिकारी यांना नुकतीच उपजिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती झाली असून, त्यांनी नुकतीच

मनपामध्ये कर निर्धारक आणि संकलन या पदावर नियुक्ती झालेली आहे. यापेक्षा जास्त परिचय ते देतील.

**कर निर्धारण व संकलन :** माझे नांव कमलाकर किशनराव फंड, तहसीलदार म्हणून माझी १९९६ मध्ये निवड झाली १९९६-९८ ला यवतमाळ येथे प्रशिक्षण पूर्ण केले. सन १९९८-२००० पर्यंत लातूर येथे तहसीलदार म्हणून माझी नेमणूक होती. सन २००० मध्ये जालना येथे तहसीलदार म्हणून नियुक्ती झाली. २००२ मध्ये औरंगाबाद तहसीलदार म्हणून नियुक्ती झाली. ४ फेब्रुवारी २००४ पासून प्रतिनियुक्तीवर मनपामध्ये कर निर्धारक व संकलक या पदावर नियुक्ती झालेली आहे.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** मनपा अस्तित्वात आल्यापासून सिडकोचा भाग सुध्दा मनपाकडे आहे. नगर विकास खाज्याचे मंत्री महोदय व शहरात येउुन गेले. सिडको हस्तांतरणाचा जो वाद चालु होता. तेथील नागरिकांना मालमत्ता कर लावण्यात येऊ नये. ती मालमत्ता ही सर्व सिडकोची आहे. कुणाच्या नावांवर झालेली नाही. जो मालमत्ता कर सिडकोकडुन का वसुली करु नये?

**श्रीमती जयश्री किवळेकर :** सिडकोने सिडको वासीयांना मालमत्तेचा हक्क दिलेलाच नसल्याने नागरिकांना मालमत्ता कर भरण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सिडकोच्या नागरिकांकडून मालमत्ता कर होऊ नये. सिडकोकडुन वसूल करावे.

**श्री. माणिक साळवे :** सिडकोने घर बांधलेले मालमत्ता कर लागलेला नाही. सिडको विभागाकडुन मालमत्ता कर वसूल करण्यास प्रशासनास काय अडचण आहे. खुलासा करावा. एखादयाने टपरी टाकणे तरी भाडे वसूल करण्यात येते. सिडकोने घराचे बांधकाम करुन विक्री करुन एक प्रकारचा व्यवसायच करते.

**मुख्यलेखाधिकारी :** सिडको हे स्वतंत्र प्राधिकरण असून, सिडको हा भाग नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. सन १९८१ साठी टॅक्स लावण्याबाबत कार्यवाही सुरु केलेली होती. परंतु कोणीही टॅक्स भरलेला नाही. परंतु कोणीही टॅक्स भरलेला नाही. २-३% वसूली झालेली होती. त्याचे कार असे की, मनपा पाणी पुरवठयाशिवाय कोणत्याही सुविधा पुरवित नाही. ह्या सुविधा सिडको माफत पुरविल्या जातात व सिडको सेवाकर म्हणून त्या घर मालकाकडुन वसुल करते. हस्तांतर होईल तेव्हापासून मालमत्ता कर वसूल करण्यात यावा असा ठराव याच सभागृहाने पारीत केलेला आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** जो काही प्रश्न सभागृहात उपस्थित होतो. त्यांचे संबंधी उत्तर मुख्यलेखाधिकारी यांनीच देणे बरोबर नाही. संबंधीत जे विभाग प्रमुख आहेत त्यांनी खुलासा करावा. लेखा विभागाकडे आकडेवारी करणे हा भाग येतो. सर्व विभागाचे उत्तर देणे बरोबर नाही. त्या विभागाचे उपआयुक्त येथे हजर आहेत. त्यांनीच खुलासा करावा. महसूल विभागाचा प्रश्न उपस्थित झाल्यास उपआयुक्तांनीच खुलासा करणे गरजेचे आहे. त्यांचा अभ्यास नसेल तर, तसे स्पष्ट करावे.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** हस्तांतरण झालेले नाही. मनपाच्या हद्दीत येणाऱ्या मालमत्तेचेच कर वसूल करण्याचे काम १००% होत नाही. हस्तांतरण होईल तेव्हा तो प्रश्न

येईल. २४ कोटीचे उद्दीष्ट दिले. आतापर्यंत ५ कोटी वसूल झाले. १३ कोटी वसूल करुन देणार आहात. ७-८ कोटी उर्वरीत वसूली कशी होणार आहे त्यावर खऱ्या अर्थाने चर्चा करणे गरजेचे आहे. लोक न्यायालय भरवावे. स्वतंत्र न्यायालय चालू करावे. त्यामुळे निकाल लवकर लागून वादग्रस्त प्रकरणातून ५-६ कोटीचे उत्पन्न मनपास मिळू शकते. याबाबत तात्काळ निर्णय घेण्यात यावा.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** जी प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. ती सुध्दा वाटाघाटी द्वारे निकाली काढावीत. झोन वाईज किती प्रकरणे आहे. झोन वाईज लोक न्यायालय भरविण्यात यावे.

**मा. आयुक्त** : ज्या सेवा जनतेला आपण देतो त्यावर कर लावण्याचा अधिकार मनपास असतो. श्री. खैरनार यांनी सांगितलेले आहे. पाणी पुरवठा करतो आहोत त्यामुळे पाणीपट्टी घेतो.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** सिडको वासीयांकडून कर घेता येणार नाही. पाणी पुरवठा होती तर वर्षाकाठी पाणीपट्टी वसूली करण्यात येते. पाईपलाईन सिडकोनेच टाकुन दिलेल्या होत्या जास्त प्रमाणात वसूली आज सिडको भागाचीच आहे.

**श्री. नंदकुमार घोडेले :** ज्या दिवसांपासून हस्तांतरण होईल तेव्हापासून मालमत्ता कर लावण्यात यावा असा ठराव सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला आहे. ४२ कोटीची थकबाकी आहे. ती वसूली कशा पध्दतीने होईल यासाठी स्वतंत्र न्यायालय व्हावे. किंवा प्रत्येक झोनमध्ये लोक न्यायालय भरवून अशी प्रकरणे निकाली काढावी. न्यायालयात काही मालमत्ता ' क ' मध्ये होत्या ' ब ' मध्ये झाल्या. ' ब ' च्या ' अ ' मध्ये झालेल्या आहेत. सर्वेक्षण एजन्सी मार्फत होईलच. वर्ष लागेल. परंतू तो पर्यंत अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन सर्वेक्षण करण्यात यावे.

**श्री. रतनकुमार पंडागळे :** मोठमोठया लोकांकडे मोठया रक्कमेची थकबाकी आहे. जास्तीत जास्त प्रयत्न करुन उद्दीष्ट २ कोटीने वाढवून देण्यात यावे.

**श्री. माणिक साळवे :** नवीन उपआयुक्त दर्जाचे अधिकारी रुजू झालेत वसूलीत मोठया प्रमाणात वाढ होवू शकेल. २६ कोटी ऐवजी २८ कोटी करावे यात २ कोटीची वाढ करावी.

**श्रीमती पार्वती मानकापे :** सारख्याच मालमत्ता असतात. कर आकारणी कमी जास्त होते. त्यामूळे नागरीक टॅक्स भरण्यास तयार नसतात. पत्राचे व छताचे घराला सारखाच मालमत्तर कर आकारतात उद्दीष्ट २६ कोटीचे असून, यात आणखी २ कोटीची वाढ करण्यात यावी.

**श्री. इलियास किरमाणी :** नवीन उपआयुक्त आलेले आहेत. त्यांचे विभागात पुरेपूर कर्मचाची वर्ग देण्यात यावा. तीन उपअभियंता देण्यात यावेत. वसूली मोठया प्रमाणात होईल. इष्टांक वाढवून दिला जातो तो पूर्ण होत नाही.

**श्री. नंदकुमार घोडेले :** झोनल कमीशनर यांना वादग्रस्त प्रकरणे निकाली काढण्याचे अधिकार देण्यात यावे.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** झोनमध्ये पूर्ण स्टाफ दिलेला नाही. लिपीक शिपाई यांची आवश्यकता आहे. झोन अधिकाऱ्यांचा काय अडचणी आहेत. त्याची माहिती घेण्यात यावी. टॅक्स वसूलीसाठी ५-६ वेळेस एका एक घरी मागणी करावी लागते.

**मा. सभापती** : झोन अधिकारी यांनी येत असलेल्या अडचणींचा खुलासा करावा.

**विभागीय अधिकारी :** झोन क्र. ४ मध्ये एकुण ३४ हजार मालमत्ता आहेत. मालमत्ता कर, पाणपीट्टी वसुलीसाठी फक्त ३ कर निरिक्षक या झोनमध्ये आहेत. एकुण वर्षाचे कामाचे दिवस २७९ आहेत. प्रत्येक कर निरिक्षकांकडे ११ हजार मालमत्ता येतात. दर दिवशी मालमत्ता धारकास भेट दिली तर ४० मालमत्ता धारकाकडे तो जाऊ शकतो. अशी विभागणी होते. त्यांना डिमांड देणे वसूली करणे इत्यादी कामे त्यात येतात. नियमानुसार ३००० मालमत्तासाठी एक कर निरिक्षक एक क. लिपीक असणे आवश्यक आहे. वसूली करणाचे कर्मचारी यांना बसण्यासाठी खुर्च्या नाही. टेबल नाही. तसेच कपाट नाहीत. या सर्व कर निरिक्षकांची बैठक बोलवावी. असे समज होण्याची शक्यता आहे की, हे सर्व कर्मचारी मनोरुग्णासारखे झालेले आहेत. दररोज त्यांचे एकम काम असते. वसूली साठी जाणे, जनतेला सांगणे. उप आयुक्तांनी सूचना केल्यानूसार त्यांचेकडे पावती बुक दिलेले आहे. ३००० मालमत्तेची वसूली करण्यासाठी एक कर निरिक्षक, एक लिपीक  जवान देण्यात यावेत. अशी विनंती आहे. पुर्ण वर्षभरात त्या ३००० मालमत्तेचा कर व पाणीपट्टी वसुली न झाल्यास तो कर निरिक्षक व क. लिपीक यांना जबाबदार धरण्यात येईल. असीसमेंट व वसुली न झाल्यास तो कर निरिक्षक व क. लिपीक यांना जबाबदार धरण्यात येईल. ॲसीसमेंट व वसुली ही वेगवेगळया दोन विभागाकडुन होते. त्यासाठी झोन अधिकारी यांचे अंतर्गतच ॲसीसमेंट व वसुलीची जबाबदारी देण्यात यावी. जेणे करुन १००% वसुली होवु शकेल व जी प्रकरणे प्रलंबीत आहे अशा एक कर निरिक्षकास ज्या ३००० मालमत्ता वसुलीसाठी देण्यात येतील त्या मालमत्तेत किती प्रकरणे प्रलंबीत आहे. त्याचा रिपोर्ट तो कर निरिक्षक क. लिपीक उपआयुक्तांकडे सादर करतील व प्रकरण निकाली काढयाचे प्रयत्न करतील त्यामूळे वसूलीत मोठया प्रमाणात वाढ होवू शकते.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** मा. आयुक्त यांनी सविस्तर खुलासा द्यावा.

**मा. आयुक्त** : झोन क्र. ४ मध्ये मी जेव्हा प्रत्यक्ष भेट दिली त्यावेळी श्री. तुर्कमाने झ ोनल ऑफीसर होते. सर्वांना बसण्यास खुर्च्या होतया. काम करण्याची कर्मचाऱ्यांची इच्छा असावी लागते. स. स. सौ. मानकापे ह्या माझ्या बरोबर होत्या. झोन ६ येथेही मी प्रत्यक्ष भेट दिली तेथीलही आढावा घेतला. झोन क्र. ४ हा विभागण्याचा प्रस्ताव आहे. ४ झोनची कर वसुली पध्दत इतर झोनच्या बरोबर करणे कदाचीत बरोबर नाही. या झोन शहराच्या एकुण ३४००० मालमत्ता आहेत. जवळपास ४०-४५% मालमत्ता एकाच झोनमध्ये येतात.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे :** १००% लोक करव बेटरमेंट चार्जेस भरतात त्या वस्त्यात ड्रेनेज लाईनचे लहानसे काम होत नाही. अशी परिस्थिती आहे.

**मा. आयुक्त** : डिमांड, असीसमेंट करणे आणि वसुलीही तीनही कामे एका ठिकाणी होणे हाच कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न चालु आहे. या संबंधीची याचिका कार्यवाहीस्तव आहे. १ एप्रिल २००४ पासून ती अंमलात येईल. जी यंत्रणा ज्या ज्या मिळकतीचा कर निर्धारण करतात. ही सर्व कामे झोनमध्ये होतील. वसुली ॲसीसमेंट आणि वसुली याची माहीती एकाच ठिकाणी मिळावी यासाठी कार्यवाही चालू आहे. त्या व्यक्तीला मुख्य कार्यालयात

येण्याची गरज पडणार दूसरा भाग असा की, कोणत्या स्तरावरील अभियंता झोनला जोडावे. जास्तीत जास्त उपअभियंता हे झोनला जोडण्यात यावे. याचे नियोजन तयार करण्याचे काम सुरु आहे. इतर महापालिकेकडे लक्ष वेधीत केले तर सर्वात सक्षम झोन कार्यालय आहे. नागरिकांना फारच कमी वेळा मुख्यालात येण्याची गरज पडेल. त्या दृष्टीने प्रशासनाचे नियोजन करीत आहे. झोन सक्षम करण्यासाठी ॲसीसमेंट व वसुली करणे हे काम हाती घेणार आहोत तसेच नुकतेच उपआयुक्त दर्जाचे अधिकारी श्री. कड महापालिकेत रुजू झालेले आहेत. कार्योक्रमे जाहीर केला. त्याप्रमाणे त्यांनी झोनला जाण्यास सुरुवात केलेली आहे. आवश्यक कर्मचारी झोनला दिला जाईल आपल्या भावनाशी सहमत आहे. किती कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. १५ दिवसात माहीती घेऊन कार्यवाही केली जाईल. कामचुकार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कार्यवाही संबंधित विभाग प्रमुख कार्यवाही करतील.

**श्रीमती पार्वती मानकापे :** झोनला फर्निचर देण्यात यावे. कर्मचाऱ्यांना शिस्त लावावी.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** कर निर्धारक व संकलक म्हणुन नवीन अधिकारी रुजु झाले. नियोजन केल्यास मालमत्ता पाणीपट्टीची मोठया प्रमाणात वसूली होईल यात शंकाच नाही उद्दीष्टात २ कोटीची वाढ करण्यात यावी. विभागीय अधिकारी, निरीक्षक लिपीक इतर कर्मचारी यांच्या अडचणी काय आहे. याची जाणीव प्रशासनाने करुन घेणे आवश्यक आहे.

**उपआयुक्त (म)** : जकात मालमत्ता व पाणीपट्टी गेल्या ६ महिन्यापासून सतत प्रतीदिन आढावा होत आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती ज्यावर अवलंबून आहे व महापालिकेस आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबाबतच्या असणाऱ्या आवश्यक बाबी मालमत्ता करात एकुण कराचा समावेश असतो. कर वसुलीसाठी कर्मचारी गेले असता सेवा देत नाही तर कर कसा भरणार अस नागरीकांचा कर्मचाऱ्यांना प्रश्न होतो. असे संघर्ष करावे लागते. झोनमध्ये ॲसीसमेंट व वसुली करण्याचा प्रस्ताव लवकरच सभागृहासमोर येईल. त्यात झोनचे बळकटी करण करणे. त्याच बरोबर झोनमध्ये किती कर्मचारी असावेत याचा कर्मचारी गाराखडा आजही महापालिकेकडे नाहीत. झोनमध्ये पॅटर्न तयार करण्यात येत आहे. २३-२४ कोटीचा इष्टांक ठेवला जात असे ८-९ कोटी अशी वसुली होत असे.

**मा. आयुक्त** : यापुर्वी वर्षाची जी डिमांड होती ती वसूल होती नव्हती म्हणून थकबाकी वाढत गेलेली आहे.

**उपआयुक्त** : मागील वर्षी किंवा त्यापुर्वी वसुल न झालेली एवढी वसुली जे की, १३ कोटी वसुली करण्याचे नियोजन केलेले आहे. विविध प्रकारच्या थकबाकी आहेत. याचा आढावा पुर्वी घेतला जात नये. तो ही घेतलेला आहे. ज्या जागा भुसंपादन झालेल्या आहेत. त्यांचा कर सुध्दा यामध्ये समावेश केलेला आह. पाडलेल्या इमारतीचा कर ही यात समावेश असून, कमी केलेला नाही. तसेच मोठया थकबाकी दारांच्या प्रकरणांचा समावेश आहे. तसेच न्यायालयीन प्रकरणे ज्यात ५-६ कोटी रु. महापालिकेस मिळु शकतील. त्याचही समावेश यात आहे. कर आकारणी ज्यांना मान्य नाही. अशा १५०० प्रकरणे आहेत. त्याची एकुण मागणी ८ कोटीची आहे. जवळपास १४ कोटीचा कर जमा होणारी वादग्रस्त प्रकरणे निकाली

लागलेले आहे. त्यामूळे कर आकारणीची लेखा परिक्षणामध्ये काही मुद्दे उपस्थित झालेले आहेत. एका मालकाने भाडेकरुन बरोबर करारनामा केला की, भाडे १२०००/- रु व सर्विस टॅक्स ८०००/- रु. वेगळा येणार असेल १२,०००/- भाडेचे गृहीत धरून ॲसीसमेंट केलेले आहे. परंतू ऑडीट मध्ये असे झाले की, करयोग्य मुल्याची रक्कम आकारणी करुन मालमत्ता कर आकारणी होणे आवश्यक होते. या मालमत्तेचे कर १२०००/- ऐवजी २००००/- रु. होतो. करयोग्य मूल्यांच्या संदर्भातील वाद करमुल्य व संकलन अधिकारी म्हणून री. कड रुजू झाले. ते सर्व झोन विभागाचा आढावा होतील व अशा वादग्रस्त प्रकरणांची जी जी व्यक्ती असेल त्यांना झोनमध्ये चर्चेसाठी बोलविण्यात येईल. ही प्रकरणे निकाली लागल्यास थकबाकी वसूल होईल व पुढील वर्षात थकबाकी रक्कमा कमी होतील. ॲसीसमेंट वसूली एकत्रीत ठिकाणी करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. महापालिकेच्या अस्थापनेवर १६० लिपिक असून, ५२ लिपिक जकात विभागात आहे. उर्वरीत १०० लिपिक यांना प्रत्येकी एक हजार मालमत्तेचे कर डिमांड पावती देणे, वसूल करण्याची जबाबदारी देणार आहेत. पावती पुस्तके दिली जातील. कोणत्याही प्रकारची थकबाकी राहणार नाही. थकबाकी राहीली तर, संबंधित कर्मचाऱ्यांस जबाबदार धरण्यात येईल. पुढील वर्षासाठी असे नियोजन करणार आहोत. डिमांड व उद्दीष्ट आहे ते वसूल करण्याचे राहील.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** मालमत्ता करात वृक्ष कर घेतला जातो. वर्षात किती झाडे लावण्यात येतात. प्रत्येक झोन अंतर्गत किती वृक्ष आहेत. वृक्षतोड करतांना परवानगी घेतात का? घेतली नसेल तर, महापालिकेच्या वतीने आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे?

**उदयान अधिक्षक :** वृक्षकर जो घेतला जातो ट्रीसेस म्हणून स्वतंत्र खाते सुध्दा आहे व दरवर्षी ८-१० हजार झाडे लावण्यात येतात. त्यावर ७-८ लक्ष खर्च होतो. ५ वर्षापूर्वी झाडांची गणना झाली होती. महापालिका हद्दीत ४.२० लक्ष झ ाडे आहेत. झाडांचे वर्गीकरण आहे.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** मोकळया जागेवरील झाडे घरे बांधण्यासाठी बऱ्याच लोकांनी तोडलेली आहेत. त्यांचेविरुध्द प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. वृक्ष तोंडताना त्या मिळकत धारकाने परवानगी घेतलेली आहेत का?

**उदयान अधिक्षक :** वृक्ष तोडल्यानंतर माहीती मिळाल्यास कार्यवाही करण्यात येते.

**मा. आयुक्त** : याबाबत उदयान अधिक्षक यांना आयुक्त म्हणून सुचना की, या झाडांची गणना करण्यासाठी ट्री ॲथोरेडीचे मुख्य म्हणून माझ्या आदेशाची गरज असल्यास ते घेण्यात यावे.

**मा. सभापती** : सभागृहाच्या भावना लक्षात घेवून मालमत्ता कराचे २४.०० कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले असून, त्यांत ३ कोटीची आणखी वाढ करुन २७ कोटींचा इष्टांक देण्यात येतो. २७ कोटी प्रशासनाने वसुल करावेत.

**०३) पाणीपट्टी वसूली :**

**श्रीमती जयश्री किवळेकर :** प्रत्येक झोनला पाणीपट्टी वसूलीचे उद्दीष्ट दिलेले आहे. १०% सुध्दा वसूली होत नाही. अशा कर्मचाऱ्यांवर प्रशासन काय कार्यवाही करते व करणार आहे? झोन क्र. ७ मध्ये ७० ते ८०% पाणीपट्टीची वसुली ही

सर्वात जास्त आहे. पाणीपट्टी व मालमत्ता थकीत रक्कमेवर व्याज माफ करण्याचा निर्णय झालेला असतांना तात्काळ अंमलबजावणी झालेली नसल्याने टॅक्स भरणारे नागरीक वृत्तपत्रात तशा बातम्या वाचून संभ्रमात पडतात व जो टॅक्स पाणीपट्टी किंवा मालमत्ता करापोटी येणारा आहे तो सुध्दा येत नाही. व्याज माफ करण्याचा ठराव पास केला. झोनमध्ये अंमलबजावणी होत नाही. मी स्वत: १८०/- व्याजपोटी जास्तीचे भरणा केले अशी वागणूक तेथे वसूली कमी जनतेची एक प्रकारे पिळवणूक करण्यात येते असे म्हटले तरी योग्य होईल. अशा कर्मचारी/अधिकारी यांचेवर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. ज्याच्याकडे ६००-१२०० रु. थकबाकी असते. त्यांचे नळ कर केले जातात. ज्यांच्याकडे १०.१० वर्षापासून थकबाकी आहेत. त्यांचेकडुन वसूली केली जात नाही. याचा अर्थ जे नियमीत कर भरतात त्यानांच भुर्दंड पडतो. ही महानगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्था आहे. सर्वांनाच सारखा न्याय मिळावा असे अपेक्षीत असते. झोनवाईज आढावा दयावा. कोणत्या झोनला किती उद्दीष्ट दिलेले होते. वसूली किती झाली. किती बाकी आहे. ज्या झोनची वसुली सर्वात कमी झाली. त्या अधिकरी/कर्मचाऱ्यावर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. मी स्वत: माझ्या घराची नळपट्टी भरण्यासाठी गेले होते. फक्त २ दिवस उशीर झाला. १८०/- रु. भरावे लागेल ज्या झोनमध्ये २४ तास पाणी दिले जाते व वसुली नगण्य आहे. अशा झोन अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी. गंभीर स्वरुपाचा प्रश्न आहे. दखल घेण्यात यावी. हा सिडकोचा प्रश्न आहे. झोन क्र. ७ ची वसुली अत्यंत मोठया प्रमाणात आहे.

**उपआयुक्त** : मालमत्ता कर व पाणीपट्टी थकीत रक्कमेवर व्याज माफ करण्याचा सर्वसाधारण सभेने निर्णय घेतल्यानंतर लगेच ८ दिवसात वृत्तपत्रात तसे जाहीर प्रगटन करुन कळविण्यात आले होते. मा. आयुक्तांच्या मान्यतेने प्रत्येक झोनला पत्रही दिलेले होते व त्या त्या झोनमध्ये दर्शनी ठिकाणी नागरिकांच्या निर्दशनास यावे अशा ठिकाणी जाहीर प्रगटन लावण्यात आलेले होते. एवढे घेवूनही तक्रार आल्यानंतर मी स्वत: पाहणी केली. अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिलेल्या होत्या.

**श्रीमती किवळेकर जयश्री :** झोन क्र. ७ चे अधिकारी येथे असतील त्यांना विचारणा करावी की, किती दिवसापासुन व्याज आकारणी करण्याचे बंद केले. ठराव पास झाल्या नंतर ६ महिने झालेले होते. त्यानंतर पाणीपट्टी भरणा करण्यासाठी मी गेले असता १८०/- व्याज आकारणी करण्यात आले. मध्यंतरी जो घोटाळा झाला त्याचे कारण हेच आहे की, झोन अधिकारी जागेवर नसतात. कर्मचारी त्यांचे पध्दतीने वेळ मिळेल तेव्हा कामे करतात. कर्मचाऱ्यांचा अभाव दिसुन येतो. या झोनमध्ये वसुली मोठया प्रमाणात होत असतांना कायमस्वरुपी झोन अधिकारी का दिले जात नाही. व्याज रक्कम घेतल्याशिवाय कर्मचारी पाणीपट्टी भरणा करुन घेत नाही. ही आजची परिस्थिती आहे.

**उपआयुक्त (म)** : ज्यांच्याकडुन व्याज घेण्यात आलेले असेल तर, ते पुढील बीलात समावेश करुन वळती केले जातील. या झोनमध्ये श्री. वसंत निकम (उप अभियंता) यांना झोन अधिकारी म्हणून कार्यभार दिलेला आहे.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** झोन क्र. ७ मध्ये जो ७ लक्ष रुपयांचा घोटाळा झालेला आहे. त्यास वरीष्ठ अधिकाऱ्यांचे काहीच नियोजन नसल्याने हा प्रकार झालेला आहे. असा माझा स्पष्ट आरोप आहे. नोंद करावी. प्रशासनाचे नियोजन कमी पडलेले आहे. मा. आयुक्त यांना सुध्दा विनंती की, त्यांचा प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव आहे. त्यांनी झोन क्र. ७ कडे दुर्लक्ष करु नये. कायम स्वरुपी झोन अधिकारी देण्यात यावे व्याज माफ करावे वसुलीत वाढ होईल.

**उपआयुक्त (म)** : झोन अधिकारी पदावर नियुक्त केलेले ४ अधिकारी कायमस्वरुपी आहेत. ४ झोनमध्ये अतिरिक्त कार्यभार आहेत. ४ पदे रिक्त आहे. प्रशासनाकडे झोन अधिकारी कॅडर मधील अधिकारी उपलब्ध नसल्यामूळे उपलब्ध असलेल्या अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त पदभार देवून कायम करुन होत आहोत. झोन क्र. ७ मध्ये रक्कमेचा घोळ झाल्यामूळे श्री. वसंत निकम यांचेकडे तात्पुरता पदभार दिलेला आहे. तसेच झोन आयुक्त श्री. जावरे यांना सुचना देवून यापुढे त्या झोनला नियमीत भेटी देवून कोणत्याही प्रकारचा अपहार होणार नाही. नोंदी रजिष्टरमध्ये खाडाखेड होवू नये. नियमात वसूली करण्याबाबत सूचना केलेल्या आहेत. व्याज माफ करण्यात आले असून, घेतले असेल तर, माझ्या स्तरावर कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : कर्मचारी देण्याबाबत उपआयुक्त (प्र) यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र)** : विभाग क्र. ७ मध्ये श्री. शहाणे हे काम पाहत होते. मध्यंतरी या झोनमध्ये रक्कमेचा अपहार झाला म्हणून दोन कर्मचारी निलंबीत करण्यात आले. श्री. शहाणे यांची बदली करुन इतरत्र ठिकाणी आले.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** कित्येक दिवसापासून झोन क्र. ७ मध्ये कायमस्वरुपी झोन अधिकारी नाही. प्रशासनाने अदयापपर्यंत का नियोजन केले नाही. निलंबीत केले हे सर्वांना माहित आहे. सांगण्याची आवश्यकता नाही.

**उपआयुक्त (प्र)** : या विभागात फक्त पाणीपट्टी वसूलीचे काम आहे. स्वच्छतेचा काही भाग येतो. मालमत्ता कराची वसूली नाही. म्हणून त्याच विभागात उपअभियंता श्री. वसंत निकम यांना तात्पुरता पदभार दिलेला आहे. रक्कमेचा अपहार प्रकरण घडल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या बदल्याही केलेल्या आहेत. त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांच्या जागेवर ६ व. लिपीक ४ क. लिपीक व विशेष वसुलीसाठी ४ कर्मचारी असे एकुण १४ कर्मचारी दिलेले आहेत. ठराव पास झाल्यानुसार व्याज माफ झालेले आहे. आकारणी करु नये श्री. शहाणे त्यावेळी होते त्यांना आदेश दिलेले होते. त्यांनी अंमलबजावणी का केली नाही किंवा उशीर का केली याची सविस्तर माहिती घेवून व्याज आकारणी झालेले असेल तर, पुढील पाणीपट्टी बिलात समायोजन करता येईल १ एप्रिल नंतर कायमस्वरुपी झोन अधिकारी या विभागामध्ये दिले जातील.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** खुलाशा वरुन असे दिसून येते की, झोन क्र. ७ मध्ये फक्त पाणीपट्टी वसुली असल्यामुळे कायम स्वरुपी झोन अधिकारी देण्याची गरज नाही. असे प्रशासनास वाटत असेल तर, झोन ठेवण्याची गरज नाही. इतर झोनमध्ये समावेश करावा.

**मा. सभापती** : झोन अधिकारी पदाचा पदभार श्री. निकम यांना देणे योग्य नाही. उन्हाळयाचे दिवस आहे. पाण्याचे प्रश्न निर्माण झाल्यास दोन्हीही पदभार पाहणे शक्य होणार नाही. श्री. वसंत निकम यांना त्यांचे पदाचेच काम

करु दयावे. २ दिवसात नवीन झोन अधिकारी झोन क्र. ७ मध्ये देण्यात यावे.

**मा. आयुक्त** : जे कर्मचारी उपआयुक्त (प्र) यांना दिलेले आहेत. ते त्या झोन क्र. ७ मी प्रत्यक्ष भेट देणार आहे. मध्यंतरी सतत बैठका झाल्यामूळे जाणे झाले नाही. प्रशासनाचे दुर्लक्ष झाले तसे मुळीच नाही. या झोनचे उपअभियंता श्री. वसंत निकम यांना पदभार दिला तेथे पाणीपट्टीची फक्त वसुली आहे. ही वस्तुस्थिती असून, त्या झोनची ६५% वसुली आहे. ही इतर सर्व झोनपेक्षा जास्त आहे. यात शंका नाही. जे कर्मचारी रुजू झाले नाही. त्यांना सूचना काढण्याबाबत उपआयुक्त यांना सुचना दिलेल्या होत्या. त्या झोनची वसुली तर करणार आहोत. परंतू संपुर्ण रजिष्टरची झेरॉक्स प्रत पोलीस विभागास द्यावयाचे आहे तो मोठा प्रश्न आहे. त्या विभागातील बऱ्याच कर्मचाऱ्यांची चौकशी सुरु असल्यामुळे पोलिसांना कागदपत्रांची आवश्यकता आहे. काही खातेदारांनी पाणीपट्टी भरुनही त्यांचे खातेवर पाणीपट्टीची रक्कम जमा म्हणून नोंदी नाहीत. याची संपुर्ण चौकशी चालू आहे. डिमांड रजिष्टरच पुढील वर्षी सुध्दा वापर करावा लागतो. म्हणुन त्या रजिष्टरची गरज पडणार आहे. झोन क्र. ७ ला नियमीत झोन अधिकारी दिले जातील. जे कर्मचारी दिले ते रुजू झाले नसतील तर त्यांचे बाबतीत उपआयुक्त (प्र) यांनी ताबडतोब ॲक्शन घ्यावी.

**श्रीमती जयश्री किवळेकर** : ज्या झोनची वसुली झालेली नाही. त्यासंबंधी प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

**मा. आयुक्त** : कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या असून, येत्या सोमवर पर्यंत त्यांचा अहवाल उपआयुक्त (प्र.) माझे समोर ठेवतील. त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल.

**श्रीमती पार्वती मानकापे** : काही भागात वसुली कमी तर, पाणीपुरवठा जास्त केला जातो. जवाहर कॉलनी, ज्योतीनगर शिवशंकर कॉलनी विश्वभारती कॉलनी भागात पाणी कमी प्रमाणात येते. ज्या भागात १ दिवस आड पाणी येते. तेथे वसुलीचे प्रमाण जास्त आहे.

**श्री. घोडेले नंदकुमार** : अभय योजना राबविण्यात यावी. ३१ मार्च पर्यंत सर्वसाधारण सभेने मुदत वाढ दिलेली आहे त्याची सुध्दा अंमलबजावणी व्हावी. अभय योजना राबविण्याबबत अर्थसंकल्पात नोंद व्हावी.

**कार्य. अभियंता (पा. पु.)** : सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार अभय योजना राबविण्याबाबतचा आराखडा तयार केलेला आहे. २-३ दिवसांत मा. आयुक्तांसमोर ठेवून मान्यता मिळाल्यानंतर कार्यवाही करता येईल.

**मा. आयुक्त** : संचिकेवर आपण व्यवस्थित लिखाण केलेले आहे. सविस्तर माहिती अधिकाऱ्यांनी द्यावी.

**कार्य. अभियंता (पा. पु.)** : यापुर्वी महापालिकेतर्फे अभय योजने अंतर्गत व धडककृती योजनेअंतर्गत अनाधिकृत नळ कनेक्शन नियमीत करण्यासाठी योजना राबविण्यात आलेली आहेत. मागील अभय योजनेमध्ये ३५ लक्ष रुपये वसुल झालेले होते. १६५० नळ कनेक्शन रेग्युलर करण्यात आलेले आहे. अभय योजनेचा उद्देश असा की, लोकांनी स्वत:हुन आले पाहिजे. नळ रेग्युलर करुन घेतला पाहिजे. वस्तुस्थिती व जो अनुभव झालेला आहे. यास नागरिक प्रतिसाद देत नाही. त्यामुळे आपल्या कर्मचाऱ्यांना अनाधिकृत नळ

कनेक्शनचा शोध घ्यावा लागतो. वेळ जातो. यासाठी एक पथक ही स्थापन केले होते. जवळपास १६५०० घरांना भेटी दिल्या. त्यानंतर काही पुढील काळात कर्मचाऱ्यांना पुन्हा वेगवेगळी कामे देण्यात आली त्यामुळे जे पथक स्थापन केले त्याची अंमलबजावणी होवू शकली नाही. आता पुन्हा सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार कृती आराखडा तयार केला आहे. या महिन्याच्या अखेरीस अंमलबजावणी करण्यात येईल. काही लोक अनाधिकृत नळ कट केल्यानंतर कागदपत्रांची आपण मागणी करतो. परंतु ते नागरिक प्रतिसाद न देता पुन्हा विनापरवानगी नळ जोडणी करुन घेतात. अशा नागरिकांनी अनाधिकृत नळ जोडणी आढळून आल्यास प्रत्यक्ष जागेवरच त्यांची नोंद अभिलेखावर घेवून तेथेच बील घेण्यात यावे. त्यामुळे ते रेकॉर्डवर येईल.

**मा. सभापती** : पाणीपट्टी वसुली प्रशासनाने २८ कोटी ठेवलेली आहे.

**मा. आयुक्त** : विनंती की, ३०-३२ कोटी भांडवली खर्च होतो. भारतामध्ये बोटावर मोजण्या इतपत अशा फक्त ना नफा ना तोटा या तत्वावर महापालिकेची पाणीपुरवठा योजना चालते. पाणी ही मूलभूत गरज आहे. जेवढा खर्च तेवढी वसुली करण्याचा प्रशासन प्रयत्न करते. यात वाढ सुचविण्यात येवू नये. सुचविले आवश्यक वाटते तर नाममात्र सुचविली.

**मा. सभापती** : प्रशासन पाणीपट्टीची वसुली २८ कोटीची दिलेली आहे. यात २ कोटीची वाढ करुन ३० कोटी वसूल करण्यात यावे. झोन निहाय कर्मचारी वैगेरे देण्यात यावा. अभय योजना सुरु करावी. अ. क्र. ४ यास मान्यता येते. आताच सुचना केल्याप्रमाणे प्रशासनाने मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली मोहिम प्रभावीरित्या राबवावी.

**०४) नागरी धन कचरा व्यवस्थापन व हाताळणी दरवाढ प्रस्ताव :**

**मुख्यलेखाधिकारी** : वसुलीमध्ये एक मुद्दा क्र. ५ हा कर्ज प्रस्ताव केलेला उत्पन्न बाजूमध्ये गृहीत धरणे आवश्यक होईल. नागरी घन कचरा योजनेसाठी काही वाहने खरेदी करणे गरजेचे आहे. काही कन्टेनर, जेसीबी मशीन खरेदी करावे लागेल यासाठी कर्ज उभारणी करुन ही वाहने घेणे आहे. यासाठी ४.५० कोटी रुपये खर्च येणार असून, त्यास मान्यता व्हावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी थोडक्यात माहिती द्यावी.

**वैदयकिय अधिकारी :** नागरी घन कचरा कृती योजना प्रभावीपणे राबविता यावी. म्हणून सिस्टीम बदलावी लागेल. वाहने खरेदी करणे. करणे आवश्यक आहे. घराघरातून कचरा एकत्रित घेण्यासाठी घंटागाडया खरेदी करणे आवश्यक असून, या व्यतिरिक्त कन्हेनर्स खरेदी करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. यात कचरा साठविण्याचे प्रकार आहेत. त्याबद्दल अतिरिक्त शहर अभियंता माहिती देतील. २५०-३० घरांना एक घंटागाडी याप्रमाणे ५०० घंटागाडया खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच मनुष्यबळ देवून कचरा उचलला जात होता. आता मेकॅनिकली कचरा उचलण्याची व्यवस्था करणार आहोत. तसेच कॉम्प्युटर ज्यात १५-१७ टन कचरा साठवून वाहुन नेला जातो. ती वाहने खरेदी करणे गरजेचे आहे.

**अति. शहर अभियंता :** शहरातील नागरी घन कचरा उचलण्याबाबत मा. उच्च न्यायालयाचा आदेशानुसार कार्यवाही चालू आहे. जी वाहने वाहुन नेण्यासाठी आहेत.

त्यांचे स्ट्रक्चर बदलावे लागणार आहे. कन्टेनर्स खरेदी करावयाचा प्रस्ताव आहे. १० ते १५ ला कचरा उचलण्याची क्षमता यात असते. प्रत्येक झोन कचरा उचलुन घेवून जाऊ शकते. काही जेसीबी खरेदी करावे लागतील. या सर्व वाहनांची आवश्यकता आहे. प्रत्येक झोनला कचरा साठविण्यासाठी कन्टेनर्स ठेवणे आवश्यक आहे व कुंडया हलवावे लागतील. यासाठी रु. ४.५० कोटी खर्च येईल.

**श्री. संजय शिरसाठ :** जकातमध्ये १ कोटीची वाढ केली. पाणीपट्टी २ कोटी मालमत्ता करात ३ कोटीने वाढ केली. प्रशासनाने जो अर्थसंकलप तयार केला त्या मागील वर्षाचा व चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकलपात फारसा फरक जाणवत नाही. मी सुध्दा अभ्यास केला तर मला सुध्दा असा अर्थसंकल्प तयार करता येईल. अशी खात्री झालेली आहे. शहरासाठी काय योजना राबविणार आहात. हे ठळक वैशिष्टे म्हणून काहीच झालेले नाही. १४९ कोटीचा अर्थसंकल्प मंजूर केला तेव्हा अवास्तव आहे. असे मत प्रशासन व्यक्त करते. त्यामुळे ११८ कोटीचा सुधारीत अर्थसंकलपात मंजूरी दिली यात ३१ कोटीची तूट निर्माण झालेली आहे. ही तूट कशा पध्दतीने भरुन काढणार आहोत याचे उत्तर प्रशासनाकडे नाही. स्पील ओव्हरची ६.५० कोटीची कामे आहेत असे म्हटले गेले. त्याचा समावेश केला तर ३७ कोटीचे कामासाठी निधी उपलब्ध होईल का हा प्रश्न येतो. चालू वर्षाचा अर्थसंकल्प १६० कोटीचा ठेवला. मागील वर्षाची पाणीपट्टी व मालमत्ता कर वसूल करण्यात जी तूट निर्माण झाली यास जबाबदार कोण? मागील वर्षात सुध्दा २७ कोटीचे पाणीपट्टीचे उद्दीष्ट १ कोटीने वाढ करुन २८ कोटी करण्यात आले तसेच मालमत्ता कराचे उद्दीष्ट सुध्दा २३ कोटीवरुन २४ कोटी करण्यात आले. पाणीपट्टी व मालमत्ता कर मिळून जवळपास ८२ कोटीच थकबाकी आहे. ५२ कोटी उद्दीष्ट देण्यात आले होते. वसूल होत आहे. फक्त २३ कोटी झोन मध्ये सक्षमत अधिकारी असणे आवश्यक असून, प्रशासन लागणारे अधिकारी कर्मचारी देऊ शकणार नाही अशी मनपाची परिस्थिती आहे. आहे तीच परिस्थिती राहील. नवीन अधिकारी आले असले तरी, कोणतीही कर्मचारी वर्ग देऊन वसूल होणार नाही. शंका आहे. यामुळे अर्थसंकल्पावर परिणाम होतो. ३१ कोटीची तुट झाली तरी ती कशी भरुन काढणार, हे स्पील ओव्हर म्हणून समजावे लागेल. ६.५ कोटी मिळुन ३७ कोटी होईल. पुढील वर्षात कामे करावी लागणार आहेत. एक सुध्दा नवीन काम होणार नाही. जीवन अधिकारी आले ते ३००% वाढ करुन शकतील. पुन्हा टारगेट वाढवून दिले तर वसूली होणार नाही असे प्रशासन सुधारीत बजेटमध्ये नमूद करणार. यापासून जनतेला काहीही फायदा नाही. पुढील वर्षी निवडणूका आहेत. स्थायी समितीचा सदस्य असल्यामुळे अनेक नागरिकांनी मला विकास कामे होण्याबाबत पत्र दिले. वाढ करुन दिली जाते. परंतु वसूली होणार नसेल तर, वाढ करुन अर्थ नाही. प्रत्येक नगरसेवकांना माझ्या वार्डात विकास काम व्हावे. अशी अपेक्षा असते. वसुली कशा प्रकारे करणार आहोत. याबाबत प्रशासनाने दखल घेतली पाहीजे व तसा खुलासा येथे करावा. यावरुन असे दिसून येते की, जे पुर्वी चालत झाले ती परिस्थिती तशीच राहणार आहे. कोणताही बदल होणार नाही. निव्वळ धुळफेक करणारा अर्थसंकल्प सादर

केलेला आहे. कार्यवाही नंतर होईल परंतू वसूली करण्याच्यादृष्टीने यावेळेस तरी प्रशासनाने नियोजन करावे.

**मुख्यलेखाधिकारी** : मनपाचा मुख्यलेखाधिकारी म्हणून आर्थिकदृष्ट्या काही मुद्दे मला सभागृहाच्या निर्दशनास आणून द्यावयाचे आहेत. अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र. ७९ वर रु. २९२.७६ कोटी मनपाला देणे आहे. मनपास ज्या प्रमाणात फंडस (निधी) उपलब्ध होणे आवश्यक होते ते झालेले नाही. १० लक्ष लोकसंख्या असून, मालमत्तेचे उद्दीष्ट १४ कोटीच्या वर डिमांड नाही. रिसोर्स मोबीलायजेशन म्हणून प्रशासनातर्फेच प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. रिसोर्स मोबालायझेशन होणे गरजेचे आहे म्हणून मालमत्तेचे सर्वेक्षण करण्याचे काम हाती घेतलेले असून, याद्वारे मनपास १५-२० कोटी उत्पन्न प्राप्त होऊ शकेल. पाणीपुरवठयावरील खर्चाचा विचार केल्यास २.५० कोटी रुपये दरमहा एम. एस. ई. बी. ला दयावे लागतात. एकमेव मनपा आहे की, ग्रॅव्हेटीने पाणी पुरवठा होत नाही. तीन ठिकाणी पंपींग करुन पाणी आणावे लागते. या संपूर्ण पाणी पुरवठयाच्या योजनेवर ३४-३४ कोटी वर्षाचा खर्च झालेला आहे. ३५ कोटीचा खर्च व पाणीपट्टीचे उत्पन्न फक्त १८ कोटी मिळते. ऑन सुट कन्झुमर म्हणून जे उत्पन्न प्राप्त होते. साधारणतः ३ कोटी असे एकुण २१ कोटी रुपये एकुण अपेक्षीत खर्च रु. ३५ कोटी असून, त्याचा अर्थ असा होतो की, नागरिकांनी १४ कोटींची सबसिडी दिली जाते. ही रक्कम महसूली उत्पन्नातून वळती होते. हीच परिस्थिती राहीली तर केवळ फक्त देखभाल दुरुस्तीची कामे मनपास करावी लागणार आहेत. भांडवली स्वरुपाची किंवा इतर ठळक वैशिष्टे घेता येतील अशी कोणतीही कामे करण्यास निधी उपलब्ध राहणार नाही. पाणीपट्टी मालमत्ता व जकात विभागाचे उत्पन्न वगळता इतर जी वसूली आहे. ती नगण्य आहे. प्रशासन उत्पन्नात वाढ होईल यादृष्टीने प्रस्ताव ठेवतात. परंतू सभागृह वेगळया भावना व्यक्त करते. असे. प्रस्ताव फेटाळले जातात. ३५ कोटी खर्च पाणी पुरवठयावर होतो. प्रत्येक नळाचा खर्च काढल्यास जवळपास ३७००/- रुपये नळ कनेक्शन पाणीपट्टी आकारणे आवश्यक होते. प्रत्यक्षात आपण रु. १८००/- वसूल करतो. महाराष्ट्रात एवढी पाणीपट्टी कुठेही नाही. म्हणून यावेळेस पाणीपट्टी वाढ केलेली नाही. ग्रॅव्हेटीने पाणीपुरवठा या शहरासाठी होत नाही. कृषी दराने पाणीपुरवठयाचा खर्च केल्यास महसूल उत्पन्नातील जो हिस्सा पाणी पुरवठयावर होतो तो करावा लागणार नाही. याबाबत शासनाने कोणताही प्रतिसाद दिला नाही. पुणे शहराची लोकसंख्या ३० लक्ष असून पाणीपुरवठयाचा खर्च व वीज बीलाचा खर्च हा २ कोटी बील भरणा करीत असेल व औरंगाबाद मनपा फक्त १० लक्ष लोकसंख्येला पाणी पुरवठा बीलापोटी २ कोटी दरमहा वीज बील भरणा होतो. मोठी तफावत आहे. त्यामुळेच या मनपाकडे विकास कामासाठी रक्कम शिल्लक राहात नाही. १३-१४ कोटी कर्ज हप्ते दयावे लागते. वैधानिक खर्चाचा परतावा करावा लागाते. परतावा वाढल्यामुळे विकासासाठी पैसा राहिलेला नाही. म्हणून प्रथमतः देखभाल दुरुस्तीची कामे करणे गरजेचे वाटते. त्यानंतर जो उर्वरीत रक्कम असते. त्यातून नवीन विकासाची कामे प्रस्तावति करता येतात. कोणतीही संस्था कर्ज देतांना त्या संस्थेची परिस्थिती काय आहे हे

बघूनच कर्ज देत असते. कर्जरोख काढण्यासाठी शासनाकडे विनंती केलेली होती. २५० ते ३०० कोटीचा कर्जाचा बोजा मनपावर असल्याने कोणतीही संस्था कर्ज देवू शकणार नाही. कोणतीही वित्त संस्था मनपास महत्व देत नाही. कोणतीही संस्था ग्रेउला महत्व देणार म्हणून या मनपाचे एकूण तीन मार्ग खुंटलेले आहेत. जो पर्यंत मनपाचे उत्पन्न वाढणार नाही. तोपर्यंत विकासाची नवीन कोणतीही कामे अंदाजपत्रकात दिसून येणार नाही. देखभाल दुरुस्ती, आरोग्य सेवा व इतर ज्या सेवा आवश्यक आहेत जसे पाणी पुरवठा योजना या सेवा देणे आवश्यक असून, १६० कोटीचे बजेट ठेवले तरी यात ९५ कोटीचा वैधानिक खर्च होणार आहे. ३४ कोटी विकास कामासाठी आहे. भूसंपादन करणे. डी. पी. प्लॅन राबविणे गरजेचे असून, नियमानुसार एकुण बजेटच्या १०% तरतुद करावी लागते. विकास कामास रक्कमा कमी पडतात म्हणून १०% प्रमाणे तरतुद करु शकत नाही. संगणकीकरण करण्यासाठी १.५० कोटीची तरतूद आहे व इतर विभगावर जो वर्षाकाठी र्ख होणार तो २०.२२ कोटी होतो. हा संपूर्ण खर्च केल्यानंतरच उर्वरीत रक्कमा देखभाल दुरुस्तीवर खर्च करता येतात. फंड्स उपलब्ध होत नसेल तर, ठळक वैशिष्टामध्ये कोणतेही नवीन काम घेता येणार नाही. निधी उपलब्ध नाही. २९७ कोटी रुपये देणे बाकी आहे. दोन नवीन प्रयोग त्यात एक डिफर पेंमेट व कर्ज रोखे डिफर पेंमेट पध्दतीत ठेकेदारास दरवर्षी काही रक्कम अदा करावी लागेल. काही प्रमाणात व्याज सुध्दा दयावे लागते. म्हणून जे बजेट सादर केले ते निव्वळच बोगस बजेट आहे. असा भाग नाही. आकडेवारी समोर आहे. आपण विश्वस्त आहात सर्व परिस्थिती नमूद केलेली आहे. उत्पन्न येत नाही म्हणून नवीन कामे करण्यास पैसा उपलब्ध नाही. ठळक वैशिष्ट्यामध्ये कामे घेता आली नाही. चार कार्यकारी अभियंत्यांना जी महत्वाची वाटली अशीच कामे यात नमूद केलेली आहेत.

**श्री. संजय शिरसाठ :** खुलासा केला. धन्यवाद सर्व नगरसेवकांना वसूलीसाठी पाठवावे का? पाणीपट्टी १२०० चे १८०० केले. ९ कोटीचे १० कोटी वसूल केले. फक्त १ कोटी जास्त वसूल होत आहे. दीडपट वसूल होणे आवश्यक होते. ४२ कोटी पाणीपट्टीची थकबाकी आहे. ती वसूल करता येत नसेल तर, योग्य नाही. मालमत्ता कराची वसूली ४० कोटी होती. वाढ तर झालीच नाहीच परंतू वसूली झाली नाही. म्हणून कोणताही खेद प्रशासनास नाही. मालमत्तेचे सर्वेक्षण करण्याची कार्यवाही चार महिने उशीर केला. सभागृहात ओरड केली म्हणून टेंडर काढले. आणखी ८-१० महिन्यांचा कालावधी संपूर्ण सर्वेक्षणासाठी लागेल. २० कोटी वसूल झाले नाही. दिलेले उद्दीष्ट पुर्ण होत नाही. प्रशासनाने दिलेले मागील वर्षाचे टारगेट प्रमाणे वसूली का झाली नाही याचा खुलासा करण्यात यावा. ३४ कोटी विकास कामासाठी आहे यात मागील वर्षाचे काही कामे आहेत. नवीन काम एकही घेता येणार नाही. व होणार सुध्दा नाही. यास प्रशासन कारणीभूत आहे. जशी वसूली येईल तसे काम होईल. पाणीपट्टीचे डिमांड काय दिलेले होते. ते का वसूल झाले नाही. याचे उत्तर प्रशासनाकडे नाही. झोन अधिकारी नाही हे कारण दाखविणे योग्य नाही केवळ झोन अधिकारी न बदलल्यामुळे वसूली कमी आलेली असेल तर नागरिकांच्या

विकास कामाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. मनपाचे हित जपण्याची जबाबदारी या सभागृहाची आहे. नागरिकांची कामे होणे आवश्यक आहे. ही सुध्दा जबाबदारी या सभागृहाची आहे परंतू वसूली करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे हे विसरुन चालणार नाही अमूक नगरसेवक वसूलीत अडथळा निर्माण करतो असा काही प्रकार असेल तर नांव स्पष्ट करावे. दिशाभूल करणारा अर्थसंकलप सादर केलेला आहे असे माझे स्पष्ट मत आहे.

**मुख्यलेखाधिकारी** : मालमत्ता कर व पाणीपट्टी ८० कोटी असून, ८० कोटी वसूल केले व ८० कोटी कर्जाची फेड केली तरी २१२ कोटी राहतात. भविष्यात परिस्थिती बदलणार नाही.

**श्री. संजय शिरसाठ** : चुकीचे स्टेटमेंट करु नये. ८० कोटी वसूल केले तर, ८० कोटी कर्जाचा बोजा कमी होऊ शकेल याचा खेद प्रशासनास वाटत नाही का?

**मा. आयुक्त** : चर्चा अत्यंत चांगल्या प्रकारे चालू आहे. जेव्हा अंदाजपत्रकाच्या आर्थिक बाबीकडे जेव्हा आपण जातो तेव्हा अशा प्रकारची चर्चा अपेक्षीत असते. चर्चेचा दर्जा उंचावलेला आहे. स. सदस्यांचे मी आभार मानतो. ज्याचे आपण नांव घेतो त्या मनपाच्या विकास खर्चाची टक्केवारी किती आहे. १०० कोटीचे अंदाजपत्रक असेल तर, सर्वात उत्तम अशी ४० ते ४२ कोटी वसूली होवू शकते. ११८ कोटीचे उद्दीष्ट गृहीत धरण्यात आलेले आहे. १२० कोटीच्या ४०% रक्कम काढल्यास ४८ कोटीच राहतात. आताच मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा केला की, एक्सप्रेस लाईन साठी लागणारे १ कोटीचा समावेश करावा. ३४.३५ कोटी रुपये विकास कामासाठी मिळणार आहेत. या मनपास आर्थिक बाजारात चांगले म्हटले जाईल अशी स्थिती येईल. अशी खात्री आहे असे झाल्यास १२-१५ की रुपये कोणत्या मार्गाने उपलब्ध करु शकतो हे पाहणे गरजेचे आहे. जेव्हा ठळक वैशिष्ट घेवून मोठी व नवीन अशा स्वरुपाची कामे घेणे, त्यासाठी भांडवली खर्चही आवश्यक आहे. याबद्दल दुमत नसावे. आय. डी. यु. पी. बद्दल चर्चा झाली. १६७ कोटीच्या विषयावर सभागृहात चर्चा होत होती. त्यात मनपाचा ६-७ कोटीचा हिस्सा होता. ते १६७ कोटी रुपये देणारे कोण होते. त्याची संपूर्णतः जबाबदारी मनपावर येत नाही. जेव्हा एखादया प्रकल्पास सुरुवात करतो. सुशोभीकरण करतो. त्यास १० कोटी रुपये लागतील. एखादी मोठी इमारत करतो त्यास १५-२० कोटी रुपये लागतील हा भांडवली खर्च कर्ज घेण्यासाठी आर्थिक पत असणे आवश्यक आहे. प्रशासनाचा एवढाच माफक मुद्दा आहे की, पत वाढविण्यासाठी कर्ज बाजारीपणा कमी करावा लागतो. मागील वर्षापेक्षा या वर्षीच्या बजेटमध्ये परतावा रक्कम म्हणून जास्त तरतूद केलेली आहे. हे आमचे पाऊल लहान आहे. परंतु इच्छा अशी की, या मनपाची पत वाढविण्याचा प्रयत्न व्हावा. आम्ही प्रयत्नच केले नाही असे म्हणणे चुकीचे होईल. या राज्याच्या मा. मुख्यमंत्र्याना संबंधित मंत्र्यांना व मा. सचिवांना वेळोवळी सांगण्यात येते की, एकतर कृषी दराने वीज बील आकारावे. डी. पी. सी. हे काही कोटीच्या घरात असून, हे दोन्ही माफ झाल्यास या मनपाची पत मोठया प्रमाणात उंचावेल. ७०-८० कोटीचा बोजा कमी होईल. असे प्रयत्न यानंतरच्या काळातही होणार आहेत. १०-१५ कोटीचा गॅप राहतो. १६०

कोटीचा अर्थसंकलप असून, त्याचे ४०-४२% खर्च गृहीत धरला तर एक आय. डी. एल. मनपा म्हणून विकास कामासाठी ६०-६५ कोटी उपलब्ध असणे आवश्यक होते. ३४-३५ कोटीच आहेत. वसूली जास्तीत जास्त करुन किंवा इतर सोर्सेस नुसार त्यात अनुदान असेल. विशेष अनुदान असेल ते मिळाल्याशिवाय भांडवली स्वरुपाची कामे करता येणार नाही ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. वसूलीत वाढ झाली पाहीजे. ही वास्तव अपेक्षा असून, अधिकारी, कर्मचारी यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. मोठया स्वरुपाची कामे करण्यासाठी वित्तीय दजा वाढविणे कर्ज बाजारातील पत वाढविणे त्यानुसार १५-२० कोटी तरी मिळावयास पाहीजे. काही मनपास मोठया स्वरुपाचे अनुदान मिळालेले आहे. यामनपास मिळालेले नाही. मिळाले असते तर, एवढा कर्जाचा बोजा वाढलेला नसता, ४०-४२ कोटीची कामे करण्यासाठी अधिकाऱ्यांना सुचना देण्यात येते की, जे जे नियोजन करता येईल ते ते करण्यात यावे. ज्याची त्याची जबाबदारी टाळता कामा नये. यादृष्टीने नियोजन करावे.

**श्री. चंद्रशेखर जैस्वाल :** काही सदस्याचे वॉर्डातील विकास कामे या अर्थसंकल्पात आलेली नाही. चार पाच सदस्याची एक कमीटी नियुक्त करुन आवश्यक कामांचा समावेश करावा.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** जी कामे नमुद केली त्यावर चर्चा करुन निर्णय घेणे आवश्यक आहे. कामाबाबतचे नियम सभापतींच्या निर्णयाच्या अधिन राहुन पाच सदस्यांची कमीटी नियुक्त करुन विकास कामापेक्षा जनतेला दैनंदिन सुख सुविधा देण्यासंबंधीचा कामाचा समावेश करावा. त्यात रस्ते ड्रेनेज विदयूत अशाच कामांचा समावेश करावा. इमारत बांधकाम खर्च कमी करावा. सर्व सदस्यांनी दिलेल्या कामाचा समावेश करावा.

**श्रीमती पार्वती मानकापे :** स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना विश्वासात घेवून कामाचा समावेश करावा. माझ्या वार्डातील मागील वर्षाचे कामाचा समावेश आहे. नवीन एकही काम नाही.

**श्री. नंदकुमार घाडेले :** नावनिशी मागील वर्षी कामाचा समावेश होता त्यास मान्यताही देण्यात आली. हा अर्थसंकल्प जसा त्या तसा ठेवून सर्वसाधारण सभेत काय जो बदल करायचा तो करता येईल. कामाचा समावेश करण्यासंदर्भात यादी दिली समावेश होत नसेल तर, अर्थ नाही. सिडको करता ६७ कोटीची पाणीपुरवठा योजना होती. गेल्यावर्षी ५ कोटीची तरतूद केलेली होती. त्यामुळे सिडको हडको भागात पाणी पुरवठा सुरळीत झालेला आहे. ६७ कोटीची योजना पूर्ण करण्यासाठी मनपाने कर्ज न घेता मनपाच्या येणाऱ्या उत्पन्नातून ही योजना करावी टप्याटप्याने हे काम पूर्ण करावे तसा ठराव सर्वसाधारण सभेत झालेला असून, किमान या वर्षात ६ कोटीची तरतूद करण्यात यावी. किमान ७-८ वर्षातही योजना पूर्ण होऊ शकेल टी डी आर लागु केलेला असल्यामूळे भूसंपादनसाठी ७ कोटीची ततूद कमी करुन ५ कोटीच ठेवावेत.

**सहा. संचालक न. र. :** औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना अंमलबजावणी अहवाल मा. उच्च न्यायालयास सादर केलेला आहे. त्यानुसार आर्थिक वर्ष २००४-०५ मध्ये ८.८७ कोटीच तरतुद दर्शविण्यात आलेली आहे.

**श्री. नंदकुमार घोडेले :** न्यायालयाचा आदर करतो. टीडीआर मुळे फरक पडत असेल तर २ कोटी कमी करावे. उत्पन्न या विभागाचे कमी आहे. प्रचंड ले-आऊट प्रलंबीत आहेत. परवानगी देत नाही. उत्पन्न येत नाही. भूसंपादनासाठी जास्त रक्कम ठेवतात. विकास कामावर परिणाम होतो पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

**सहा. संचालक नगररचना :** टी डी आर बाबत शासनाने नुकतीच अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. त्यावर पूर्ण प्रक्रिया होवून टी डी. आरची ऑर्डर काढण्यासाठी वेळ लागेल म्हणून टीडीआर सन २००४-०५ साठी गृहीत धरणे योग्य होणार नाही असे माझे मत आहे.

**मा. सभापती** : या वर्षात १.४४ कोटी खर्च भूसंपादनाचा झालेला असून, ७ कोटीच्या भूसंपादनाच्या संचिका मुख्यलेखाधिकारी यांचेकडे प्रलंबीत आहेत.

**श्री. नंदकुमार घोडेले :** आताच काही दिवसांपूर्वी भावसिंगपूरा भागातील जागा भूसंपादन केली. १.२२ कोटी रुपये मंजूर केले. त्यावर मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय घेतला का?

**मा. आयुक्त** : सन्माननीय सदस्यांची सूचना मी नोंद घेतलेली आहे. योग्य ती काळजी घेतली जाईल.

**श्री. नंदकुमार घोडेले :** पाणी पुरवठयासंबंधी कार्यकारी अभियंता यांचेकडे टिप्पणी तयार आहे. त्यासाठी किमान ५ कोटी रुपये तरी मंजूर करावेत.

**कार्य. अभि. (पापु)** : पाणीपुरवठा योजनेसाठी मेजर तरतुद करण्यात आलेली आहे. सविस्तर टिप्पणी मी सादर केलेली आहे. किमान ॲडीनिशल ६.५० कोटी तरतूद उपलब्ध करुन देण्यात यावी हा जो खर्च सिव्हील वर्क व मेकॅनिकल वर्क म्हणून पंपीग मशिनरी वर खर्चाचा भार दिलेला आहे. ८०% पंप हे १९८५ मध्ये बसविण्यात आलेले आहेत. ते बदलण्याची आवश्यकता आहे पाणी पुरवठयात यामुळे पाठ होवू शकेल.

**मा. सभापती** : टिप्पणी देण्यात यावी त्यावर विचार करण्यात येईल.

**मा. आयुक्त** : यावर जरुर विचार करावा. सचिवाचे पत्र सुध्दा आलेले आहे. श्री. पानझडे यांना सोबत घेवून मी जाणार आहे. यासाठी तरतूद झालेली नाही असे सांगितले तर मला अडचण होवू शकते याचा विचार करावा.

**मा. सभापती** : यामध्ये टोकन अमाऊंट मुख्य लेखाधिकारी यांनी ठेवावी.

**श्री रतनकुमार पंडागळे :** कर्मचाऱ्यांना बोनस देण्याबाबत तरतुद केलेली होती. सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली होती. एक व्यक्ती न्यायालयात गेल्यामुळे प्रकरण प्रलंबीत आहे. न्यायालयाचा जो निर्णय येईल त्यास अधिन राहुन टोकन अमाऊंड बोनससाठी ठेवण्यात यावी.

**मा. सभापती** : मुख्यलेखाधिकारी यांनी बोनस बाबत टोकन अमाऊंड ठेवावी. मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर अशी चर्चा झालेली आहे. जकातमध्ये ७२ कोटी वरुन ७३ कोटीचा इष्टांक देण्यात येतो. मालमत्ता कर २४ कोटी ऐवजी २७ कोटींचा इष्टांक देण्यात येतो. तसेच पाणीपट्टी २८ कोटी ऐवजी ३० कोटी इष्टांक देण्यात येतो. एकुण ६ कोटीची वाढ करण्यात येते. एकुण अंदाजपत्रक १६६.७९ कोटी असे बजेट ठेवण्यात येते. यामध्ये भूसंपादनासाठी ७ कोटी ठेवण्यात आलेले असून, २ कोटी कमी करण्यात यावे. या सदस्यांच्या भावना लक्षात घेवून सर्व सदस्यांचे पत्र घेवून कामांचा समावेश करण्यात येईल. प्रशासनाच्या कामात बदल करुन नवीन यादी

देण्यात येईल. दिलेल्या कामात सर्वसाधारण सभेने कोणतेही बदल करु नयेत. काही कामाचा समावेश करावयाचा असेल तर, करण्यात यावा. कामाचा समावेश करण्यासाठी दोन तीन दिवसांत बैठक घेवून निर्णय घेतला जाईल. यात श्री. नंदकुमर घोडेले श्री. माणिक साळवे, श्रीमती शाहीन जफर, श्री. चंद्रशेखर जैस्वाल, श्री. रतनकुमार पंडागळे व इतर सर्व सदस्य एकत्रित बसून निर्णय घेतला जाईल. १६६.७९ कोटीच्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये स्थायी समिती समोर सादर करण्यात आलेले सन २००३-०४ चे सुधारीत अंदाजपत्रक रु. ११८ कोटी ५१ लाख जमा व त्यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु. १८ कोटी २९ लाख ३१ हजार विचारात घेता एकुण रु. १३६ कोटी ८० लाख ३१ हजार एकुण जागेचा व रु. १३६ कोटी ५२ लाख १० हजार खर्च विचारात घेवून रु. २८.२१ लाख शिलकीचे व सन २००४-०५ चे मुळ अंदाजपत्रक रु. १६७ कोटी ७ लाख ५६ हजार एकुण जमा व रु. १६६ कोटी ८० लाख ९५ हजार खर्चास व रु. २६.६१ लाखाच्या शिलकी अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येवून सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रशासनातर्फे सन २००४-०५ वर्षाकरीता सभागृहासमोर सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात सभापती स्थायी समिती व निवड केलेल्या सदस्यांच्या सल्यानुसार खालील प्रमाो फेरफार व दुरुस्ती करण्यात येऊन प्रस्तावास फेरफार व दुरुस्ती करण्यत येऊन प्रस्तावास फेरफार/दुरुस्तीसह मान्यता प्रदान करुन त्यानुसार सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.

**अ) जमा बाजु :**

| अ. क्र. | लेखाशिर्ष | मुळ अंदाजपत्रकीय तरतुद | स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली वाढ |
|---|---|---|---|---|
| १) | जकात | ७२ कोटी | ७३ कोटी | १ कोटी |
| २) | मालमत्ताकर | २४ कोटी | २७ कोटी | ३ कोटी |
| ३) | पाणीपट्टी | २८ कोटी | ३० कोटी | २ कोटी |

**०२) उघडयावर घाण टाकणे, शौचास बसणे यावर दंड आकारणी करणे :**

शहराची स्वच्छता राखण्याकरीता उघडण्यावर शौचास बसविणे यावर प्रतिबंध घालण्याकरीता संबंधिताकडुन पुढील प्रमाणे दंड आकारणी करण्यात येत होती. तथापी उघडयावर शौचास बसणे, केर कचरा कुंडीत न टाकणे इत्यादी बाबींकरीता प्रस्तावित दंडाच्या रक्कमेत वाढ करण्यात येत आहे. या प्रस्तावाची अंमलबजावणी विभागीय कार्यालयामार्फत करण्यात येईल असे झाल्यास या गोष्टींना आळा बसून नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण होईल व शहर स्वच्छ राहण्यास हातभार लागेल. प्रस्तूत दंड वाढीपासून प्रशासनाचा मानस उत्पन्न मिळविण्याचा नसून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरुकता निर्माण करण्याचा आहे. अस्वच्छता केली तर दंड होऊ शकतो ही मानसिकता रुजविण्याचा प्रशासनाचा प्रस्तावित दंड वाढीचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ब) खर्च बाजु :**

| अ. क्र. | लेखाशिर्ष | मुळ अंदाजपत्रकीय तरतुद | स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली कपात |
|---|---|---|---|---|
| १) | भुसंपादन खर्च | ०७ कोटी | ०५ कोटी | ०२ कोटी |

**२) नागरी घन कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० ची अंमलबजावणी कालबध्द कार्यक्रम :**

केंद्र शासनाने व पर्यावरण विभागाने २५ सप्टेंबर २००० रोजी अधिसुचना पर्यावरण (संरक्षण) कायदा १९६८ अंतर्गत शहरी घन कचरा व हाताळणी नियम २००० जारी केले आहेत. या नियमांची अंमलबजावणी नियोजन बध्द व कालबध्द पध्दतीने करण्यासाठी प्रत्येक नगर परिषद/महानगरपालिकेवर जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार औरंगाबाद महनगरपालिकेने या विभागाची अंमलबजावणी तातडीने करणे आवश्यक आहे. तद्नुसार सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात सदरील नियमाची अंमलबजावणीकरीता रक्कम रु. ४.५० कोटीची तरतुद करण्यात येत असून, औरंगाबाद महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदरील नियमाची अंमलबजावणीकरीता लागणाऱ्या तरतुदीसाठी सभेत सर्वकक्ष चर्चा होवून प्रशासनाने इतर वित्तीय संस्थेकडुन कर्ज उभारणी करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**३) डिफर पेमेंन्ट तत्वावर शहरातील रस्ते तयार करणे. :**

औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर असल्याने या शहराच्या पर्यटनाच्यादृष्टीने बरेचसे देशी/विदेशी पर्यटक नियमीत भेट देतात. शहर सौदंर्यीकरणाच्या दृष्टीने शहरातील रस्ते करणे गरजेचे आहे. तदनुसार शहरातील काही महत्वाचे रस्ते, डिफर पेमेन्ट या तत्वावर करण्याचा प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर स्थायी समितीच्या सभेत चर्चा होवून पर्यटणाच्या दृष्टीने औरंगाबाद शहराच्या सौंदर्यीकरणात भर पडणार असल्यामुळे सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात डिफर पेमेन्ट तत्वावर रु. १०.०० कोटीचे सिंमेट रस्ते तयार करण्यासाठी व त्याची व्याजासह परत फेडीसाठी अंदाजे रु. ४.०० कोटी पूढील तीन वर्षत खर्च येणार असून, त्याचा प्रभाव पूढील तीन वर्षाच्या अर्थसंकल्पावर पडेल यावर सर्वकष चर्चा होवून सादर केलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**४) निर्भय योजनेअंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाची थकबाकी अदा करणे बाबत :**

महाराष्ट्र शासन पाणीपुरवठा स्वच्छता विभागाचे शासन निर्णय क्र. निर्भय-१००३/प्र.क्र. ६८१/पापु २२/मंत्रालय, मुंबई-३२ दि. २७-११-२००३ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेकडे थकीत असलेली पाणीपुरवठा वरील विलंब आकार तसेच कर्जावरील दंडनीय व्याज माफ करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रस्तावित केलेल्या निर्भय योजनेस उपरोक्त शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान केली आहे. सदरील निर्णयानुसार निर्भय योजनेच्या वैशिष्ट्यांतर्गत मुद्दा क्र. ६ नुसार थकबाकी दाराकडील अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेकडील थकबाकीचा ताळमेळ घेवून अंतीम करुन ज्या स्थानिक स्वराज्य संस्था मुळ रक्कम पुर्णतः भरतील त्यांना विलंब आकारात/दंडनीय व्याजात सवलत देण्यात येईल.

औरंगाबाद महानगरपालिकेस सदरील योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास एकुण रक्कम रु. २८४०-७७ लाख इतका भरणा महाराष्ट्र जीवन प्राधीकरण कार्यालयास भरण क्रमप्राप्त राहीले. करीता शासन निर्णय क्र. निर्भय-१००३/प्र. क्र. ६८१/पा.पु.२२/मंत्रालय मुंबई-३२ दि. २७-११-२००३ निर्भय योजनेमधील अटी शर्ती सह सादर केलेल्या प्रस्तावास स्थायी समितीच्या सभेत सविस्तर चर्चा होवून सद्यस्थितीत बाजारातील व्याज दर अत्यंत कमी असल्यामुळे भरणा करण्यात येणाऱ्या रक्कमेचे कर्ज उचलून त्या रक्कमेचा भरणा मंडळाकडे करावा व घेण्यात आलेल्या कर्जाची परतफेड वेळीच व नियमानुसार करणे आर्थिकदृष्ट्या योग्य असल्यामु व या निर्भय योजनेच्या सहभागामुळे जवळपास रु. ७४८६.५५

लाख विलंब आकार व दंडनीय व्याजात लेखा पडताळणीच्या अधीन राहुन युट मिळु शकणार असल्यामुळे इतर वित्तीय संस्थेकडुन कर्ज उभारणी करुन एक रक्कमी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधीकरण कार्यालयास भरणे बाबतचा प्रस्तावास यापूढे कर्ज परतर्फेउ प्रशासनाने वेळीच अदा करावी या अटीवर सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

एकुण जमा रक्कमेतून शहरातील विविध विकासाची कामे करण्यासाठी सर्व संबंधीत विभागयी मागणी स्थायी समितीने सुचविलेली कपात व वाढ लक्षात घेता एकुण रु. ३८.५० कोटीची मागणी होती. परंतू जमा बाजुचा विचार करता सर्व संबंधित विभागांना स्थायी समितीने रु. ३७.४२ कोटी इतक्या रक्कमेची तरतुद उपलब्ध करुन दिली आहे. त्याची सविस्तर माहिती व गोषवारा खालील प्रमाणे आहे.

**(आकडे हजारात)**

| अ. क्र. | विभाग | सुधारीत तरतुद | २००३-०४ स्पील ओव्हर रक्कम | विभागाची मागणी व स्थायी समितीने केलेली तरतुद | एकुण (४+५) | स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १) | शहर अभियंता | ८७६०० | १३०१५ | ७६४८० | ८९४९५ | ८७९५० |
| २) | अति. शहर अभियंता | १००६१५ | ८२६२ | ८५३५० | ९३६१२ | ८९७०० |
| ३) | कार्येकारी अभियंता पाणीपुरवठा | ८५८५० | १८३३७ | ९३०३३ | १११३७० | १०९१५० |
| ४) | कार्येकारी अभियंता (जल नि. व विदयुत) | ७४१०० | २७५१८ | ६३०२५ | ९०५४३ | ८७४०० |
| | **एकुण** | **३४८१६५** | **६७१३२** | **३१७८८८** | **३८५०२०** | **३०४२००** |

प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सर्वकष चर्चा होऊन उपरोक्त फेरफार व दुरुस्त्या करुन सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात येते.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.